रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक २३२ | पृष्ठे १० | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

कृषीवल

रायगड, शुक्रवार, दि. ३० जानेवारी २०२६

किंमत ४₹

## महाराष्ट्राचा 'गणेशोत्सव' चित्ररथ अव्वल

**नवी दिल्ली :** प्रजासत्ताक दिनानिमित्त कर्तव्यपथावर आयोजित संचलनात महाराष्ट्राचा चित्ररथ अव्वल ठरला आहे. यंदा गणेशोत्सव संकल्पनेवर महाराष्ट्राचा चित्ररथ साकारण्यात आला होता. महाराष्ट्राचा हा चित्ररथ सर्वोत्कृष्ट ठरला आहे. विविध निकषांवर मूल्यांकन करत महाराष्ट्राला पहिला क्रमांक जाहीर करण्यात आला असून, केंद्र सरकारच्या वतीने संरक्षण मंत्रालयाने ही घोषणा केली. जम्मू-कश्मीरच्या चित्ररथाने दुसरा, तर केरळच्या चित्ररथाने तिसरा क्रमांक पटकावला आहे. तुषार प्रधान, रोशन इंगोले, कृष्णा सालवटकर, श्रीपाद भोंगाडे यांनी महाराष्ट्राचा चित्ररथ साकारला होता.

## अलिबाग-नागाव प्रॉपर्टी विकणे

अलिबाग-नागाव हायवे टच,
लक्झरीयस् प्रॉपर्टीज, ३१ गुंठे रेडी टू बिल्ड
प्लॉट फार्महाऊस/रिसॉर्ट/हॉटेल साठी योग्य,
नागाव बीच १. २ किमी. प्राईम लोकेशन,
इलेक्ट्रिसीटी, भरपूर पाणी, ५०+ नारळ,
सुपारी आणि हापूस आंब्याची झाडे, उत्तम
कनेक्टिव्हिटी, परमंट कंपाउंड, क्लिअर टायटल,
रेडी सर्च रिपोर्ट, एजंन्ट सुध्दा चालेल.

मालक: 9769108170

## वेधक

### मार्चमध्ये होतं शांभवीचं लग्न

**मुंबई :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह विमान



दुर्घटनेत पाच जणांनी आपला जीव गमावला. त्यामध्ये विमानाचे पायलट असलेल्या कॅप्टर कपूर आणि सहपायलट शांभवी पाठक यांचाही अपघाती मृत्यू झाला आहे. विमान सेवेतून उंच झेप घेण्याचं स्वप्न बाळगणाऱ्या अवघ्या २५ वर्षांच्या शांभवीच्या स्वप्नांचा विमान अपघातातच शेवट झाला. विशेष म्हणजे, आता तिच्या लग्नाची लगबग पाठक कुटुंबात होती. मार्चमध्ये लग्नाच्या तयारीत मग्न असलेलं कुटुंब एका क्षणात उद्ध्वस्त झालं.

### 'यूजीसी'च्या नव्या नियमांना स्थगिती

**मुंबई :** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) वतीने लागू करण्यात आलेल्या नव्या भेदभावविरोधी नियमांना सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी (दि. २९) स्थगिती दिली. हे नियम अस्पष्ट असून, त्यांचा गैरवापर होण्याची शक्यता असल्याचे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने केंद्र सरकार आणि यूजीसीला नोटीस बजावली आहे. पुढील आदेश येईपर्यंत या वादग्रस्त नियमांच्या अंमलबजावणीला ब्रेक लागला आहे. तसेच २०१२ चे नियम पुढील आदेशापर्यंत लागू राहतील, असेही सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी १९ मार्च रोजी होणार आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालय काय निर्णय देते, याकडे लक्ष लागले आहे.

### रो-रो चालकाकडून प्रवाशांची लूट

**अलिबाग :** २६ जानेवारीला आलेल्या सलग सुट्ट्यांमुळे हजारो पर्यटकांनी रायगड जिल्ह्यातील पर्यटनस्थळांना भेटी देत सुट्टीचा आनंद लुटला. दरम्यान, मुंबईकरांनी अलिबाग येथे जाण्यासाठी ट्रेन, एसटी बस खासगी वाहन चालवत जाण्याऐवजी पर्यायी मार्ग म्हणून रो रो बोटीने जाण्याचा मार्ग अवलंबला. मात्र, सुट्टी आणि सणावाराच्या दिवशी रो रोचे तिकीट दर अचानक २०० ते ३०० रुपयांनी वाढवून प्रवाशांची लूट केल्याचे बोलले जात आहे. एरवी साधारण तिकिटाचे दर ४०० रुपये, तर एसी डेकचे दर किमान ४७० रुपयांपासून सुरू होतात. तर लाऊंज डेकच्या तिकिटांचे दर १५०० रुपयांपासून सुरू होतात. परंतु हेच दर सुट्टी आणि सणावाराच्या दिवशी २०० ते ३०० रुपयांनी वाढवले जात असल्याचे सांगण्यात येत आहे.

## अजितदादा अमर रहे..!

# अलविदा!

**लाखोंच्या जनसागराचा साश्रुनयनाने निरोप | बारामतीत फुटला आश्रूंचा बांध**





। पुणे । प्रतिनिधी ।

राज्याच्या राजकारणातील एक झंझावात आणि बारामतीकरांचे लाडके दादा म्हणजेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पार्थिवावर गुरुवारी दि. २९ दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास अंत्यसंस्कार करण्यात आले. बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर शासकीय इतमामात त्यांना अखेरची मानवंदना देण्यात आली. लाडक्या नेत्याला निरोप देण्यासाठी बारामतीत जनसागर लोटला होता. प्रत्येक बारामतीकराच्या डोळ्यात आज अश्रू होते, तर आसमंत 'अजितदादा अमर रहे'च्या घोषणांनी दुमदुमून गेला होता. परत या, परत या अजितदादा परत या, असा टाहो हजारो कार्यकर्त्यांनी फोडला. राज्याच्या राजकारणातील मागील चार दशकांपासूनचे एक पर्व आज समाप्त झाले. अजित पवारांच्या निधनाने राजकारणच नव्हे तर, सहकार ते सांस्कृतिक, क्रीडा क्षेत्रातही शोककळा पसरली आहे.


अजित पवार यांचे पार्थिव काल बुधवारपासूनच अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले होते, तेव्हापासूनच लाडक्या नेत्याला पाहण्यासाठी कार्यकर्त्यांची मोठी गर्दी झाली होती. गुरुवारी सकाळी अजितदादांचे पार्थिव काटेवाडी येथील निवासस्थानी आणण्यात आले. यावेळी बारामतीसह संपूर्ण महाराष्ट्रातून त्यांचे समर्थक आपल्या नेत्याची •> पान २ वर

### दादांवर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

उपमुख्यमंत्री अजित पवार यांना शासकीय इतमामात अखेरचा निरोप देण्यात आला. यावेळी राज्य पोलीस दलाच्यावतीने अजित पवार यांना हवेत गोळ्या झाडून मानवंदना देण्यात आली. त्यानंतर मंत्रोच्चारांच्या घोषात त्यांच्या पार्थिवाला मुखाग्नी देण्यात आला. पार्थ पवार आणि जय पवार यांनी मुखाग्नी दिला. यावेळी 'अजितदादा अमर रहे.., अजितदादा परत या...' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. अजित पवार यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या राजकारणातील एक महत्त्वाचे पर्व संपले असून, बारामती आज खऱ्या अर्थाने पोरकी झाली असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.



## चौलमध्ये महिलेचा खून





- **सोन्याचे दागिने लुटताना झटापटीत मृत्यू**
- **परिसरात भीतीचे वातावरण**

। रेवदंडा । प्रतिनिधी ।

चौल ग्रामपंचायत हद्दीतील टेकाळकर आळी येथील घर क्रमांक ५१७ मध्ये एकट्या राहणाऱ्या मंदा प्रमोद म्हात्रे (७०) या वृद्ध महिलेचा जबरी चोरीदरम्यान खून झाल्याची धक्कादायक घटना मंगळवारी उघडकीस आली. अज्ञात चोरट्यांनी घरात घुसून सोन्याचे दागिने हिसकावण्याचा प्रयत्न करताना झालेल्या झटापटीत त्यांचा मृत्यू झाल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले असून, या घटनेने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे.

ही घटना रेवदंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. घटनेची माहिती मिळताच रेवदंडा पोलीस, श्वान पथक व फॉरेन्सिक पथकाने घटनास्थळी धाव घेतली. पोलीस उपनिरीक्षक भैरू किसन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू असून, उपविभागीय पोलीस अधिकारी माया मोरे •> पान २ वर

## नेरळमध्ये प्रचारादरम्यान तरुणावर चाकूहल्ला



- **ममदापूर नाक्यावर मध्यरात्री घटना**
- **दोघांना अटक, पोलीस तपास सुरू**

। कर्जत । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यात जिल्हा परिषद निवडणुकीच्या प्रचाराला सुरुवात होत असतानाच नेरळ जिल्हा परिषद गटात प्रचाराला रक्तरंजित सुरुवात झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. नेरळ गावातील ममदापूर नाक्यावर तीन जणांच्या टोळक्याने एका तरुणावर चाकूहल्ला केल्याची घटना मंगळवारी मध्यरात्री घडली. याप्रकरणी नेरळ पोलिसांनी दोघांना अटक केली असून, पुढील तपास सुरू आहे.

नेरळ जिल्हा परिषद गटाच्या उमेदवार सुनीता टोकरे यांचे पती तथा रायगड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष सुरेश टोकरे हे मध्यरात्री सुमारे एक वाजता ममदापूर नाक्यावर आपल्या कार्यकर्त्यांसह उपस्थित होते. यावेळी ममदापूर गावातील धनेश शिंगे •> पान २ वर

### जि.प., पं.स. निवडणुका पुढे ढकलल्या

## आता ७ फेब्रुवारीला मतदान

। मुंबई । प्रतिनिधी ।





उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर करण्यात आला असल्यामुळे १२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या उर्वरित टप्प्यांमध्ये बदल करण्यात आला आहे. ५ फेब्रुवारी २०२६ ऐवजी आता ७ फेब्रुवारी रोजी मतदान; तर ७ फेब्रुवारीऐवजी ९ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होईल.

राज्य निवडणूक आयोगाने या जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी १३ जानेवारी २०२६ रोजी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला होता. त्यानुसार नामनिर्देशनपत्र दाखल करणे, नामनिर्देशनपत्र मागे घेणे, चिन्ह वाटप आणि निवडणूक लढविणाऱ्या अंतिम उमेदवारांची यादी प्रसिद्ध करणे इत्यादी टप्प्यांची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यापुढील मतदान, मतमोजणी आणि निवडून आलेल्या सदस्यांची नावे राजपत्रात प्रसिद्ध करणे हे टप्पे शिल्लक आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने या निवडणुकांसाठी ३१ जानेवारी २०२६च्या पुढे फक्त दोन आठवड्यांची मुदतवाढ दिली आहे. •> पान २ वर

## एकाच दिवशी सहा मुले बेपत्ता

। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल व उपनगरांमध्ये १४ ते १७ वयोगटातील मुले बेपत्ता होण्याच्या घटनांमध्ये चिंताजनक वाढ होत आहे. एकाच दिवशी खारघर आणि पनवेल शहर परिसरातून तब्बल सहा मुले बेपत्ता झाल्याच्या तक्रारी दाखल झाल्या. या प्रकरणांना कायद्यानुसार अपहरणाचा दर्जा देत पोलिसांनी गुन्हे नोंदवले आहेत. वाढत्या घटनांमुळे पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, परिसरात खळबळ उडाली आहे.

खारघर सेक्टर १२ येथील पालकांनी दिलेल्या तक्रारीनुसार दहावीत शिकणारा त्यांचा मुलगा मी घर सोडून जात आहे, असे सांगून घराबाहेर पडला, •> पान २ वर

## 'ते' सात नगरसेवक अपात्र

**शिंदे गटाला जोरदार धक्का; जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्णयाने खळबळ**

। म्हसळा । प्रतिनिधी ।

म्हसळा नगरपंचायतीत पक्षादेशाचे उल्लंघन करत राष्ट्रवादी काँग्रेसमधून शिवसेना शिंदे गटात प्रवेश केलेल्या सात नगरसेवकांना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी अपात्र ठरवले असून, या निर्णयामुळे जिल्हा परिषद निवडणुकीच्या तोंडावरच शिंदे गटाची राजकीय गणिते कोलमडली आहेत. शिवसेना शिंदे गटासाठी मोठा धक्का मानला जात आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या या निर्णयाने जिल्ह्याच्या राजकारणात मोठा भूकंप झाल असून, खळबळ माजली आहे.

काही महिन्यांपूर्वी म्हसळा नगरपंचायतीतील राष्ट्रवादी काँग्रेसच्या सात नगरसेवकांनी एकत्रितपणे पक्षांतर करत शिंदे गटाची वाट धरली होती. या घटनेमुळे तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे संख्याबळ आणि राजकीय वर्चस्वाला मोठा धक्का बसला होता. मात्र, या पक्षांतराविरोधात सुनील तटकरे यांनी आक्रमक भूमिका घेत कायदेशीर लढाई छेडली. पक्षांतर बंदी कायद्याचे उल्लंघन झाल्याचा आरोप करत त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे अपात्रतेचा अर्ज दाखल केला होता. याप्रकरणी अलिबाग येथे सविस्तर सुनावणी पार पडली. सर्व बाजूंचा विचार करून जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी संबंधित नगरसेवकांनी पक्षादेशाचे उल्लंघन केल्याचे स्पष्ट झाल्याने त्यांचे सदस्यत्व रद्द करण्याचे आदेश दिले.

या निर्णयामुळे म्हसळा नगरपंचायतीतील राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलली असून, राष्ट्रवादी काँग्रेसची पकड पुन्हा मजबूत झाली आहे. जिल्हा परिषद व पंचायत •> पान २ वर

> **अपात्र ठरविण्यात आलेले नगरसेवक**
> कमल रवींद्र जाधव, मेहजबिन नदीम दळवी, असलह असलम कादिरी, फरहीन अ. अजीज बशारद, सुमैया कासम आमदानी, सारा अ. कादीर म्हसलाई, शाहिद सईद जंजिरकर

## तारा घासल्याने घराला आग

। महाड । प्रतिनिधी ।

किल्ले रायगडच्या पायथ्याशी असलेल्या महाड तालुक्यातील पाने गावात घरावरील विद्युत तारा एकमेकांना घासल्याने शॉर्टसर्किट होऊन अचानक आग लागल्याची घटना घडली. या आगीत पर्बत सुतार यांचे घर संपूर्णपणे जळून खाक झाले असून, घरातील उपयुक्त साहित्य, कपडे, रोख रक्कम व अन्य सामान आगीत भस्मसात झाले आहे.

पर्बत सुतार यांच्या घरावरून विद्युत तारा गेलेल्या होत्या. मंगळवारी रात्रीच्या सुमारास अचानक या तारा एकमेकांना घासून शॉर्टसर्किट झाले आणि क्षणार्धात घराला आग लागली. रात्रीचा अंधार असल्याने आग विझविण्यात अडचणी येत होत्या. •> पान २ वर

**शेकडो महिलांच्या हाताला रोजगार | फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात बाजारात दाखल होण्याची शक्यता**

## पांढऱ्या कांद्याच्या काढणीला सुरुवात

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।



चविष्ट, रुचकर आणि औषधी गुणधर्मांनी परिपूर्ण असा अलिबाग तालुक्यातील प्रसिद्ध पांढरा कांदा आता काढणीस तयार झाला असून, शेतकऱ्यांमध्ये काढणीची लगबग सुरू झाली आहे. अलिबाग तालुक्यातील कार्ले, सागाव परिसरात सध्या मोठ्या प्रमाणावर कांदा काढणीचे काम सुरू असून या प्रक्रियेमुळे गावासह परिसरातील शेकडो महिलांना रोजगार उपलब्ध झाला आहे. कांदा काढणीपासून ते कांद्याच्या माळा तयार करण्यापर्यंत विविध टप्प्यांमध्ये महिलांच्या हाताला काम मिळू लागले आहे. फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यापर्यंत कांद्याच्या माळी तयार होऊन त्या बाजारात दाखल होण्याची शक्यता आहे.

अलिबाग तालुक्यातील कार्ले, खंडाळे, नेहुली, वाडगाव आदी गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर पांढऱ्या कांद्याची लागवड करण्यात आली आहे. तालुक्यात सुमारे ३०० हेक्टर क्षेत्रात •> पान २ वर

> अलिबागचा पांढरा कांदा स्थानिक ग्राहकांसह पर्यटकांच्या कायमच पसंतीला उतरतो. सध्या कांदा काढणीला सुरुवात झाली असून, रायगड जिल्ह्यातील मुरूडसह परदेशातून, विशेषतः सौदी अरेबियातून कांद्याला मागणी आली आहे. त्यादृष्टीने तयारी सुरू आहे. कांदा काढणी, सुकविणे आणि माळा तयार करण्याच्या कामामुळे स्थानिकांना रोजगार मिळत आहे. फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात कांदा बाजारात दाखल होईल. यंदा कांद्याला चांगला दर मिळेल, असा विश्वास वाटत आहे.
>
> – सतीश म्हात्रे, कांदा उत्पादक शेतकरी, कार्ले


## आंबा पीक संकटात

**किडरोगांचा धोका वाढण्याची शक्यता**

प्रमोद जाधव

। रायगड ।

रायगड जिल्ह्यात मंगळवारी (दि. २७) पहाटे अवकाळी पावसाच्या हलक्या ते मध्यम सरी कोसळल्या. अलिबाग, पेणसह इतर तालुक्यांमध्ये झालेल्या या पावसामुळे आंबा पिकावर विपरीत परिणाम होण्याची भीती शेतकऱ्यांतून व्यक्त होत आहे. अवकाळी पावसामुळे मोहर प्रक्रिया थांबण्यासह विविध कीड व रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता वर्तवली जात असून, यामुळे आंबा उत्पादकांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे.



रायगड जिल्ह्यात भाताबरोबरच आंबा या फळपिकाची लागवड मोठ्या प्रमाणावर केली जाते. उत्पादनवाढीच्या दृष्टीने शेतकरी आणि विशेषतः तरुण वर्ग फळपिकांकडे वळताना दिसत आहे. परिणामी, जिल्ह्यातील आंबा लागवडीखालील क्षेत्र सातत्याने वाढत असून, सध्या सुमारे १७ हजार हेक्टर क्षेत्रात आंबा लागवड आहे. यापैकी १४ हजार हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्र उत्पादनक्षम असून, जिल्ह्यात ५६ हजारांहून अधिक आंबा उत्पादक शेतकरी आहेत.

साधारणपणे ऑक्टोबर महिन्यात आंब्याला मोहर येण्यास सुरुवात होते. मात्र, यंदा पावसाने लांबणीवर गेल्याने मोहर प्रक्रिया उशिरा झाली होती. तरीही शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली फवारण्या करून पिकांची योग्य देखभाल केली. अनुकूल वातावरणामुळे •> पान २ वर

> यंदा पाऊस उशिरा थांबल्याने मोहर प्रक्रिया विलंबित झाली. मोहर येत असतानाच अवकाळी पाऊस झाल्यामुळे उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. किडरोगांचा धोका वाढू शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी कृषी अधिकारी व कृषी विद्यापीठातील तज्ज्ञांचा सल्ला घेऊन योग्य फवारण्या कराव्यात.
>
> – चंद्रकांत मोकल, अध्यक्ष महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघ

# महाराष्ट्रात केवळ एकच रेल्वे प्रकल्प पूर्ण

## ३४ प्रकल्पांचं काम कासवगतीनं

। मुंबई । प्रतिनिधी ।

केंद्रीय अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू झालं असून, येत्या रविवारी (१ फेब्रुवारी) केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन २०२६-२७ साठीचा केंद्रीय अर्थसंकल्प सादर करणार आहेत. या अर्थसंकल्पातून महाराष्ट्राच्या पदरात नेमकं काय पडणार, याकडं राज्याचं लक्ष लागलं आहे. देशात आणि राज्यात एनडीएचं सरकार असल्यानं महाराष्ट्राला भरीव निधी मिळेल, असा दावा सत्ताधारी नेते करत असले तरी प्रत्यक्षात विकासकामांची गती पाहता अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. विशेषतः रेल्वे प्रकल्पांच्या प्रगतीबाबत चिंताजनक चित्र समोर आलं आहे.


(संग्रहीत छायाचित्र)

महाराष्ट्रातसध्यासुरूअसलेल्या रेल्वे प्रकल्पांची प्रगती अत्यंत संथ असल्याचं स्पष्ट झालं आहे. नोव्हेंबर २०२५ पर्यंत राज्यातील एकूण ३५ रेल्वे प्रकल्पांपैकी केवळ एकच प्रकल्प १०० टक्के पूर्ण झाला आहे. उर्वरित ३४ प्रकल्प अजूनही विविध टप्प्यांवर रखडलेले असून त्यांचं काम कासवगतीनं सुरू आहे.

उपलब्ध आकडेवारीनुसार, ३५ प्रकल्पांपैकी ६ प्रकल्प ५० ते ६० टक्के पूर्ण झाले आहेत. ६ प्रकल्प ८० ते ९० टक्के पूर्णत्वाच्या टप्प्यावर आहेत. ८ प्रकल्प ९० ते १०० टक्के दरम्यान पूर्ण झाले असून ते लवकरच कार्यान्वित होण्याची शक्यता आहे. मात्र ८ प्रकल्प १० टक्क्यांपेक्षा कमी पूर्ण झाले आहेत, तर ५ प्रकल्प २० टक्क्यांपेक्षा कमी प्रगतीवर आहेत. याशिवाय एक प्रकल्प ६० ते ७० टक्के पूर्ण झाला आहे.राज्यातील रेल्वे कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी मोठ्या घोषणा करण्यात आल्या असल्या, तरी प्रत्यक्षात कामांची गती अपेक्षेप्रमाणे नसल्याचं दिसून येत आहे. सत्ताधारी पक्षाकडून २०१९ ते २०२२ या कालावधीत महाविकास आघाडी सरकारच्या धोरणांमुळे अनेक रेल्वे व मेट्रो प्रकल्पांना ब्रेक लागल्याचा आरोप केला जातो. विशेषतः हाय-स्पीड कॉरिडॉरसारख्या महत्त्वाच्या प्रकल्पांवर याचा विपरीत परिणाम झाल्याचं सांगितलं जातं.

दरम्यान, २०२२ नंतर महायुतीचं सरकार सत्तेत आल्यानंतर कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचा दावा करण्यात येतो. मात्र, प्रत्यक्ष आकडेवारी पाहता अद्यापही बहुतांश रेल्वे प्रकल्प अपूर्ण अवस्थेत असल्याचं वास्तव समोर आलं आहे.

आगामी केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्रासाठी नवीन रेल्वे प्रकल्प, रखडलेल्या प्रकल्पांना गती देण्यासाठी अतिरिक्त निधी आणि नवीन रेल्वे गाड्यांच्या घोषणा होतात का, याकडे आता नागरिकांचं आणि राज्यातील राजकीय वर्तुळाचं लक्ष लागलं आहे. रेल्वे प्रकल्पांना गती मिळाली नाही, तर महाराष्ट्राच्या विकासगतीवर त्याचा थेट परिणाम होण्याची शक्यता जाणकारांकडून वर्तवली जात आहे.



# ज्येष्ठ नागरिकांनी घेतली नगराध्यक्षांची सदिच्छा भेट

। कोर्लई । प्रतिनिधी ।

मुरुड येथील ज्येष्ठ नागरिकसेवानिवृत्त संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी नवनिर्वाचित नगराध्यक्षा आराधना दांडेकर व उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी शहरात ज्येष्ठ नागरिक व सेवानिवृत्त संघटनेसाठी स्वतंत्र कार्यालय उपलब्ध करून देण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

या प्रसंगी माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर, संघटनेचे अध्यक्ष नयन कर्णिक, उपाध्यक्ष शकील कडू, खजिनदार गजानन फाटक यांच्यासह केशव साने, रविंद्र जंजिरकर, उल्हास भगत, रमेश कवळे, बाळकृष्ण कासार, केशव मोहिते, विलास जगताप व नैनिता कर्णिक उपस्थित होत्या. मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन नगराध्यक्षा व उपनगराध्यक्षांचा सन्मान करण्यात आला. संघटनेच्या वतीने दर एक ते दोन महिन्यांत सभा आयोजित करण्यात येतात. या सभांमध्ये शासनाच्या विविध योजनांची माहिती ज्येष्ठ नागरिकांना दिली जाते. मात्र, संघटनेसाठी कायमस्वरूपी कार्यालय नसल्यामुळे अडचणी येत असल्याची भावना अध्यक्ष नयन कर्णिक व नैनिता कर्णिक यांनी व्यक्त केली. यावेळी शकील कडू व गजानन फाटक यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. यावर नगराध्यक्षा आराधना दांडेकर व उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत यांनी ज्येष्ठ नागरिकसेवानिवृत्त संघटनेसाठी कार्यालय उपलब्ध करून देण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करण्यात येतील, अशी ग्वाही दिली.



(छायाचित्र : धम्मशील सावंत)

# पालीसह सुधागड तालुका बंद

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी पाली बाजारपेठेसह सुधागड तालुक्यात कडकडीत बंद पाळण्यात आला. बुधवारी (दि. २८) सायंकाळी पाच वाजता पाली गांधी चौकामध्ये सुधागड व पालीकरांच्या वतीने अजितदादा पवार यांना गांधी चौकामध्ये श्रद्धांजली वाहण्यात आली. दुपारनंतर व्यापाऱ्यांनी पाली शहरात कडकडीत बंद पुकारून अजितदादांच्या स्मृतींना श्रद्धांजली वाहिली आहे.

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनाचा अनेकांना धक्का बसला. सर्वसमावेशक, विकासदृष्टी असलेला प्रगल्भ राजकीय नेता म्हणून अजितदादा लोकप्रिय होते. सामान्य कार्यकर्त्यापासून सामान्य जनतेपर्यंत त्यांनी आपला संपर्क ठेवला होता. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना अंमलबजावणी येताना या योजनेसाठी अजितदादांनी आर्थिकतरतूदकेली. त्यामुळेमहिला वर्गामध्येहीअजितदादांविषयीविशेष आस्था असल्याचे दिसून आले. आज सोशल मीडियावरदेखील अजितदादांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

यासंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी,सुधागड तालुका अध्यक्ष संदेश शेवाळे यांनी सांगितले की ही बाब मनाला तीव्र वेदना देणारी आहे. अजितदादा यांच्या जाण्याने आमच्यावर प्रचंड मोठा दुःखाचा डोंगर कोसळला आहे. अजित दादा आज आपल्यात नाहीत यावर अद्याप विश्वास बसत नाही.

## तरुणाला गंभीर दुखापत

**अलिबाग :** पेण तालुक्यातील कळवे येथील तीनबत्ती नाका परिसरात गणपती विसर्जन सुरू असताना वादातून मारहाणीचा प्रकार घडला. गावातील मोरया मित्र मंडळाचा विसर्जन सोहळा पाहण्यासाठी गेलेल्या फिर्यादीला आरोपीने शिवीगाळ करून हाताबुक्क्यांनी मारहाण केली. भांडण सोडवण्यासाठी आलेल्या फिर्यादीच्या भावाजवळ आरोपीने निष्काळजीपणे फटाका फोडल्याने तो अंगावर उडून उजव्या डोळ्याला लागला. यात साक्षीदारास दुखापत झाली असून, दादर सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

# मोहोपाड्यात सर्वपक्षीय शोकसभा

। रसायनी । प्रतिनिधी ।

राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँगेस पक्षाचे नेते अजितदादा पवार यांचे बारामतीत विमान अपघातात निधन झाले. या अपघाताच्या बातमीने राज्यात शोकानहर निर्माण झाली. कार्यकर्त्यापासून नेत्यांपर्यंत सर्वांचाच बांध फुटला. या घटनेने संपूर्ण राज्यात शोककळा पसरली आहे. रसायनी मोहोपाडा विभागात ही बातमी पसरताच सर्वांनी दुःख व्यक्त केले. या घटनेची माहिती मिळताच वासांबे विभागातील सर्वपक्षीयांनी मोहोपाडा येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे जमून गुरुवार, दि.२९ रोजी सकाळी अभिवादन व शोकसभेचे आयोजन केले होते.




यावेळी व्यापारी असोसिएशनने मोहोपाडा बाजारपेठ बंद ठेवली होती. मान्यवर सर्वपक्षीय नेत्यांनी यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाने शोक व्यक्त केला व त्यांना अभिवादन केले.

यावेळी माजी सरपंच संदीप मुंढे, माजी सरपंच रोशन राऊत, भाजपाचे माजी सरपंच कृष्णा पारंगे, ग्रामपंचायत सदस्या रसिका राकेश खराडे, सदस्या प्रतिक्षा राऊत,मयुरा गोपाळे, वेदीका पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

# डॉ. सोमराज पाटील यांना रौप्यपदक

। पाली । प्रतिनिधी ।

डॉ. सोमराज पाटील यांनी अरुण महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने घेतलेल्या डीएम गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी सुपरस्पेशालिटी परीक्षेत राज्यात दुसऱ्या क्रमांकासह रौप्यपदक प्राप्त केले आहे. डॉ. सोमराज पाटील हे सुधागड तालुक्यातील पेडली येथील अनघा गोळे यांचे पती असून, जे.बी. गोळे यांचे ते नातजावई आहेत. डॉ. अनघा गोळे यांचेही शिक्षण एमबीबीएस एमएसपर्यंत झाले असून, त्या नेत्रशल्य चिकित्सक आहेत.

डॉ. पाटील यांचे शिक्षण इचलकरंजी, सोलापूर, मुंबई, नागपूर येथे झाले. त्यांनी लोकमान्य टिळक महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालय, सायन, मुंबई येथून एमबीबीएस, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथून एमडी (मेडिसिन) तसेच लोकमान्य टिळक महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालय, सायन, मुंबई येथून डीएम (गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी) पूर्ण केले आहे.



## ३१ जानेवारीपर्यंत अर्ज सादर करा

। अलिबाग । प्रतिनिधी ।

रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील महाविद्यालयात प्रवेशित असलेल्या अनुसूचित जमातीच्या ज्या विद्यार्थ्यांनी पंडित दिनदयाळ उपाध्याय स्वयंम योजना २०२५-२६ करीता नुतनीकरणाचे अर्ज सादर केलेले नाहीत, अशा पात्र विद्यार्थ्यांनी पंडित दिनदयाळ उपाध्याय स्वयंम योजनेचे नुतनीकरणाचे अर्ज दि. ३१ जानेवारी २०२६ पर्यंत http://swayam.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन सादर करावेत असे आवाहन प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण तेजस्विनी गलांडे यांनी केले आहे. दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी पर्यंत नुतनीकरणास पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज कार्यालयास प्राप्त न झाल्यास त्यांच्या जागी नवीन विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येईल. तसेच ज्या विद्यार्थ्यांची शासकीय वसतिगृहात गुणवत्ता यादीव्दारे निवड झालेली आहे व त्यांना वसतिगृहाकडून आवेदन पत्रे निर्गमित झालेली आहेत अशा विद्यार्थ्यांनी वसतिगृहातच प्रवेश घ्यावा, त्यांचे अर्ज स्वयंम योजनेत हस्तांतर करण्यात येणार नाहीत.

पान १ वरून

## अलविदा..!

शेवटची झलक पाहण्यासाठी पोहोचले होते. तर, दुसरीकडे देशपातळीपासून ते राज्यातील महत्त्वाच्या नेते मंडळीदेखील बारामतीमध्ये दाखल झाले होते. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, नितीन गडकरी, रामदास आठवले. तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्यासह अनेक नेते बारामतीमध्ये दाखल झाले होते.

सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास अंत्ययात्रेला सुरुवात झाली. फुलांनी सजवलेल्या वाहनातून अजितदादांची अंत्ययात्रा निघाली, तेव्हा रस्त्याच्या दुतर्फा हजारो नागरिक हात जोडून उभे होते. तर, विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात लाखोंचा जनसागर लोटला होता.

## चौलमध्ये महिलेचा खून

यांनीही घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

मंदा म्हात्रे या गेल्या दहा वर्षांपासून माहेरच्या मालमत्तेची देखरेख करण्यासाठी टेकाळकर आळी येथील घरात एकट्याच राहात होत्या. त्यांचे पती प्रमोद शांताराम म्हात्रे हे गुंजीस, पो. नवगाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथे वास्तव्यास आहेत. २८ जानेवारी रोजी सकाळी साडेनऊ वाजेपर्यंत पती-पत्नींचा फोनवर संपर्क झाला होता. मात्र, त्यानंतर फोन उचलला जात नसल्याने संशय बळावला. दिवसभर संपर्क न झाल्याने रात्री सुमारे आठ वाजता प्रमोद म्हात्रे हे चौल येथील घरी आले. त्यावेळी घराच्या पाठीमागील दरवाजा उघडा असल्याचे दिसून आले. घरात प्रवेश करताच मंदा म्हात्रे या स्वयंपाकघरात बेशुद्ध अवस्थेत पडलेल्या आढळून आल्या. तपासणी केली असता त्यांचा मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले.

पोलिसांच्या प्राथमिक पाहणीत मृत महिलेच्या डाव्या कानाखाली जखम आढळून आली असून, मानेच्या उजव्या बाजूला दोन वळ (खुणा) दिसून आल्या आहेत. कानातील सोन्याच्या रिंगा व गळ्यातील सोन्याची माळ जबरदस्तीने काढण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे. दागिने लुटताना झालेल्या झटापटीतच त्यांचा मृत्यू झाल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.

याप्रकरणी फिर्यादी प्रमोद शांताराम म्हात्रे यांच्या तक्रारीवरून रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, जबरी चोरी करताना खून झाल्याचा गुन्हा असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी माया मोरे, पोलीस उपनिरीक्षक भैरू किसन जाधव, दीपक म्हशीळकर, मनीष ठाकूर, सिद्धेश म्हात्रे, कुंभार, सुग्रीव गव्हाणे व सुधीर पाटील यांनी घटनास्थळी भेट देत तपासाला गती दिली आहे. एकट्या राहणाऱ्या वृद्ध महिलेवर घरात घुसून जीवघेणा हल्ला करण्यात आल्याने परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, आरोपींचा लवकरात लवकर शोध घेण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## नेरळमध्ये प्रचारादरम्यान तरुणावर चाकूहल्ला

आणि सुरेश टोकरे यांच्यात शाब्दिक बाचाबाची झाली. त्यानंतर तेथील वातावरण तणावपूर्ण बनले. दरम्यान, त्या ठिकाणी उपस्थित असलेला विशाल हिसाळके हा तरुण बाजूला गेला होता. काही वेळानंतर टोकरे पुढे निघून गेल्यानंतर धनेश शिंगे हे झालेल्या चर्चेची माहिती आपल्या सहकारी विशाल हिसाळके यांना सांगत होते. यावेळी विशाल हिसाळके ''बरोबर आहे'' असे म्हणत असताना मिलिंद शिंगे तेथे आला आणि त्याने विशाल यांना जाब विचारत धक्काबुक्की केली. यानंतर ममदापूर गावातील रेशब कुरेशी आणि अरमान पटेल यांनीही विशाल हिसाळके यांना मारहाण करण्यास सुरुवात केली.

दरम्यान, मिलिंद शिंगे याने जवळच उभी असलेल्या दुचाकीमधून चाकू काढून विशाल हिसाळके यांच्यावर वार करण्याचा प्रयत्न केला. धनेश शिंगे यांनी हा हल्ला थोपवण्याचा प्रयत्न करत चार वार चुकवले. मात्र त्यानंतर रेशब कुरेशी आणि अरमान पटेल यांनी विशाल हिसाळके यांच्यावर चाकूने हल्ला केला. या हल्ल्यात विशाल हिसाळके यांच्या पोटात गंभीर जखम झाली असून, त्यांना मध्यरात्री दीड वाजण्याच्या सुमारास रायगड हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

घटनेची माहिती मिळताच नेरळ पोलिसांनी घटनास्थळी फॉरेन्सिक पथकाला पाचारण केले. ममदापूर येथील टिवाले हॉटेल व दिव्यादीप हॉटेल परिसरात पाहणी करण्यात आली. जिल्हा पोलीस उपअधीक्षक राहुल गायकवाड यांनीही घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला आहे. नेरळ पोलीस जखमी विशाल हिसाळके यांचे जबाब नोंदविण्याची प्रक्रिया सुरू असून, कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलिसांकडून खबरदारी घेण्यात येत आहे. दरम्यान, जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा प्रकार घडल्याने परिसरात तणावाचे वातावरण असून, निवडणूक प्रचाराला हिंसक वळण लागण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## 'ते' सात नगरसेवक अपात्र

समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा निकाल राष्ट्रवादीसाठी मोठे राजकीय अस्त्र ठरणार असल्याचे बोलले जात आहे. कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, तटकरेंच्या रणनीतीचे जिल्हाभर कौतुक होत आहे. दुसरीकडे, मंत्री भरत गोगावले यांच्या नेतृत्वाखालील शिंदे गटासाठी हा निर्णय मोठा मानहानिकारक पराभव मानला जात आहे. म्हसळा तालुक्यात उभे राहिलेले शिंदे गटाचे बळ एका झटक्यात कमी झाले असून, आगामी निवडणुकांमध्ये या निकालाचा थेट परिणाम दिसून येणार आहे. एकूणच, जिल्हा परिषद निवडणुकीच्या तोंडावर आलेल्या या निर्णयामुळे रायगडच्या राजकारणाला नवी दिशा मिळणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

## एकाच दिवशी सहा मुले बेपत्ता

तो परतलाच नाही. दुसऱ्या घटनेत कोपरा गावातील सेक्टर १० परिसरातील महिलेने चार अल्पवयीन मुलांच्या बेपत्ताबाबत तक्रार दाखल केली आहे. या मुलांचे वय १४ ते १७ वर्षांदरम्यान असून, त्यामध्ये दोन मुलींचा समावेश आहे. यातील दोन मुले भावंडे आहेत. पनवेल तालुक्यातील नेरे गावातूनही १७ वर्षांच्या मुलगा बेपत्ता आहे.

## तारा घासल्याने घराला आग

तरीही पाने गावातील ग्रामस्थांनी तातडीने धाव घेत आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. दरम्यान, महाड एमआयडीसी अग्निशमन दल घटनास्थळी पोहोचेपर्यंत आगीने रौद्ररूप धारण केले होते. काही वेळाने अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले; मात्र तोपर्यंत घर पूर्णतः आगीच्या भक्ष्यस्थानी पडले होते. ग्रामस्थांच्या प्रयत्नांमुळे पुढील अनर्थ टळला.

यावेळी घरामध्ये पर्बत सुतार यांची पत्नी व आई असे तिघेजण उपस्थित होते. घराला अचानक आग लागल्याचे लक्षात येताच सर्वजण घाबरून घराबाहेर पडल्याने सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, आगीत संपूर्ण घर उद्ध्वस्त झाले आहे. या घटनेनंतर पाने गावातील ग्रामस्थांनी शासनाने तातडीने पंचनामा करून नुकसानग्रस्त कुटुंबाला आवश्यक ती आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी केली आहे.

## आंबा पीक संकटात

यावर्षी आंब्याला चांगला बहर आला होता, त्यामुळे शेतकरी आशावादी झाले होते. मात्र, अचानक झालेल्या पावसाने आणि त्यानंतर निर्माण झालेल्या ढगाळ वातावरणामुळे पुन्हा चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

मंगळवारी पहाटेपासून पडलेल्या रिमझिम पावसानंतर दुपारपर्यंत अनेक भागांत ढगाळ वातावरण राहिले. या बदलत्या हवामानामुळे आंबा पिकांवर कीड व रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असून, हातातोंडाशी आलेले पीक धोक्यात येण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

## आता ७ फेब्रुवारीला मतदान

पण, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी रोजी अपघाती निधन झाल्यामुळे राज्य शासनाने राज्यात दि. २८ ते ३० जानेवारीपर्यंत दुखवटा जाहीर केला आहे. या कालावधीचा विचार करून जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांच्या कार्यक्रमातील उर्वरित टप्प्यांमध्ये बदल करण्यात आले आहेत. त्यानुसार संबंधित जिल्हाधिकारी सुधारित निवडणूक कार्यक्रमाची सूचना ३१ जानेवारी रोजी प्रसिद्ध करतील.

आता ७ फेब्रुवारी रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होईल. त्यामुळे जाहीर प्रचाराची समाप्ती ५ फेब्रुवारी रोजी रात्री १० वाजता होईल. संबंधित ठिकाणी ९ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता मतमोजणी सुरु होईल. निकाल जाहीर झाल्यानंतर संबंधित ठिकाणची आचारसंहिता संपुष्टात येईल. निवडून आलेल्या सदस्यांची नावे शासन राजपत्रात ११ फेब्रुवारीपर्यंत प्रसिद्ध केली जातील.

## पांढऱ्या कांद्याच्या काढणीला सुरुवात

कांद्याची लागवड झाल्याची माहिती समोर आली आहे. भात कापणीची कामे पूर्ण झाल्यानंतर नोव्हेंबर महिन्यात कांद्याची लागवड करण्यात आली होती. आता हा पांढरा कांदा पूर्णपणे तयार झाला असून, गेल्या दोन दिवसांपासून काढणीला वेग आला आहे. कांदा काढणीबरोबरच त्याचे सुकविणे आणि माळा तयार करण्यासाठी स्थानिक कामगारांना मोठ्या प्रमाणावर रोजगार मिळत आहे. विशेषतः महिलांसाठी हे रोजगाराचे महत्त्वाचे साधन ठरत असून, मार्च महिन्यापर्यंत शेकडो जणांना उत्पन्नाचे साधन उपलब्ध होण्याची शक्यता आहे. काही शेतकऱ्यांनी एक ते दोन एकर क्षेत्रात तर काहींनी दोन ते तीन गुंठे क्षेत्रात कांद्याची लागवड केली आहे. तर काही शेतकऱ्यांनी घराशेजारी परसबाग म्हणूनही कांदा घेतला आहे.

सध्या कांदा काढणीचे काम जोरात सुरू असून, काढलेला कांदा सुकवून त्याच्या माळी तयार करण्याचे कामही समांतरपणे केले जात आहे. अलिबागचा पांढरा कांदा चविष्ट आणि गुणधर्मयुक्त असल्यामुळे त्याला राज्यातील विविध जिल्ह्यांतून मोठी मागणी असते. रायगड जिल्ह्यातील बाजारपेठांबरोबरच परदेशातूनही या कांद्याला मागणी आहे. विशेष म्हणजे, अलिबागच्या पांढऱ्या कांद्याला सौदी अरेबियातून मागणी आल्याची माहिती असून, एक कंटेनर कांदा निर्यातीसाठी मागविण्यात येणार असल्याचे बोलले जात आहे.

# लोकप्रिय योजनांचा बोजा देशावर

- **तूट वाढली, परदेशी गुंतवणूकदारांची माघार**
- **आर्थिक पाहणी अहवालातून सरकारची पोलखोल**

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

१ फेब्रुवारीला केंद्रीय अर्थसंकल्प सादर होण्याच्या अवघ्या काही दिवस आधी संसदेत मांडण्यात आलेला आर्थिक पाहणी अहवाल २०२५-२६ ने केंद्र सरकारच्या आर्थिक कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. लोकांना भुरळ घालणाऱ्या लोकप्रिय योजनांमुळे राज्यांची आर्थिक कंबर मोडत असून, वाढती महसुली तूट, घसरता रुपया आणि परदेशी गुंतवणूकदारांची माघार यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेची खरी परिस्थिती सरकारच्या दाव्यांपेक्षा वेगळी असल्याचे या अहवालातून स्पष्ट झाले आहे.

एकीकडे सरकार 'विकासाचा गजर' करत असताना, दुसरीकडे आर्थिक पाहणी अहवालातच परदेशी गुंतवणूकदार भारतातून गुंतवणूक काढून घेत असल्याची गंभीर नोंद करण्यात आली आहे. थेट परकीय गुंतवणूक घटल्याने रुपयाचे मूल्य डॉलरच्या तुलनेत सातत्याने घसरत असून, याचा थेट फटका सामान्य नागरिकांच्या महागाईवर पडत आहे. मात्र, या मुद्द्यांवर सरकारकडून ठोस उपाययोजना दिसून येत नसल्याची टीका अर्थतज्ज्ञांकडून होत आहे.

राज्य सरकारांकडून राबवण्यात येणाऱ्या 'लोकप्रिय' योजनांमुळे महसुली तूट वाढत असल्याबाबत आर्थिक पाहणी अहवालात स्पष्ट चिंता व्यक्त करण्यात आली आहे. कोणत्याही अटींशिवाय रोख स्वरूपात दिल्या जाणाऱ्या अनुदानांमुळे भांडवली खर्चाला कात्री लागत असून, दीर्घकालीन विकासाऐवजी तात्कालिक राजकीय फायद्यांना प्राधान्य दिले जात असल्याचा ठपका अप्रत्यक्षपणे सरकारवर ठेवण्यात आला आहे. राज्यांची आर्थिक क्षमता ढासळत असतानाच कर्जाचे ओझे वाढत चालले आहे. गुंतवणूकदार केवळ केंद्र सरकारची नाही, तर संपूर्ण शासकीय व्यवस्थेची आर्थिक स्थिती तपासूनच गुंतवणूक करतात. त्यामुळे राज्य पातळीवरील बेजबाबदार आर्थिक धोरणांचा थेट परिणाम देशाच्या गुंतवणूक वातावरणावर होत असल्याचे अहवालातून स्पष्ट झाले आहे. आर्थिक पाहणी अहवालात २०२६-२७ मध्ये ६.८ ते ७.२ टक्के आर्थिक वाढीचा अंदाज व्यक्त करण्यात आला असला, तरी हा आकड्यांचा खेळ असून प्रत्यक्षात रोजगारनिर्मिती, गुंतवणूक आणि चलन स्थैर्याच्या आघाडीवर सरकार अपयशी ठरत असल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात आहे. २०२५ मध्ये रुपयाचे मूल्य लक्षणीयरीत्या घसरले असल्याची कबुली खुद्द सरकारी अहवालात देण्यात आली आहे, ही बाब सरकारसाठी लाजिरवाणी असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

२०२४-२५ साठी वित्तीय तूट जीडीपीच्या ४.८ टक्के असल्याचा दावा करण्यात आला असून, २०२५-२६ साठी ४.४ टक्क्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. मात्र वाढता खर्च, लोकप्रिय योजनांचा भार आणि घटती गुंतवणूक पाहता ही उद्दिष्टे कागदावरच राहतील, असा संशय अर्थतज्ज्ञ व्यक्त करत आहेत.

राजकीय फेरफटका

# शेकापच्या उमेदवारांची प्रचारात आघाडी

## ■ शहापूर जिल्हा परिषद संघात काँग्रेस, ठाकरे गटाचा पाठिंबा

**| वाघ्रण | प्रतिनिधी |**

**अलिबाग तालुक्यातील शहापूर जिल्हा परिषद मतदार संघाचे शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार अभिषेक अनिल पाटील हे रिंगणात उतरले आहेत. तर, याच गणातून अलिबाग तालुका पंचायत समितीचे उमेदवार कौशिक ज्ञानेश्वर पाटील आणि वैजाळी पंचायत समितीचे उमेदवार सुशिल पाटील हे देखील निवडणूक रिंगणात उतरले आहेत. या तिन्ही उमेदवारांची निशाणी खटारा असून त्यांना काँग्रेस व शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचा पाठींबा असल्याने सर्व कार्यकर्ते जोशात प्रचारात गुंतले असल्याचे चित्र संपूर्ण मतदार संघात दिसत आहे.**



शहापूर जिल्हा परिषद मतदार संघ हा डावली, रांजणरवार, सारळ, रेवस, हाशिवरे, शिरली, मानकुळे, नारंगी, चिंचवली, पेढांबे, वाघ्रण, खिडकी, चरी, कुरकुंडी व शहापूर इत्यादी ग्रामपंचायती मिळून आहे. या जिल्हा परिषद गटातील शेतकरी कामगार पक्षाचे अभिषेक पाटील, कौशिक पाटील व सुशिल पाटील हे तरुण तडफदार व सुशिक्षित उमेदवार आहेत. त्यांच्या प्रचारात शेतकरी कामगार पक्षाचे माजी पंचायत समिती उपाध्यक्ष आणि शेतकरी समिती प्रमुख अनिल गोमा पाटील यांच्यासह आजी-माजी पक्ष पदाधिकारी व कार्यकर्ते उत्साहाने कामाला लागल्याचे चित्र आहे. यादरम्यान, शहापूर जिल्हा परिषदत गटातील तिन्ही उमेदवार शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील, महाराष्ट्र राज्याच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्यासह अन्य प्रमुख पदाधिकारी व वरिष्ट कार्यकर्त्यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार संघाचा दौरा तसेच कार्यकर्त्यांच्या गाठी भेटी घेत आहेत. यावेळी त्यांना वाढता प्रतिसाद देखील मिळत आहे.

सोमवारी (दि.२६) प्रजासत्ताक दिनी धेरंड गावातून नारळ वाढवून प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते जमले होते. त्यानंतर मंगळवारी (दि.२७) अर्ज मागे घेण्याच्या अंतिम तारखेनंतर शहापूर जिल्हा परिषद गटात आणि पंचायत समिती शहापूर व वैजाळी गणात शेतकरी कामगार पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस, भाजपा व शिवसेना (शिंदे गट) अशी चौरंगी लढत होणारा असल्याचे स्पष्ट झाले.

शहापूर जिल्हा परिषद संघात शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून अनेक विकास कामे करण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे येथील जनतेच्या मुलभुत हक्कांसाठी शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि चित्रलेखा पाटील यांच्या नेतृत्वाखाली शासनाविरोधात मोर्चे व आंदोलने यशस्वीपणे पार केली आहेत. तसेच, शिक्षण आणि क्रीडा क्षेत्रात शेतकरी कामगार पक्षाची भरीव कामगिरी आहे. त्यामुळे नवीन विकास कामांच्या पुर्ततेसाठी मतदारांनी शेतकरी कामगार पक्षाच्या उमेदवारांना विजयी करा, अशी मागणी तिन्ही उमेदवार करताना सातत्याने दिसत आहेत. त्याचबरोबर काँग्रेस आणि शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते या तिन्ही उमेदवारांच्या पाठीशी उभे राहून त्यांना भरघोस मतांनी विजयी करा, असे आवाहन करीत आहेत.



● शेकापचे चेंढरे जिल्हा परिषद उमेदवार प्रविणा घासे आणि आक्षी पंचायत समिती गणातील उमेदवार प्रफुल्ल पाटील यांचा गोंधळपाडा येथील गावदेवी मंदिरात नारळ फोडून प्रचाराला सुरुवात करण्यात आली.
(छायाचित्र : समीर मालोदे)

## माणकुळ्यात शेकापच्या प्रचाराचा शुभारंभ

**| खारेपाट | प्रतिनिधी |**

अलिबाग तालुक्यातील माणकुळे येथे शेकाप व महाविकास आघाडीचे शहापूर मतदार संघातील जिल्हा परिषदेचे उमेदवार अभिषेक पाटील व वैजाळी पंचायत समितीचे उमेदवार सुशील पाटील यांच्या निवडणूक प्रचाराचा शुभारंभ नारंगीचा टेप येथे करण्यात आला. तसेच, माणकुळे येथील हनुमान मंदीर व बहिरीचा पाडा येथील श्री विठ्ठल मंदिर या ठिकाणी ज्येष्ठ कार्यकर्त्यांच्या हस्ते प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला.

या प्रचारादरम्यान नारंगीचा टेप मानकुळे व बहिरीचा पाडा या परिसरात मतदारांचा मोठा प्रतिसाद मिळाला. यावेळी शेकाप नेते अनिल पाटील, सिद्धनाथ पाटील, सुशील पाटील व ॲड. भोलानाथ पाटील यांनी मार्गदर्शन केले. तसेच, शेकाप महाविकास आघाडीचे उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी होतील, असा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला. यावेळी शेकापचे ज्येष्ठ पदाधिकारी अनिल पाटील, माजी सरपंच सत्य विजय पाटील, माजी सरपंच डॉ.मनोज पाटील, माजी सरपंच सिद्धनाथ पाटील, नंदकुमार पाटील, मंगल पाटील, सुभाष पाटील, विक्रम पाटील, भरत पाटील यांच्यासह शेकापचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच खारेपाट विभाग काँग्रेस अध्यक्ष ॲड. भोलानाथ पाटील व महाविकास आघाडीचे कार्यकर्ते उपस्थित होते.



## न्हावे येथे शेकापचा दणदणीत प्रचार



**| चणेरा | प्रतिनिधी |**

जिल्हा परिषद घोसाळा गटातून डॉ. वैष्णवी हेमंत ठाकूर, तर पंचायत समिती न्हावे व घोसाळा गणामधून रुपाली मढवी आणि शंकर दिवकर हे उमेदवार अधिकृतपणे निवडणूक रिंगणात उतरले आहेत. यावेळी शेकापचा निवडणूक प्रचार न्हावे येथून उत्साहात आणि जोमाने सुरू झाला. कुंडलिका नदीच्या डाव्या व उजव्या तीरावरील तब्बल ५२ गावांच्या पिण्याच्या पाण्याच्या ज्वलंत प्रश्नाला सर्वोच्च प्राधान्य देत तो तातडीने सोडविण्याचा ठाम निर्धार शेकापचे ज्येष्ठ नेते शंकरराव म्हस्कर यांनी व्यक्त केला.

यावेळी बोलताना शंकरराव म्हस्कर म्हणाले की, पिण्याचे पाणी हा मूलभूत हक्क असून अनेक वर्षांपासून या भागातील नागरिकांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. शेतकरी कामगार पक्ष सत्तेत आल्यानंतर या प्रश्नावर तात्काळ आणि शाश्वत तोडगा काढला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. घोसाळा मतदारसंघातील ढासळलेल्या आरोग्यसेवेबाबत तीव्र चिंता व्यक्त करत त्यांनी सांगितले की, ग्रामीण भागातील आरोग्य सुविधा सक्षम करण्यासाठी शेकापक्ष आघाडीवर राहून संघर्ष करेल.

प्राथमिक आरोग्य केंद्रे, आरोग्य कर्मचारी व आवश्यक सोयी-सुविधा याबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला. तसेच, महिला सबलीकरणाच्या मुद्द्यावर बोलताना म्हसकर यांनी, महिला बचत गटांतील महिलांना स्वावलंबी करण्यासाठी उद्योग-व्यवसायाच्या संधी उपलब्ध करून देण्याचे ठोस व कृतीशील काम पक्ष हाती घेणार असल्याचे सांगितले. केवळ आश्वासनांवर न थांबता प्रत्यक्ष कृतीतून महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम केले जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रचार शुभारंभ कार्यक्रमाला शेकापचे ज्येष्ठ नेते शंकरराव म्हस्कर, तालुका चिटणीस शिवराम महाबळे, कार्यालयीन चिटणीस संदेश विचारे, आरे सरपंच राजेंद्र मळेकर, मजदूर फडरेशनचे हेमंत ठाकूर, विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन गोपिनाथ गंभे, व्हाइस चेअरमन विकास भायतांडेल, खांडेकर, पुरोगामी युवक संघटना अध्यक्ष संतोष दिवकर, उपाध्यक्ष अमोल शिंगरे, शंकर दिवकर, अभिजीत शिंगरे, विठ्ठल मोरे, खेद ढमाळ, हेमंत भायतांडेल यांच्यासह असंख्य कार्यकर्ते, पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिहूत ठाकरे गटाचा प्रचार



**| शिहू | प्रतिनिधी |**

पेण तालुक्यातील प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षातील शिहू जिल्हा परिषद गटातील उमेदवार पल्लवी भोईर व शिहू पंचायत समिती गणातील उमेदवार संजय भोईर यांच्या प्रचारचा शुभारंभ श्री. बहिरेश्वर जोगेश्वरी मातेच्या मंदिरात करण्यात आला. दरम्यान, शिहू ग्रामस्थांनी यावेळी उत्स्फूर्त प्रतिसाद व पाठिंबा देत सर्वाधिक मतधिक्याने विजयी करण्याचा निर्धार केला.

यावेळी पेण पंचायत समिती माजी सभापती मनीषा भोईर, शिहू माजी सरपंच विश्वास मोकल, भास्कर म्हात्रे, माजी उपसरपंच सुजित गदमले, चंद्रकांत अडसूळे, केशव म्हात्रे, नरेश म्हात्रे, जयराम म्हात्रे, हेमंत मोकल, मुजीफ मोमीन, वसंत पाटील, सदस्य हिरावंती शेळके, निलिमा म्हात्रे, जयश्री खाडे, अक्षदा गदमले, शिल्पा भोईर, यमुना पाटील, चंद्रकांत पाटील यांसह मोठ्या संख्येने ग्रामस्थ महिला व युवक उपस्थित होते.

## शेकापचा 'परिवर्तन विकास'ला आधार

**| पाताळगंगा | प्रतिनिधी |**

शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून सावरोली जिल्हा परिषद निवडणुक लढवण्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यात होते. मात्र, अर्ज मागे घेण्याच्या दिवशी जयवंत पाटील, तसेच डमी उमेदवार चंद्रकांत पाटील यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतला.

दरम्यान, त्यांच्याकडून चौक ब्राह्मण आळी येथे प्रचार रॅलीमध्ये परिवर्तन विकास आघाडीला पाठिंबा दर्शवला असल्याचे स्पष्ट करण्यात आले. तसेच, सावरोली जिल्हा परिषद गटामध्ये मोठ्या प्रमाणात शेतकरी कामगार पक्ष सक्रिय असून त्याचा लाभ निश्चितच परिवर्तन विकास आघाडीला होणार असल्याचे जयवंत पाटील यांनी बोलताना आपले मत व्यक्त केले.



सावरोली जिल्हा परिषद उमेदवार संतोष बैलमारे, पंचायत समिती वाशिवली पुनम म्हात्रे व सावरोली प्रमिला पाटील हे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे आहेत. वानिवली, कोपरी, कोपरी वाडी, ब्राम्हण आळी, तुपगाव मोहल्ला, तुपगाव, चौक पाली या गावातील प्रत्येकांच्या घरी जाऊन घड्याळ व मशाल या चिन्हावर बटण दाबुन भरघोष मतांनी निवडून देण्याचे आवाहन उत्तम भोईर, जयवंत पाटील, सुनिल थोरवे, चंद्रकांत पाटील, राजेश पाटील, जयेश पाटील यांच्यासह शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी केली.

## वाशी विभागत शेकापला उदंड प्रतिसाद



**| गडब | प्रतिनिधी |**

शेतकरी कामगार पक्षाचे वडखळ जिल्हा परिषद गटाचे उमेदवार संजय जांभळे यांच्या प्रचाराची सुरूवात वाशी येथील माता जंगदबेच्या मंदीरात करण्यात आली. त्यांनतर वाशी विभागात प्रचार रॅली काढण्यात आली. यावेळी उपस्थित कार्यकर्तानी संजय जांभळे यांना विजयी करण्याचा निर्धार केला.

याप्रसंगी बोलताना संजय जांभळे म्हणाले की, आजची हि गर्दी शेकापच्या उमेदवारांना बहुमताने निवडून देण्यासाठी जमली आहे. जनता जागृक झाली आहे. मागील ५ वर्षांत जनतेच्या समस्या न सोडवणाऱ्यांना या निवडणुकीत मतदार घरी बसवतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच, वाशी खारेपाटातील जनसामान्यांना पाण्यापासून वंचित ठेवण्याचे पाप हे सत्ताधाऱ्यांचे आहे. सत्ताधारी लोकप्रतिनिधी वाशी पाणी प्रश्नी जनतेची दिशाभूल करीत आहेत. आदानी-अंबानी सारख्या उद्योगपतींच्या घशात येथील सुपीक जमिनी घालण्याकरिता पाणी न देण्याचे षडयंत्र सत्ताधारी करीत असल्याचा आरोप देखील संजय जांभळे यांनी केला. यावेळी पेण तालुका कॉग्रेसचे अध्यक्ष अशोक मोकल, निलेश म्हात्रे, रोशन पाटील, वैभव म्हात्रे, राजन झेमसे आदींसह महीला व नागरीक शेकोडोच्या संख्येने उपस्थित होते.

## कर्जतमध्ये शेकाप महायुतीचे पारडे जड

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत पंचायत समितीच्या १२ गणांमध्ये निवडणूक होत असून या निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले आहे. या १२ जागांवर शिवसेना (शिंदे गट), भाजप व शेकापच्या महायुतीमध्ये शिंदे गट ६, तर भाजप आणि शेकाप हे प्रत्येकी ३ जागा लढवत आहे. तसेच, राष्ट्रवादी (अजित पवार गट) व शिवसेना (ठाकरे गट) यांच्या कर्जत परिवर्तन आघाडीकडून राष्ट्रवादी ७, तर शिवसेना ५ पाच जागांवर निवडणूक लढवत आहे. त्यामुळे महायुतीचे कर्जत परिवर्तन आघाडीला आव्हान असणार आहे. तसेच, काँग्रेस आणि मनसे प्रत्येकी एका जागेवर निवडणूक लढवत आहेत.

कर्जत पंचायत समितीच्या पोशीर गणामध्ये महायुतीतील शेकापच्या उमेदवार रेशमा जोशी यांची कर्जत परिवर्तन आघाडीतील राष्ट्रवादीच्या हर्षला वेहेले यांच्यात सरळ लढत होत आहे. तर, कळंबमध्ये महायुतीकडून शेकापच्या नीलम ढोले यांची लढत आघाडीच्या शिवसेनेच्या कमला शिंगवा यांच्याशी होणार आहे. पाथरज गणामध्ये शेकापच्या अश्विनी पादीर या महायुतीच्या उमेदवार यांची लढत परिवर्तन आघाडीकडून राष्ट्रवादीच्या कविता पादीर यांच्याशी होणार आहे. कशेळेमध्ये शिंदे गटाकडून सचिन भोईर हे उमेदवार असून त्यांच्यासमोर परिवर्तन आघाडीकडून अक्षय तिटकारे हे राष्ट्रवादीचे उमेदवार उभे आहेत. तर, या ठिकाणी माजी सरपंच अरुण भोईर हे अपक्ष उमेदवार आहेत. माणगाव तर्फे वरेडीमध्ये महेश विरले हे शिंदे गटाकडून तर ठाकरे गटाकडून संदेश हजारे अशी सरळ लढत होत आहे. उकरूल या गणामध्ये ठाकरे गटाकडून नमिता श्रीखंडे तर महायुतीकडून भाजपच्या सुप्रिया भगत आणि मनसे कडून प्रियांका पाटील या निवडणुकीला सामोरे जात आहेत.











● कावीर जिल्हा परिषद मतदार गटातील शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार मोहन धुमाळ, तसेच कावीर पंचायत समिती गणातील उमेदवार अनिल पाटील व पंचायत समिती रामराज गणातील उमेदवार अंजली पाटील यांच्या प्रचाराला मोठ्या प्रमाणात उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. प्रचारदरम्यान त्यांचे जल्लोषात स्वागतही केले जात आहे.

# त्या भीषण अपघातानंतर

अजित पवार यांच्या सुन्न करणाऱ्या अपघाती निधनातून राजकीय महाराष्ट्राला सावरणे सोपे जाणार नाही. याला काही दिवस लागतील. या निधनानंतर राजकारण पुढे कसे वळण घेणार याचा सध्या कोणी विचारही करण्याच्या अवस्थेत नाही अशी स्थिती आहे. गेल्या चार वर्षात अजितदादांनी महाराष्ट्राच्या राजकारणाला अनेक धक्के दिले. आधी पहाटेचा शपथविधी, नंतर तीन दिवसांनंतरची माघार, आणि नंतर पुन्हा राष्ट्रवादी फोडून भाजपसोबत युतीमध्ये जाणे याने महाराष्ट्र ढवळून निघाला. त्याच दादांनी काल आणखी एक भयानक धक्का दिला. या धक्क्याने राज्यातली समीकरणे पुन्हा एकदा आरपार बदलणार आहेत. मात्र त्यांची दिशा काय असेल हे कळण्यासाठी काही दिवस थांबावे लागेल. अजितदादा व शरद पवार यांचे गट महापालिका निवडणुकीत एकत्र आले होते व आता जिल्हा परिषदाही ते एकत्रितच लढवत होते. आता दादांचा गट एकत्र ठेवू शकेल असा कोणी नेता त्यांच्याकडे नाही. त्यामुळे त्यांना पुन्हा बहुदा शरद पवार यांचे बोट पकडावे लागेल अशी शक्यता आहे. पण खुद्द शरद पवारांचा सार्वजनिक वावर कमी झाला होता. पुण्यात पालिकेच्या निवडणुका स्वतःच्या बळावर लढवण्याचा पुणे शहर अध्यक्ष प्रशांत जगताप यांचा आग्रह होता. तो शरद पवार यांनी ऐकून घेतला होता. पण नंतर त्यांनी या प्रक्रियेतून अंग काढून घेतले. सुप्रिया सुळे व इतरांनी युतीचा निर्णय घेतला. याचा परिणाम म्हणून प्रशांत जगताप रागावून काँग्रेसमध्ये निघून गेले. या सर्व काळात पवार कुठेही दिसले नव्हते. अजित पवार हे राजकीयदृष्ट्या दुरावलेले पुतणे होते हे खरे. पण बारामतीचे राजकारण, त्यांचा सहकारातील वारसा इत्यादी चालवण्यास तेच सर्वाधिक सक्षम आहेत हे पुन्हापुन्हा सिद्ध झाले होते. शरद पवार तर त्यांना अक्षरशः लहानपणापासूनच पाहत आले होते व त्यांनीच तर त्यांना शिकवून राजकारणात आणले. त्यामुळे ते दादांच्या क्षमता चांगल्या जाणून आहेत. आपल्या पुढच्या पिढीत अचानक निर्माण झालेली ही पोकळी प्रचंड हादरा देणारी आहे. या प्रसंगातून मार्ग काढणे हे अत्यंत दुःखदायक असे काम पवारांच्या खांद्यावर या वयात व या स्थितीत येऊन पडले आहे.

## घातपाताच्या शंका

दरम्यान, कालच्या अपघाताने इतर अनेक गंभीर प्रश्न निर्माण केले आहेत. या दुर्घटनेची बातमी आल्यानंतर कोट्यवधी मराठी माणसांच्या मनात, हा घातपात असावा अशी पहिली प्रतिक्रिया उमटली. त्यानंतर विमान वाहतूक नियंत्रकांकडून जी माहिती प्रसिध्द करण्यात आली त्यावरून प्रथमदर्शनी तरी तो अपघात असावा असेच दिसते. यात काही घातपात नाही व त्याचे कोणी राजकारण करू नये असे खुद्द शरद पवार यांनी म्हटले आहे. पुतण्याच्या निधनाचा भयंकर आघात सहन करीत असतानाही हे निवेदन करण्यासाठी ते कॅमेरासमोर आले. बारामतीच्या विमानतळावर बुधवारी पुरेशी दृश्यमानता नव्हती, वैमानिकाला धावपट्टी दिसली नाही, नंतर विमान अचानक खाली कोसळले या गोष्टी आता सर्वत्र प्रसिध्द झाल्या आहेत. या विमानतळावर एअर ट्रॅफिक कंट्रोलरची प्रगत यंत्रणा नव्हती हेही उघड झाले आहे. विमान चालवणारा वैमानिक अत्यंत अनुभवी होता. तरीही कोणत्या तरी टप्प्यात त्याच्याकडून चूक झाली किंवा विमानामध्ये काहीतरी तांत्रिक बिघाड झाला असे आतापर्यंतच्या बातम्यांवरून दिसते. आता याची सविस्तर चौकशी होऊन लवकरात लवकर तिचा अहवाल बाहेर येईल अशी आशा करूया. तो आला तरच विमान, वैमानिक किंवा विमानतळ यामध्ये जे काही दोष असतील ते दूर करता येतील. भविष्यात असे अपघात होऊ नयेत म्हणून काळजी घेता येईल. दुर्दैवाने आपल्याकडे याकडे फारच गहाळपणे पाहिले जाते. दादा ज्या विमानाने गेले ते पुरवणारी कंपनी दिल्लीची होती. त्याच कंपनीच्या याच प्रकाराच्या एका विमानाला मुंबई विमानतळावर दोन वर्षांपूर्वी अपघात होऊन त्याचे दोन तुकडे झाले होते. त्याच्या चौकशीचा अहवाल आजतागायत आलेला नाही. गेल्या वर्षी अहमदाबाद इथे एअर इंडियाचे विमान नेमके का कोसळले याची कारणे अजूनही कळलेली नाहीत. त्यापूर्वी आपले माजी लष्करप्रमुख अशाच एका विमान अपघातात मारले गेले. त्यावेळी वैमानिकाची चूक झाली असे म्हणून विषय संपवण्यात आला. दादांच्या अपघाताबाबत तसे होऊ नये.

## राजकारण बदलायला हवे

राजकीय नेत्यांचे सततचे दौरे आणि प्रवास याबाबत आता त्यांनीही विचार करण्याची गरज आहे. दादा जिल्हा परिषदांच्या निवडणुकांच्या प्रचारासाठी निघाले होते. बारामती परिसरामध्ये ग्रामीण भागात चार ठिकाणी ते सभा घेणार होते. एका पक्षाचे प्रमुख आणि राज्याचे उपमुख्यमंत्री असलेल्या दादांनी इतक्या खेड्यापाड्यात जाऊन अशा सभा किती कराव्यात याचा विचार करायला हवा. शिवाय हा परिसर बारामतीचा म्हणजे त्यांचा बालेकिल्ला मानला जाणारा आहे. पण नेता गावात आल्याखेरीज लोकांना प्रचार झाल्यासारखा वाटत नाही. पक्षापक्षांमधील स्पर्धा इतकी वाढली आहे की, दुसऱ्या बाजूने देवेंद्र व एकनाथ शिंदेदेखील हेच करतात. खुद्द आपले पंतप्रधान, ट्रम्पने तिकडे भारताची कितीही अब्रू घालवली तरीही, इकडे बिहार किंवा बंगालच्या प्रचारात मग्न दिसतात. मागे हैदरराबाद पालिकेच्या प्रचाराला अमित शाह, योगी असे लोक गेले होते. तिरुवनंतपुरम पालिका जिंकली तर पंतप्रधानांनी मोठमोठ्या शुभेच्छा दिल्या. एकूण दिल्लीपासून गावापर्यंत आपलीच सत्ता आणि नियंत्रण असायला पाहिजे या हव्यासामुळे भाजपने राजकारण म्हणजे युद्धभूमीवरचा चिखल करून टाकला आहे. दादांचा अपघात म्हणजे या राजकारणाचाच अप्रत्यक्ष बळी आहे असे म्हणायला हवे. दरम्यान हा अपघात हा असंख्य लोकांना वाटतो आहे तसा घातपात नसेलही कदाचित. पण हा घातपात असावा अशी शंका तात्काळ व एकाच वेळी सर्वांच्या येणे यावरून भाजप राजवटीकडे लोक कशा रीतीने पाहतात हे समजून यावे. दिल्लीत मोदी व मुंबईत फडणवीस यांच्या काळात काहीही होऊ शकते, पक्ष कसेही कधीही फोडले जाऊ शकतात, कोणावरही कधीही धाडी पडू शकतात हे यापूर्वी बोलले जात होते व तसे दिसत होतेच. आता इथे अपघात झाला तर तो ठरवून केला गेला असेल अशी शंका बहुसंख्य लोकांच्या मनात येऊ लागली आहे. हे काही चांगले लक्षण नाही. आता दादांच्या निधनानंतर तरी हे राजकारण स्वतःला सावरणार का हा खरा प्रश्न आहे. भाजपच्या दिल्लीश्वरांनी युती मजबूत असतानाही एकनाथ शिंदे यांना शह देण्यासाठी अजितदादांना तिच्यात सामील होऊ दिले. एवढेच नव्हे तर दादा आल्यानंतर पहिल्याच झटक्यात त्यांना अर्थमंत्रिपद आणि नऊ कॅबिनेट मंत्रिपदे दिली गेली. लोकसभेला दादांचा काही उपयोग झाला नाही. विधानसभेला मात्र दादांनी स्थिती सुधारली. आता दादा गेल्यामुळे त्यांच्या पक्षाची अवस्था दोर तुटलेल्या पतंगासारखी होण्याचा धोका आहे. भाजप या स्थितीत कसा वागतो याकडे सर्वांचेच लक्ष राहणार आहे.

विचार

# ट्रम्प वाढवताहेत जागतिक अस्वस्थता

***अमेरिकेचे विक्षिप्त अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प कधी कोणता निर्णय घेतील, कौतुक करता करता कधी पायाखाली घेतील, याचा भरवसा नाही. ज्या जागतिक संस्थांच्या स्थापनेत पुढाकार घेतला, आठ दशके नेतृत्व केले, त्याच संस्थांमधून अमेरिका आता बाहेर पडत आहे. ट्रम्प यांच्या या बाबतीतील घोषणेचे अनेक परिणाम संभवतात. ते समजण्यासाठी वेळ लागेल; परंतु या स्वार्थी ट्रम्पनीतीमुळे अवघे जग गोंधळात पडले आहे.***



आरिफ शेख

अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणाची दिशा आणि त्याचा जागतिक परिणाम मुख्यत्वे अमेरिकेच्या देशांतर्गत राजकारणात काय घडत आहे, यावर अवलंबून असणार आहे. आंतरराष्ट्रीय संबंधांची रचना लक्षणीयरीत्या बदलली आहे. त्यात वेगाने बदल होत आहे. जगातील सर्वात शक्तिशाली देश परिस्थिती बदलू लागतो किंवा व्यवस्था अस्थिर करू लागतो, तेव्हा इतर देशांच्या रणनीतीदेखील अस्थिर होतात. हे संक्रमण आणि हा गोंधळ आज जगभर दिसून येतो. प्रत्येक अमेरिकन प्रशासनाला अमेरिका अव्वल स्थानी रहावी, असे वाटते. ओबामा प्रशासन असो किंवा बायडेन प्रशासन; प्रत्येकाने अमेरिकन सैन्य जगातील नंबर एक लष्करी शक्ती रहावी हे सुनिश्चित करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. अमेरिकेचे संरक्षण बजेट नेहमीच जगातील इतर देशांपेक्षा लक्षणीयरीत्या जास्त राहिले आहे. ट्रम्प त्यांचाच वारसा पुढे चालवत आहेत. त्यात अधिक एकाधिकारशाही आणि मी म्हणेन तीच पूर्वदिशा, असे सूत्र आहे. अमेरिका ही दीर्घकाळापासून जगातील सर्वात शक्तिशाली लष्करी शक्ती आहे आणि ट्रम्प असो किंवा त्यांच्यानंतर कोणीही असो; कोणत्याही अमेरिकन सरकारला ही परिस्थिती बदलावी असे वाटणार नाही; पण खरा प्रश्न हा आहे, की ती लष्करी शक्ती कशी वापरली जाईल? येत्या काही वर्षांमध्ये खर्च वाढेल की नाही हा प्रश्न अधिक महत्त्वाचा असेल; परंतु ती लष्करी शक्ती कशी तैनात केली जाईल, अमेरिकन शक्ती कशी वापरली जाईल आणि जागतिक व्यवस्थेच्या स्थिरतेवर, अंदाज आणि संतुलनावर त्याचा काय परिणाम होईल, हा सर्वात मोठा प्रश्न आहे. त्यावर आपल्याला अधिक लक्ष केंद्रित करावे लागेल.

डोनाल्ड ट्रम्प नेहमीच काही मुद्द्यांवर स्पष्टपणे बोलत राहिले आहेत. त्यांच्या मते, बहुपक्षीय मंच अमेरिकन सार्वभौमत्वाला कमकुवत करतात आणि त्यांच्या 'मेक अमेरिका ग्रेट अगेन' अजेंड्याशी थेट संघर्ष करतात. या दृष्टिकोनामुळे त्यांना अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांपासून माघार घ्यावी लागली आहे. त्यापैकी अनेक संयुक्त राष्ट्रांच्या प्रणाली अंतर्गत येतात. भूतकाळात त्यांच्या प्रशासनाने अमेरिकेला हवामानबदलावरील पॅरिस करारासारख्या चौकटीतून बाहेर काढले आहे, संयुक्त राष्ट्रांसह आंतरराष्ट्रीय देयके थांबवली आहेत आणि जागतिक व्यापार संघटनेला प्रभावीपणे अपंग केले आहे; परंतु त्यांची नवीनतम कृती आणखी पुढे जाते. हे लक्षात घेण्यासारखे आहे, की अमेरिकन राजकारणात संयुक्त राष्ट्रांच्या विरोधी प्रवृत्ती आहे. ट्रम्प चळवळीला जन्म देणाऱ्या कट सिद्धांतांचा हा एक सततचा भाग आहे. शिवाय, मुख्य प्रवाहातील अमेरिकन राजकारणीदेखील आंतरराष्ट्रीय न्यायालयासारख्या संघटनांमध्ये सामील होण्यास सावध राहिले आहेत. त्यांना वाटते, की ते अमेरिकेत असंवैधानिक असेल किंवा त्यांच्या सार्वभौमत्वाला कमकुवत करेल. ट्रम्प केवळ अमेरिकन राजकारणातील विद्यमान ट्रेंड एक पाऊल पुढे घेऊन जात आहेत. हे देखील लक्षात घेण्यासारखे आहे, की ज्यो बायडेन पॅरिस करारात पुन्हा सामील झाले; परंतु त्यांच्या पूर्वसुरींनी जागतिक व्यापार संघटनेला केलेले नुकसान भरून काढण्यासाठी त्यांनी कोणतेही पाऊल उचलले नाही. म्हणून, या नवीनतम बदलाचे विश्लेषण ट्रम्प यांच्या परदेशी लोकांबद्दलच्या स्पष्ट नापसंतीपेक्षा अधिक खोलवर केले पाहिजे.

या यादीतील काही संस्था निष्क्रिय किंवा तुलनेने निरुपयोगी मानल्या जाऊ शकतात; परंतु सर्वच संस्थांच्या बाबतीत तसे म्हणता येत नाही. 'संयुक्त राष्ट्रांचे हवामानबदल फ्रेमवर्क कन्व्हेन्शन' (यूएनएफसीसीसी) आंतरराष्ट्रीय स्तरावर हवामान कृतीवर सहकार्यासाठी पाया म्हणून काम करते. त्यातून पूर्णपणे माघार घेणे, तसेच शास्त्रज्ञांनी पाहिलेल्या जागतिक तापमानवाढीच्या प्रत्यक्ष परिणामांवर सारांश अहवाल तयार करणाऱ्या आंतरसरकारी हवामानबदल पॅनेल (आयपीसीसी) मधून पूर्णपणे माघार घेणे अनपेक्षित आहे. सरासरी तापमानवाढ दोन अंश सेल्सिअसपेक्षा कमी ठेवण्याच्या उद्देशाने केल्या जात असलेल्या जागतिक प्रयत्नांना हा मोठा धक्का आहे. काही लहान संस्था, उदाहरणार्थ महिला आणि बाल आरोग्यावर काम करणाऱ्या संस्थांना ट्रम्प यांच्या निर्णयाचा मोठा फटका बसेल. त्या मिळणारा निधी पूर्णपणे गमावू शकतात. युरोपीय महासंघ इतर विकसित देशांना या गमावलेल्या क्षमतेची आणि निधीची भरपाई करण्यासाठी मोठा भार सहन करावा लागेल. अमेरिकेच्या या माघारीमुळे या संघटनांच्या वैधतेवर आणि ते प्रतिनिधित्व करत असलेल्या आंतरराष्ट्रीय व्यवस्थेवरदेखील परिणाम होईल का, हा खरा प्रश्न आहे; परंतु सध्या तरी हे अशक्य दिसते. ट्रम्प अमेरिकेचे वर्चस्व राखण्यासाठी आंतरराष्ट्रीय व्यवस्थेला पुन्हा आकार देण्याचा आणि पुनर्रचना करण्याचा प्रयत्न करू शकतात; परंतु आतापर्यंत त्यांची कृती पूर्णपणे विनाशकारी ठरली आहे. ते जागतिक प्रशासन कमकुवत करू शकतात; परंतु ते विद्यमान व्यवस्थेची वैधता कमी करत नाहीत.

ट्रंप खरोखरच कट्टरपंथी असतील, तर निधी आणि इतर वचनबद्धतेसह एक आकर्षक पर्याय दिला पाहिजे. हे घडताना दिसत नाही. परिणामी, कालांतराने अमेरिकेने सोडून दिलेली भूमिका बजावण्यासाठी चीन पुढे येईल. दुसऱ्या शब्दांमध्ये सांगायचे तर, ट्रम्प अमेरिकन सार्वभौमत्व मजबूत करत नाहीत, तर त्यांचे वर्चस्व त्यांच्या सर्वात मोठ्या धोरणात्मक प्रतिस्पर्ध्याला देत आहेत. ट्रम्प यांच्या एका मोठ्या आणि आश्चर्यकारक निर्णयामुळे जागतिक राजनैतिक क्षेत्रात खळबळ उडाली आहे. अमेरिकेने ६६ आंतरराष्ट्रीय संस्था आणि उपक्रमांमधून माघार घेण्याची घोषणा केली आहे. त्यात ३१ संयुक्त राष्ट्रांशी संलग्न संस्थांचा समावेश आहे. संयुक्त राष्ट्रांनी स्पष्टपणे सांगितले आहे, की अमेरिका कायदेशीररित्या संयुक्त राष्ट्रांच्या संस्थांना निधी देण्यास बांधील आहे. न्यूयॉर्कमधील संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी ट्रम्प यांच्या निर्णयाबाबत खेद व्यक्त केला. सदस्य राष्ट्रांनी संयुक्त राष्ट्रांच्या नियमित बजेट आणि शांतता मोहिमांसाठी दिलेला निधी हा पर्याय नसून संयुक्त राष्ट्रांच्या चार्टरअंतर्गत कायदेशीर बंधन आहे. हे बंधन अमेरिकेसह सर्व सदस्य राष्ट्रांना लागू होते. या संस्थांमधून बाहेर पडताना ट्रम्प प्रशासन म्हणते, की या संस्था अमेरिकेच्या राष्ट्रीय हितांविरुद्ध काम करत आहेत आणि जागृत अजेंड्याला प्रोत्साहन देत आहेत. अमेरिकेने आंतरराष्ट्रीय सौर आघाडी, हवामान बदलावरील आंतरसरकारी पॅनेल, आंतरराष्ट्रीय नवीकरणीय ऊर्जा संस्था आणि हवामान बदलावरील संयुक्त राष्ट्र फ्रेमवर्क कन्व्हेन्शनमधूनही माघार घेतली आहे.

अमेरिकेने हवामान करारांमधून माघार घेण्याचा हा निर्णय अनपेक्षित मानला जात नाही, कारण ट्रम्प यांनी यापूर्वी पॅरिस हवामान करारातून अमेरिकेला माघार घ्यायला लावली होती. अमेरिकेच्या माघारीनंतरही संयुक्त राष्ट्रांनी काम सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला. 'यूएनएफसीसीसी'चे प्रमुख सायमन स्टील यांनी इशारा दिला, की हवामान संकट अधिकाधिक गंभीर होत असताना या निर्णयामुळे अमेरिकेची अर्थव्यवस्था, रोजगार आणि राहणीमानाचे नुकसान होईल. तथापि, संयुक्त राष्ट्रांनी असेही म्हटले आहे, की भविष्यात अमेरिकेला पुन्हा सामील होण्यासाठी दार उघडे आहे. ट्रम्प यांनी स्वाक्षरी केलेल्या निवेदनानुसार अमेरिका राष्ट्रीय हिताच्या विरुद्ध असलेल्या संस्थांपासून स्वतःला दूर करत आहे. या निर्णयात ३५ गैर-संयुक्त राष्ट्र संघटना आणि ३१ संयुक्त राष्ट्रांशी संलग्न संस्थांचा समावेश आहे. यामध्ये पर्यावरण, हवामान, ऊर्जा, कामगार, स्थलांतर आणि सामाजिक विकासाशी संबंधित अनेक प्रमुख जागतिक मंचांचा समावेश आहे. संयुक्त राष्ट्र लोकसंख्या निधी, संयुक्त राष्ट्र पाणी, संयुक्त राष्ट्र ऊर्जा आणि आंतरराष्ट्रीय व्यापार केंद्र यासारख्या संस्थांवरही याचा परिणाम होईल. या आदेशात सर्व अमेरिकन विभागांना निधी आणि सहभाग तात्काळ बंद करण्याची प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. 'अमेरिका फर्स्ट' घोषणा करता करता अमेरिकाच जगात एकटी पडण्याचा धोका आहे. तात्कालिक फायद्यासाठी जागतिक नेतृत्व गमवण्याचा धोका अमेरिकेने पत्करला आहे.

चर्चा आजची

# वातावरण बदलाचा आरोग्यावर परिणाम



वैभव पाटील

नववर्षाच्या सुरुवातीलाच राज्यात काही ठिकाणी झालेल्या जोरदार पावसामुळे थंडीचा जोर कमी झाला. डिसेंबर महिन्यात तुलनेने अधिक गारठा जाणवत होता, मात्र जानेवारीमध्ये थंडी टिकेल, असा अंदाज प्रत्यक्षात खरा ठरलेला नाही. उलट तापमानात वाढ झाल्याने उष्णता जाणवत असून काही शहरांमध्ये वाढलेले वायू प्रदूषणही चिंतेचा विषय ठरत आहे. गेल्या काही दिवसांपासून हवामानात मोठ्या प्रमाणावर चढ-उतार जाणवू लागले आहेत. एकीकडे दिवसा उन्हाची तीव्रता वाढत असताना संध्याकाळनंतर गारवा जाणवतो. या बदलत्या हवामानामुळे सामान्य नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होऊ लागला आहे. शहरातील सरकारी तसेच खासगी रुग्णालयांमध्ये सर्दी, खोकला, ताप आणि ॲलर्जी यांसारख्या रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. घशात खवखव किंवा दुखणे, सर्दी, नाक वाहणे, कोराडा किंवा कफयुक्त खोकला, श्वास घेताना घरघर, डोकेदुखी, अंगदुखी, थकवा अशी लक्षणे या आजाराची आहेत. हवामानातील अचानक होणारे बदल आणि शरीरातील इम्युनिटी यातील असंतुलन यामुळे हे आजार वेगाने पसरत आहेत. हवामानातील बदल आणि त्याचा आरोग्यावर होणारा परिणाम ही बाब सामान्य असली तरी त्याकडे दुर्लक्ष करणे योग्य नाही. प्रकृतीशी संबंधित कोणतेही रोगाचे लक्षण आढळल्यास वैद्यकीय सल्ला घेणे गरजेचे आहे. व्हायरल आजार मोठ्या प्रमाणावर दिसून येत असून दम्याच्या रुग्णांनीही अधिक सतर्कता बाळगणे गरजेचे आहे. लहान मुले, वृद्ध व्यक्ती आणि दीर्घकालीन आजारांनी त्रस्त असलेले रुग्णांना या काळात विशेष सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे. सकाळ-संध्याकाळ तापमानात होणाऱ्या फरकामुळे शरीराची नैसर्गिक प्रतिकारशक्ती कमी होते आणि त्यामुळे संसर्गजन्य आजार पटकन होतात. हवामान बदलाचा आपल्या वयावरही परिणाम होत आहे. शतकापूर्वी लोक दीर्घायुष्य जगत होते, पण आता तसे राहिलेले नाही. आपले शरीर कायमच तेथील हवामानाशी कार्यक्षमतेने जुळवून घेते. मात्र जेव्हा तापमानात मोठा बदल होतो तेव्हा त्याचा आरोग्यावर मोठा परिणाम होतो. अनेकांना उष्णता वाढली की, शरीरात वेगवेगळे बदल होतात. एवढेच नव्हे तर अभ्यासानुसार, अति तापमानामुळे मृत्यूचे प्रमाण वाढू शकते. या काळात सौम्य ते गंभीर आजारांना देखील अनेकांना सामोरं जावं लागतं. यामध्ये उष्मामुळे येणारे पेटके, उष्मा थकवा, उष्माघात, हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोग, श्वसन रोग आणि मधुमेह-संबंधित त्रासांचा समावेश आहे.

विकासाच्या नावाखाली मानवाने जंगले तोडून येथे घरे व उद्योग उभारले आहेत. दुसरीकडे, हे सर्व प्राणी बदलत्या हवामान परिस्थितीशी जुळवून घेत आपल्या वातावरणात राहत आहेत. त्यांच्यापासून अनेक रोग पसरत आहेत, जे आपल्या जीवनासाठी धोकादायक आहेत. तसेच धुळीमुळे वातावरण दूषित होत असून, प्रदूषित हवेमुळे मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहेत. धुळीमुळे दीर्घकालीन आरोग्याच्या समस्येने श्वसनक्रियेत अडचणी निर्माण होत असून, प्रचंड धुळीमुळे श्वसनाचे विकार वाढीस लागले आहेत. काहींना सर्दी, खोकला, घसा दुखण्याचे आजार होऊ लागले आहे. दिवसा उन्हाचा चटका अन् रात्री अचानक वाढणारी थंडी यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होताना दिसत आहे. बदलते हवामान, तापमानातील सततच्या चढ-उतारामुळे श्वसनविकाराच्या रुग्णांचे प्रमाण वाढले आहे. पालिकेच्या रुग्णालयासह खासगी दवाखान्यांत घसा आणि श्वसनाचा त्रास असलेल्या रुग्णांची संख्या वाढली आहे. सध्या दिवसाच्या आणि रात्रीच्या तापमानात मोठा फरक जाणवत आहे. दिवसा कोरडी आणि उष्ण हवा, तर रात्री थंड व दमट वातावरण असते. त्याचा परिणाम येथील नागरिकांवर होत आहे. हवामानातील बदलामुळे रोगप्रतिकारशक्ती कमी होऊन संसर्ग होत असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. सर्दी, खोकला, ताप, घसा खवखवणे, श्वास घेण्यास त्रास अशी लक्षणे असलेले रुग्ण मोठ्या प्रमाणात रुग्णालयांत उपचार घेत आहेत. या हवामान बदलाचा विशेष परिणाम लहान मुले, ज्येष्ठ नागरिक यांच्यासह दमा, लर्जी आजारांनी बाधित रुग्णांवर होत आहे. ओपीडीमध्ये घशात खवखव, कोरडा खोकला, श्वास घेण्यास त्रास अशा तक्रारी घेऊन येणाऱ्या रुग्णांची संख्या वाढली आहे. सध्याच्या वातावरणात किरकोळ लक्षणांकडे दुर्लक्ष करू नये. सर्दी, खोकला किंवा श्वसनाचा त्रास दोन-तीन दिवसांपेक्षा जास्त राहिल्यास तत्काळ वैद्यकीय सल्ला घ्यावा.


लोकसंसद

## ... यांची रवानगी पाकिस्तानात करावी !

२६ जानेवारीच्या दिवशी लहान मुलांनी हातात राष्ट्रध्वज घेऊन काढलेल्या फेरीला विरोध करून त्यांना मारहाण केल्याची घटना वाचनात आली. घाटकोपर येथील नित्यानंद नगर परिसरात प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून लहान मुलांनी काढलेल्या फेरीमध्ये 'भारतमाता की जय' घोषणा दिल्या ज्या सहन न झाल्याने एका धर्मांधाने फेरी थांबवून मुलांना मारहाण केली. या घटनेचे पडसाद परिसरात उमटले आणि मोठ्या प्रमाणात वादावादी झाली. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला ज्यामध्ये सदर परिसरातील अनेक धर्मांध हातात काठ्या वगैरे घेऊन हल्ला करण्याच्या तयारीत दिसत आहेत. थोड्याच दिवसांपूर्वी मुंब्रा परिसरातील नवनिर्वाचित नगरसेविका सहर शेख हिने संपूर्ण मुंब्र्याला हिरवा करण्याची भाषा केली होती. त्यानंतर आता मुंबई उपनगरातील भरगच्च वस्ती असलेल्या घाटकोपरमध्ये प्रजास्ताक दिनानिमित्त काढलेल्या ध्वज फेरीला विरोध केला जातो. या घटना नेमके काय प्रतीत करत आहेत. भारतमाता की जय बोलल्याने ज्यांना पोटशूल उठतो त्यांचीं निष्ठा नेमकी कोणत्या देशाशी आहे हे वेगळे सांगायला नको. स्वातंत्र्यानंन्तर देशाची धर्माच्या आधारावर फाळणी झाली. बहुसंख्य मुस्लिमांना स्वतंत्र पाकिस्तान मिळाला. आता भारतात राहुन ज्यांना आपला परिसर हिरवा करायचा आहे, ज्यांना भारताचे राष्ट्रीय सण सहन होत नाहीत, ज्यांना भारतमातेचा जयजयकार सहन होत नाही अशांना भारताने तरी का म्हणून पोसावे? प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी धार्मिक विद्वेष पसरवू इच्छिणाऱ्या या धर्मांधांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा अथवा त्यांची रवानगी थेट पाकिस्तानात करण्यात यावी! **– मोक्षदा घाणेकर, मुंबई**

दिनविशेष

# महात्मा गांधी शहीद दिन



आज राष्ट्रपती महात्मा गांधी यांची पुण्यतिथी आहे. जगभरातून बापूंना आदरांजली वाहिली जात आहे. महात्मा गांधी हे अहिंसेचे पुजारी होते. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. तरीदेखील त्यांची हत्या करण्यात आली. दिल्लीच्या बिर्ला भवन येथे प्रार्थनेसाठी गेलेल्या महात्मा गांधींवर नथुराम गोडसे या माथेफिरूने गोळ्या झाडून हत्या केली. परंतु, अहिंसेचे पुजारी महात्मा गांधी यांची हत्या का करण्यात आली? हा प्रश्न आजही भारतीयांना सतावत आहे. भारत-पाकिस्तान फाळणी झाल्यानंतर पाकिस्तानला भारताकडून ५५ कोटी रुपये देण्यात यावे, अशी मागणी पाकिस्तानने केली होती. पाकिस्तानची ही मागणी भारताने नाकारली होती. पाकिस्तानला ५५ कोटी रुपये देण्यात यावे, यासाठी महात्मा गांधी यांनी उपोषण केले. त्यामुळे गांधीजींच्या आग्रहाखातर भारताला पाकिस्तानला ५५ कोटी रुपये द्यावे लागले. दरम्यान, याच काळात हिंदू-मुस्लिम वाद चिघळला होता. पाकिस्तानमधून भारताकडे येणाऱ्या रेल्वे गाड्यांमध्ये शेकडो हिंदूंचे प्रेत दररोज येत होते. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची ३० जानेवारी १९४८ रोजी हत्या करण्यात आली होती. महात्मा गांधी हे अहिंसेचे पुजारी होते. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. तरीदेखील त्यांची हत्या करण्यात आली. दिल्लीच्या बिर्ला भवन येथे प्रार्थनेसाठी गेलेल्या महात्मा गांधींवर नथुराम गोडसे या माथेफिरूने गोळ्या झाडून हत्या केली. नथुराम गोडसेने अगोदर महात्मा गांधी यांचे चरण स्पर्श करण्याचे नाटक केले. त्यानंतर गांधीजींवर धडाधड तीन गोळ्या झाडल्या. या हल्ल्यामध्ये महात्मा गांधी यांचा जागीच मृत्यू झाला.

भारत-पाकिस्तान फाळणी दरम्यान, महात्मा गांधी यांनी हिंदू-मुस्लिम यांच्या वास्तव्याविषयी महत्त्वाचा निर्णय घेतला होता. जे हिंदू पाकिस्तानात वास्तव्यास असतील आणि त्यांची इच्छा पाकिस्तानात राहायची असेल तर ते तिथेच कायमस्वरुपी राहू शकतात. त्याचप्रकारे जे मुस्लिम भारतात राहत असतील आणि त्यांची भारतातच राहण्याची इच्छा असेल, तर तेदेखील भारतात कायमस्वरुपी राहू शकतात, असा निर्णय गांधीजींनी घेतला होता. याच निर्णयांवर नथुराम गोडसेच्या मनात गांधीजींबाबत द्वेष निर्माण झाला. नथुराम गोडसे हे कट्टर हिंदुत्ववादी होता. महात्मा गांधी हे मुस्लिम धर्माच्या भल्यासाठी निर्णय घेत आहेत, असा समज नथुराम गोडसेचा झाला आणि यातूनच त्याने महात्मा गांधी यांच्या हत्येचा कट रचला. दिल्लीच्या बिर्ला भवन येथे ३० जानेवारी १९४८ रोजी नथुराम गोडसेंने महात्मा गांधींवर धडाधड तीन गोळ्या झाडून नथुराम गोडसेने गांधीजींची हत्या केली. महात्मा गांधी यांच्या हत्येमध्ये कोण आणि कोणत्या संघटनांचा हात होता, याबाबत बराच काळ वाद सुरू आहे. पण कायदेशीरदृष्ट्या या हत्याकांडात न्यायालयाने ६ जणांना दोषी ठरवले होते. ज्यामध्ये नथुराम गोडसे, नारायण दत्तात्रेय आपटे, विष्णू आर करकरे, मदनलाल पाहवा, शंकर किस्तैया आणि गोपाल गोडसे यांचा समावेश होता.

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)** ९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते

**सौ. मेधा मेहुल पाटील, वाढदिवस अलिबाग**



**कै. शांताराम कमळ माळवी, स्मरणार्थ, धोकवडे, अलिबाग**

# अनधिकृत हातभट्ट्यांवर कारवाई

## • नायगाव पोलिसांकडून तीन लाख ६७ हजारांचा मुद्देमाल जप्त

**। वसई । प्रतिनिधी ।**

नायगाव परिसरात सुरू असलेल्या बेकायदेशीर हातभट्ट्यांवर नायगाव पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने धडक कारवाई केली. कामण येथील बेलकडी जंगल भागात टाकण्यात आलेल्या छाप्यांमध्ये दोन अवैध दारूभट्ट्या उद्ध्वस्त करण्यात आल्या. या कारवाईत तीन लाख ६७ हजार ७०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी तीन व्यक्तींविरोधात नायगाव पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.



कामण येथील बेलकडी जंगल भागात बेकायदेशीर हातभट्ट्यांचा व्यवसाय सुरु असल्याची गुप्त माहिती नायगाव पोलिसांना मिळाली होती. मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, बेलकडी जंगल परिसरात छापा टाकला असता राजेश हडळ हा बेकायदेशीररीत्या गावठी दारू तयार करत असल्याचे समोर आले. त्यानुसार पोलीस पथकाने छापा टाकत एका दारूभट्टीवर कारवाई केली. या कारवाईत सुमारे ३०० लिटर तयार गावठी दारू, २४०० लिटर नवसागर मिश्रित तयार गुळाचा नाशवंत वॉश, १४ रिकामे ड्रम तसेच भट्टीसाठी लागणारे लाकुड जप्त करण्यात आले.

तसेच, याच जंगल परिसरात काष्टीच्या नाल्याजवळ चंद्रकांत खरपुडे व संतोष मलाचकर हे दारू निर्मिती करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. मिळलेल्या माहितीनुसार त्या ठीकाणीही छापा टाकून एक हातभट्टी उद्ध्वस्त करण्यात आली.

या कारवाईत अंदाजे २५० लिटर गावठी दारू, ३२४० लिटर नाशवंत वॉश, एक डोल, १८ रिकामे ड्रम, भट्टीसाठी लागणारे लाकूड आणि दोन प्लास्टिकचे कॅन जप्त करण्यात आले. दोन्ही कारवायांमध्ये एकूण ३ लाख ६७ हजार ७०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या कारवाईत सपोनि गणेश केकान, ज्ञानेश्वर आसबे, शेखर पवार तसेच सचिन मोहिते, चेतन ठाकरे, सचिन खंताळ, अमर पवार, अशोक पाटील आणि पांडुरंग महाले यांचा समावेश होता.

### दारू व्यवसायिकांमध्ये भीतीचे वातावरण

अवैध हातभट्टी व्यवसायामुळे परिसरात गुन्हेगारी, आरोग्यधोके आणि सामाजिक अस्थिरता वाढत असून अनेक कुटुंबांचे आयुष्य उद्ध्वस्त होत आहे. अशा बेकायदेशीर व्यवसायांवर वेळोवेळी कठोर कारवाई करणे गरजेचे असून पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे अवैध दारू व्यवसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## शर्मिला पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुका पंचायत समितीत प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. अलिबागच्या कन्या तथा प्रशासक आणि गट विकास अधिकारी शर्मिला पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीताचे गायन करण्यात आले. यावेळी ‘भारत माता की जय’, ‘वंदे मातरम्’ अशा देशप्रेमी घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. याप्रसंगी गटविकास अधिकारी शर्मिला पाटील यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना प्रजासत्ताक दिनाचे ऐतिहासिक महत्त्व विषद केले. भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला दिलेले अधिकार व कर्तव्ये यांची जाणीव ठेवून सर्वांनी प्रामाणिकपणे आपले कर्तव्य



बजावावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

## तालुकास्तरीय कवायती स्पर्धेत
# अग्रवाल विद्यामंदिर, कनिष्ठ महाविद्यालय प्रथम

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

प्रजासत्ताक दिनानिमित्त तालुका स्तरावर घेण्यात आलेल्या कवायती स्पर्धेत कोकण एज्युकेशन सोसायटीच्या नागोठण्यातील कै. बापूसाहेब देशपांडे विद्या संकुलातील गु.रा. अग्रवाल विद्यामंदिर व एस.पी. जैन कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी रोहा तालुक्यात प्रथम क्रमांक मिळविला.

श्रीमती आनंदीबाई प्रधान विज्ञान महाविद्यालय, श्रीमती गुलाबबाई रामनिवास अग्रवाल विद्यामंदिर व कै.सरेमल प्रतापमल जैन कनिष्ठ महाविद्यालय तसेच कै.अमरचंद जेठमल जैन प्राथमिक शाळा नागोठणे येथे प्रजासत्ताक दिनाचा ७७ वा वर्धापन दिन साजरा



करण्यात आला. यावेळी राष्ट्रगीत, राज्य गीत, ध्वजगीत देशभक्तीपर गीत सादर करण्यात आले. तसेच संविधान रॅली काढण्यात आली. त्यानंतर मान्यवरांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांनी कवायती सादर केल्या. या कवायतीसाठी उच्च माध्यमिक विभागाच्या प्राध्यापिका सविता गोळे आणि भाविक सुतार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून कवायतीची संपूर्ण तयारी करून घेतली होती. या कवायतींचा व्हिडिओ तयार करून तो स्पर्धेसाठी पाठविण्यात आला होता. त्यामधून नागोठण्यातील बापूसाहेब देशपांडे विद्यासंकुलातील विद्यार्थ्यांचा कवायतींचा व्हिडिओ अव्वल ठरला.

## एसटी दुचाकीचा भीषण अपघात

**रत्नागिरी :** डफळचोळ वाडी येथून रत्नागिरीच्या दिशेने दिलीप सखाराम आंबेकर (४२) आणि रंजन महादेव खापरे (५६) हे दोघे बुधवारी सायंकाळी दुचाकीवरून निघाले होते. त्याचवेळी हातखंबा येथून रत्नागिरीकडे जाणारी एसटी बस येत होती. डफळचोळ वाडीच्या रस्त्यावरून मुख्य रस्त्यावर येत असताना दुचाकीला एसटी बसची जोरदार धडक झाली. या धडकेत दिलीप आंबेकर व रंजन खापरे यांच्या पायाला गंभीर दुखापत होऊन दोघांचेही पाय फ्रॅक्चर झाले. अपघाताची माहिती मिळताच ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमींना तात्काळ जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. या अपघाताची नोंद ग्रामीण पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

## चौक शाळेत संविधान दालनाचे उद्घाटन

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषद आदर्श शाळा चौक येथे अनोखे संविधान दालन सुरू करण्यात आले आहे. शाळेत आदर्श आणि अनोखा उपक्रम सुरू झाल्याने विद्यार्थी, पालक, नागरिक यांच्यात शाळेविषयी आदराची भावना निर्माण झाली आहे.

प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर जि.प. आदर्श शाळा चौक येथे संविधान दालनाचे उद्घाटन करण्यात आले. भारतीय संविधानाची मूल्ये, लोकशाहीची जाणीव आणि नागरिकांचे हक्क व कर्तव्ये, संत, समाजसेवक, सुधारकांच्या विचारांचा वारसा



नागरिक व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने हे दालन उभारण्यात आले आहे.

या कार्यक्रमास डॉ.सचिन सोनावणे, सरिता चौधरी, डॉ. स्वरांजली, रंजना साखरे, सुदेश महागावकर उपस्थित होते. शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थ, पालक सहभागी झाले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते सादर केली. मराठी व इंग्रजीतून भाषणे केली. तसेच, देशभक्तीपर गीतांवर लेझिम व कवायत संचलन केले. साहसी मनोरे विद्यार्थ्यांनी सादर केले. संविधान दालनामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूल्यांची रुजवण होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## आपटा येथे विविध ठिकाणी ध्वजारोहण

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

आपटा येथील रायगड जिल्हा परिषद मराठी शाळा येथे मुख्याध्यापक हसुराम पाटील यांनी झेंडावंदन केले. यावेळी शाळा कमिटी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यानंतर आपटा ग्रामपंचायत येथे सरपंच वंदना शरद वाघे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी आपटा ग्रामस्थ सर्व सदस्य, ग्रामस्थ आणि ग्रामसेवक कैलास मोरे व इतर सर्व कर्मचारी कामगार उपस्थित होते. तर कोकण एज्युकेशन सोसायटी आपटा येथे प्रभारी मुख्याध्यापक झेमसे यांनी ध्वजारोहण केले. येथे शाळेचे सर्व संचालक शाळा कमिटीचे सदस्य,



ग्रामस्थ सर्व मोठ्या संख्येने उपस्थित होते. झेंडावंदनानंतर सर्वांना मुलांना खाऊचे वाटप करण्यात आले.

## तरुणाचा बुडून मृत्यू

**खेड :** खेड तालुक्यातील वरवली जगबुडी नदीपात्रात आंघोळीस गेलेल्या ३० वर्षीय तरुणाचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. संतोष दगडू आखाडे (रा. वरवली-सुतारवाडी) असे मृत तरुणाचे नाव आहे. बराच कालावधी लोटूनही संतोष घरी न आल्याने त्याचे वडील दगडू आखाडे त्याला शोधण्यासाठी नदीपात्राजवळ गेले. त्यांना नदीपात्राच्या कडेला दगडावर कपडे व चपला ठेवलेल्या दिसल्या. त्यांनी आजूबाजूला पाहिले असता तो पाण्यात तरंगताना दिसला.

# रिक्षाचालकांचा मनमानी कारभार

## जवळच्या भाड्याला नकार; प्रवाशांमध्ये नाराजी

**। पालघर । प्रतिनिधी ।**

वसई विरार परिसरात रिक्षाचालकांकडून जवळचे भाडे नाकारण्याचे प्रकार सातत्याने वाढताना दिसत आहेत. त्यांच्या या मनमानी कारभाराचा मोठा फटका प्रवाशांना बसत आहे. रेल्वे स्थानकाबाहेर किंवा मुख्य चौकात रिक्षा उपलब्ध असतानाही जवळच्या परिसरात जाण्यासाठी रिक्षाचालक सरळ नकार देत आहेत. नालासोपारा व विरार रेल्वे स्थानक परिसरात उतरलेल्या प्रवाशांनी जवळचे भाडे सांगितले की, अनेक रिक्षाचालक ‘ड्यूटी



संपली’, ‘इंधन नाही’ किंवा त्या परिसरात रिक्षा जाणार नाही, अशी करणे देत रिक्षा नेण्यास टाळाटाळ करतात. मात्र लांब पल्ल्याचे भाडे समजताच तेच रिक्षाचालक तात्काळ प्रवासासाठी तयार होतात. परिणामी अनेक प्रवाशांना बराच वेळ रिक्षाची वाट पहावी लागते. तर काहींना नाईलाजाने पायीच प्रवास करावा लागत असल्याने प्रवाशांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे.

वसई विरार परिसरात मीटरप्रमाणे रिक्षा चालत नसल्याने शेअर रिक्षाचाच पर्याय उरतो. मात्र शेअर रिक्षामध्ये आवश्यक प्रवासी भरपाईपर्यंत थांबावे लागते, त्यामुळे नागरिकांचा वेळ वाया जातो. रिक्षात फक्त ३ प्रवासी प्रवास करू शकतात तरीही काही ठिकाणी चार ते पाच प्रवासी बसवले जात असल्याचे चित्र आहे. वाहतूक नियमांनुसार मिटरप्रमाणे भाडे घेणे बंधनकारक असतानाही वसई विरारमध्ये मात्र अजूनही शेअर रिक्षाच असल्याचे दिसून येते. विशेषत: बाहेरगावाहून आलेल्या प्रवाशांना स्थानिक दाराची माहिती नसल्याने त्यांची आर्थिक फसवणूक केली जात असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत.

दरम्यान, रिक्षाचालकाने भाडे नाकारल्यास किंवा जास्त भाडे अकरल्यास प्रवाशांनी रिक्षाचा क्रमांक, वेळ व ठिकाणची नोंद घेऊन आरटीओ कार्यालयात लेखी, फोन किंवा ई-मेलद्वारे तक्रार करावी, असे आवाहन आरटीओ अधिकाऱ्यांनी केले आहे.

**रस्त्यावरील गर्दी कमी होण्यास मदत** | **आधुनिक सुविधांमुळे पादचाऱ्यांना दिलासा**

# वांद्रे येथील नवीन आकाश मार्गिकेचे लोकार्पण

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

वांद्रे (पूर्व) येथील वांद्रे न्यायालय, वांद्रे-कुर्ला संकुल, म्हाडा तसेच जिल्हाधिकारी कार्यालयात ये-जा करणाऱ्या नागरिकांच्या सोयीसाठी नवीन आकाश मार्गिकेचे लोकार्पण माननीय माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते सोमवारी (दि.२६) करण्यात आले. माननीय उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत ही उच्च प्रतीची, दीर्घकाळ टिकणारी व आधुनिक सुविधांनी युक्त आकाश मार्गिका उभारण्यात आली आहे.



या लोकार्पण सोहळ्यास स्थानिक आमदार वरुण सरदेसाई, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर, उप आयुक्त (पायाभूत सुविधा) गिरीश निकम तसेच एच पूर्व विभागाच्या सहायक आयुक्त मृदुला अंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी आकाश मार्गिकेचे कामकाज विक्रमी वेळेत पूर्ण करणारे कार्यकारी अभियंता नामदेव रावकाळे, सहायक अभियंता प्रशांत जावळे, दुय्यम अभियंता अमित दसूरकर यांचा पालकमंत्री शेलार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी पालकमंत्री शेलार म्हणाले की, मुंबई उपनगरातील पायाभूत सुविधा अधिक सक्षम, सुरक्षित आणि नागरिक केंद्रित करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने वांद्रे (पूर्व) येथील वांद्रे रेल्वे स्थानक (पूर्व) ते पश्चिम द्रुतगती महामार्गावरील कलानगर जंक्शन दरम्यान उभारण्यात आलेली नवीन आकाश मार्गिका नागरिकांच्या सेवेसाठी सज्ज करण्यात आली आहे. रेल्वे स्थानकाच्या पादचारी पुलाशी थेट जोडणी असल्यामुळे तसेच पश्चिम द्रुतगती महामार्ग येथे सुरक्षित रस्ता ओलांडण्याची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे पादचाऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. या आकाश मार्गिकेमुळे वांद्रे (पूर्व) परिसरातील पादचारी वाहतूक अधिक सुरक्षित होईल. प्रवासाचा वेळ वाचेल आणि अनंत काणेकर रस्त्यावरील गर्दी लक्षणीयरीत्या कमी होण्यास मदत होईल, असे त्यांनी नमूद केले.

अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त अभिजीत बांगर म्हणाले की, वांद्रे रेल्वे स्थानक (पूर्व) ते म्हाडा कार्यालय, पश्चिम पूर्व महामार्ग, वांद्रे न्यायालय, वांद्रे-कुर्ला संकुलच्या वाणिज्यिक परिसरातील पादचाऱ्यांसाठी ही आकाश मार्गिका उपयुक्त ठरणार आहे.

### निगराणीसाठी सीसीटीव्ही कॅमेरे

वांद्रे रेल्वे स्थानक (पूर्व) पासून पश्चिम द्रुतगती महामार्गावरील कलानगर जंक्शन पर्यंतची नवीन आकाश मार्गिका एकूण ६८० मीटर लांबीची व सरासरी ५.४० मीटर रूंदीची आहे. पादचाऱ्यांच्या विविध ठिकाणांहून सहज प्रवेशासाठी ४ जिने आहेत. सुलभ मार्गक्रमण करण्यासाठी २ स्वयंचलित सरकत्या जिन्यांची जोड आहे. सुरक्षितता आणि निगराणीसाठी १४ सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत.

## निवडक



### प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**कोलाड :** आंबेवाडी येथील एमपीएसएस इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून कोलाड हायस्कूलमधील महाराष्ट्र बोर्डाचे चीफ कंडक्टर सेवानिवृत्त माननीय मोहन थोरबोले तसेच कोलाड हायस्कूलमधील सेवा सेवानिवृत्त वरिष्ठ लेखनिक माननीय उदय घोसाळकर हे उपस्थित होते. शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली महाडिक यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. मुख्याध्यापिका वैशाली महाडिक यांच्या हस्ते ध्वज फडकविण्यात आला. यानंतर कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत, ध्वजगीत तसेच राज्यगीताच्या सामूहिक गायनाने झाली. यावेळी विद्यार्थ्यांनी राष्ट्रभक्तीपर गीतांवर सामूहिक कवायत प्रकार, देशभक्तीपर गीतांचे गायन केले. त्याचप्रकारे देशभक्तीपर नाटिका, नृत्य, स्वातंत्र्य सैनिकांच्या वेशभूषा विद्यार्थ्यांनी उत्कृष्ठ प्रकारे सादर केल्या. या कार्यक्रमाला माजी विद्यार्थी तसेच पालक वर्ग देखील उपस्थित होते.



### भारतीय संविधानाचे सामूहिक वाचन

**पाली :** भारतीचा ७७ वा प्रजासत्ताक दिन अखंड भारत देशात उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. सुधागडात रायगड जिल्हा परिषद शाळा भेरवमध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात व आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांसमवेत शिक्षक व ग्रामस्थांनी ध्वजारोहण केले. तिरंगी ध्वजाला सलामी देत राष्ट्रगीत घेण्यात आले. याबरोबरच भारतीय संविधानाचे सामूहिक वाचन देखील केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी कवायती करून कार्यक्रमाची सांगता केली.



### स्वप्नपूर्ती ग्रह संकुलात संविधान वाचन

**पनवेल :** प्रजासत्ताक दिनानिमित्त स्वप्नपूर्ती ग्रह संकुल खारघर या ठिकाणी प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी पनवेल महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक तीनचे नगरसेवक तुषार परशुराम पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर भारतीय संविधान घोषिकेचे सामुदायिक वाचन करण्यात आले. यावेळी स्वप्नपूर्तीमधील नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



### विद्यार्थ्यांकडून विविध कला सादरीकरण

**कोलाड :** रोहा तालुक्यातील खांब विभागातील मंजुळा नारायण लोखंडे एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीचे ज्ञानांकुर इंग्लिश स्कूल खांब येथे देशाचा ७७ प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. पुई गावचे सुपुत्र माजी सैनिक तथा रायगड पाटबंधारे कालप्रकल्प विभागाचे अधिकारी कालवा निरीक्षक निलेश मधुकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. प्रजासत्ताक दिनानिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध वेशभूषा परिधान करून विविध कला सादर करत मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेत प्रजासत्ताक दिनाबद्दलचे महत्व पटवून दिले. तसेच विविध कला सादर करत देशातील विविध राज्यातील वेशभूषा कल्चर याचे सादरीकरण केले. याप्रसंगी परीट सलामी, लेझिम, पालकांची बाईक रॅली, शेतकऱ्यांची बैल गाडी आणि विद्यार्थ्यांनी बळीराजासाठी केलेली कलाकृती ही शेतकरी पालकांसाठी प्रेरणादायी ठरली. तर उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक केले. यावेळी डॉ. श्यामभाऊ लोखंडे, संस्थापक अध्यक्ष रविंद्र लोखंडे, त्याच बरोबर प्रमूख पाहुणे लाभलेले माजी सैनिक निलेश दिसले उपस्थित होते. त्यांनी सांगितले की, विद्यार्थांनी चांगले शिक्षण घेतले पाहिजे. तसेच शिक्षणाबरोबरच कला कौशल्य जपली पाहिजे. तसेच, विद्यार्थ्यांनी कुठे ही कमी न पडता उत्तम शिक्षण घ्या, यश नक्की मिळेल, अशी भावना व्यक्त केली.

### चौक हायस्कूलमध्ये राष्ट्रध्वजाला वंदन

**चौक :** भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून चौकमधील सरनोबत नेताजी पालकर हायस्कूल व प्राथमिक विद्यामंदिर, शिशु मंदिरमध्ये ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी पहिली ते बारावीपर्यंतच्या सर्वच विद्यार्थ्यांनी राष्ट्रध्वजाला वंदना करून स्मृतीगीते सादर केले. बाजारपेठेत प्रभातफेरी काढण्यात आली. त्यानंतर चौकमधील दगडी शाळा, ग्रामपंचायतमध्ये ध्वजारोहण करून पुन्हा स.ने.पा. विद्या मंदिरात सर्व विद्यार्थी जमले. विशेष म्हणजे याप्रसंगी सर्व आजी-माजी विद्यार्थी विद्यार्थिनी हजर होते. विद्यार्थ्यांमध्ये असलेले विविध गुणांचा देखावा प्रसिद्ध करण्यात आला. अनेक प्रकारच्या कवायती, लेझीम, ढोल, गीते, एकपात्री एकांकिका यांचे सादरीकरण करण्यात आले. यावर्षी प्राथमिक विद्यामंदिर व शिष्य मंदिर आपल्या शिक्षण सेवेचे २५ व्या गौरवशाली वर्षात पदार्पण करीत आहे. विद्या प्रसारणी चौकच्या कार्याध्यक्ष शोभाताई देशमुख यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी अॅड. अविनाश देशमुख, नरेंद्र शहा, योगेंद्र शहा, राजेंद्र कापरेकर, दिवेश शहा, मुख्याध्यापिका शोभा, गायकवाड, सो. जांभळे, पर्यवेक्षक कांबळे, सामाजिक वनीकरण विभागाचे अरुण धुमाळ, भास्कर पवार तसेच अन्य शिक्षक, कर्मचारी वृंद उपस्थित होते.

## निवडक



### मुरुडमध्ये शोकसभेचे आयोजन

**आगरदांडा :** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आस्कमिक मृत्यू झाल्याने संपूर्ण राज्यात शोककळा पसरली. अजित पवार यांच्या अचानक निघून गेल्यामुळे मुरुड तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतर्फे मुरुड नगर परिषदेच्या प्रांगणात शोक सभेचे आयोजन नगर परिषदेच्या नगराध्यक्ष आराधना दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. यावेळी नगराध्यक्षा आराधना दांडेकर, उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत, संजय गुंजाळ, मंगेश दांडेकर, मनोज भगत, फैरोज घल्टे, अस्लम हलडे, अजित कासार, अविनाश दांडेकर, योगेंद्र गोयजी, दत्ता नाक्ती, तुकाराम पाटील, वासंती उमरोटकर, प्रमोद भायदे, आदेश दांडेकर, रशिद फहीम, प्रमिला माळी, विजय पैर आदी उपस्थित होते.

### स्वच्छतागृहामुळे प्रवाशांची गैरसोय दूर

**पनवेल :** खारघर येथील खारघर रेल्वे स्थानक परिसरात पालिकेकडून मोफत स्वच्छतागृह सुरू करण्यात आले आहे. त्याचा फायदा प्रवाशांना होत असून, त्यांच्याकडून समाधान व्यक्त केले जात आहे. खारघर रेल्वे स्थानकावरून दररोज हजारो प्रवासी, विद्यार्थी, नोकरदारवर्ग तसेच ज्येष्ठ नागरिक प्रवास करतात. मात्र, स्वच्छ आणि सुरक्षित शौचालयांची कमतरता असल्याने नागरिकांना गैरसोयींचा सामना करावा लागत होता. ही बाब लक्षात घेऊन पालिकेने मोफत स्वच्छतागृह सुरू केले. आधुनिक पद्धतीने बांधण्यात आलेल्या या स्वच्छतागृहात स्वच्छ पाणी, योग्य प्रकाशव्यवस्था, वायुवीजन, हात धुण्यासाठी बेसिन, सॅनिटायझर आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. स्वच्छता राखण्यासाठी नियमित साफसफाई तसेच देखभाल कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पालिकेच्या माध्यमातून खारघर रेल्वे स्थानकात मोफत स्वच्छतागृह सुरू करण्यात आले आहे. पालिकेच्या माध्यमातून स्वच्छतागृहाची देखभाल केली जाणार असल्याचे पनवेल महानगरपालिकेचे उपायुक्त वैभव विधाते यांनी सांगितले.

### पनवेलमधुन मोटारसायकलींची चोरी

**पनवेल :** पनवेल शहर परिसरातून दोन विविध ठिकाणी मोटारसायकलींची चोरी झाल्याची घटना घडली असून यासंदर्भात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात करण्यात आला आहे. पनवेल शहरातील मिडल क्लास सोसायटी येथील यशकमल सोसायटीमध्ये राहणारे संकेत राणे यांनी त्यांच्या राहत्या घराच्या पार्किंग परिसरात उभी करून ठेवलेली ७० हजार रुपये किमतीची काळा व ग्रे रंगाची एमएच ४६ एवाय ९१५० क्रमांकाची बजाज पल्सर एन एस २०० मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेली. तसेच दुसऱ्या घटनेत विचुंबे येथे राहणारे नवनाथ सोनावणे यांनी त्यांची निळया व सिल्वर रंगाची एमएच ४६ एएम ३३२८ क्रमांकाची १५ हजार रुपये किमतीची डिस्कव्हर एम १२५ मोटारसायकल पनवेल रेल्वे स्थानका बाहेरील साईमंदिरा जवळ मोकळया जागेत पार्किंग करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने चोरून नेली. या दोन्ही घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



### वाहतूक शाखातर्फे आरोग्य तपासणी

**पनवेल :** पनवेल शहर व नवीन पनवेल शहर वाहतूक शाखा अंतर्गत रक्तदान शिबिर व मोफत आरोग्य तपासणी शिबिर चे आयोजन डी वाय पाटील रुग्णालयातर्फे आयोजित करण्यात आले होते. सदर कार्यक्रमादरम्यान पनवेल शहर वाहतूक शाखा पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील, नवीन पनवेल वाहतूक शाखा पोलीस निरीक्षक प्रकाश सपकाळ तसेच पनवेल शहर वाहतूक शाखेचे अधिकारी व कर्मचारी हजर होते. या शिबिरामध्ये चर्म रोग, नेत्ररोग, जनरल मेडिसिन, हाडांचे तज्ञ, कान, नाक, घसा असे विविध आजारांची तपासणी करण्यात आली. या शिबिरात ६५ हुन अधिक नागरिक व वाहनचालकांची तपासणी करण्यात आली.


## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **बागायती वाडी विक्री** -१३ गुंठे (घर, नारळ, सुपारी, विहीर) @ २७ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक - सुहास माळी गाव- थळ, गुंजाळ आळी, अलिबाग मो. - ८७७९८०५३५३
- **घरकामासाठी सकाळच्या वेळेत बाई पाहिजे.** अर्धवेळसाठी ८ ते ११-३० स्थळ : पंतनगर, संपर्क : ८०९७२०५९३९, ९४२२३७५१२४
- **पाहिजे :** अलिबागमधील वृद्ध जोडप्यास भाजीबाजार आणून देण्यासाठी रोजच्या रोज दोन तासासाठी व्यक्ती, विद्यार्थ्यांस पसंती. पगार पाच हजार. संपर्क :८५३०३०९७६५
- We are inviting for internship to graduate candidates for share market trading.Stipend will be paid. For interview call 9923750549
- **पाहिजेत :** अलिबाग विभागासाठी सेल्समध्ये जॉब्स करण्यासाठी सुवर्णसंधी. फिक्स सॅलरी १५०००, २००००, २५००० + सुपर इन्सेंटीव्ह E Disha infotech या शैक्षणिक संस्थेत तातडीने पाहिजेत. Educational counselors/sales Executive-10 franchise-10 telecaller-2 Contact- 9082697644, 9372071769

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# पळस्पे गावात सांडपाणी नदीपात्रात

**।। नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर।। ग्रामस्थांची तीव्र नाराजी व्यक्त**

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पाण्याचा वापर मानवी जीवनास आवश्यक आहे. पाण्याच्या वापरानंतर जे पाणी अशुद्ध होउन पुनर्वापरास लायक नसते असे पाण्याला सांडपाणी पनवेल तालुक्यातील पळस्पे गावात सांडपाणी थेट नदीपात्रात सोडले जात असल्याने गावातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. याबाबत ग्रामपंचायत पळस्पेने रायगड जिल्हा अध्यक्ष शेतकरी सभेचे अनिल दंडेकर यांच्याकडे निवेदन सादर केले आहे.



पळस्पे हद्दीतून वाहणाऱ्या नदीपात्रात काही हॉटेल्स व निवासी संकुलांचे सांडपाणी थेट सोडले जात आहे. त्यामुळे नदीपात्रातील पाणी दूषित होऊन बंधाऱ्यांमध्ये साचत आहे. या दूषित पाण्याचा परिणाम शेतकऱ्यांच्या बोअरवेल्सवर तसेच नागरिकांच्या पिण्याच्या पाण्यावर होत असून अनेक ठिकाणी पाणी पूर्णतः खराब झाले आहे.

या सांडपाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असून संसर्गजन्य आजार पसरण्याचा धोका निर्माण झाला आहे. याबाबत ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. सांडपाण्याचा निचरा करण्यासाठी नदीपात्रात योग्य तांत्रिक पद्धतीने उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे ग्रामपंचायतीने नमूद केले आहे. दरम्यान, ग्रामपंचायतीमार्फत संबंधित विभागांना याबाबत तांत्रिक अंदाजपत्रक तयार करून देण्याची प्रक्रिया सुरू असून सार्वजनिक बांधकाम व ग्रामीण पाणीपुरवठा विभागाशी पत्रव्यवहार करण्यात येणार आहे. तसेच गावालगत सुरू असलेल्या अवैध बांधकामांमुळे नैसर्गिक पाण्याचे नाले बंद झाल्याने पावसाळ्यात घरांमध्ये व शाळांमध्ये पाणी शिरण्याची परिस्थिती निर्माण होत असल्याने शालेय विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होत आहे.

या सर्व बाबींची तातडीने दखल न घेतल्यास ग्रामपंचायत पळस्पे व ग्रामस्थांच्या वतीने जलसमाधी आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

**शोषखड्डे तयार करणे**

घरातील सांडपाण्याची योग्य पद्धतीने केलेली विल्हेवाट म्हणजे शोषखड्डा होय. सांडपाणी मुद्दाम तयार केलेल्या शोषखड्ड्यात सोडावे, तेथून ते जमिनीत मुरते. आंघोळीच्या मोरीतील, धुण्याभांडीच्या पाण्याचीही विल्हेवाट शोषखड्ड्याद्वारे होऊ शकते. वाळु असलेल्या, मुरमाड जमिनीत ह्या पाण्याचा चांगला निचरा होतो. पण चिकणमाती असलेल्या जमिनीत मात्र याचा फारसा उपयोग होत नाही. अशावेळी चर खणून पाण्याला दूर न्यावे लागते. त्यामुळे रस्त्यावरून वाहणाऱ्या पाण्यास आळा बसेल व त्यापासून रोगराई टाळण्यास मदत होते. त्यामुळे शोषखड्डे तयार करणे उपयोगाचे ठरते.

## माणगाव तालुक्यात कडकडीत बंद

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आकस्मिक निधनाचीबातमीमाणगावतालुक्यात पोहोचताच संपूर्ण परिसर शोकमग्न झाला. क्षणातच हसते-खेळते माणगाव स्तब्ध झाले. राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते, पदाधिकारीच नव्हे तर सर्वसामान्य नागरिकांनाही हा आघात सहन होणारा नव्हता. आपला माणूस गेला अशी भावना प्रत्येकाच्या मनात दाटून आली. गुरवारी (दि.२९) जानेवारी रोजी माणगावकरांनी कडकडीत बंद पाळून उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.





माणगाव शहरातील पाणीपुरवठा योजना, तहसील कार्यालय, पंचायतसमिती कार्यालय खारभूमी कार्यालय, नगरपंचायत इमारत, मुंबई-गोवा महामार्ग, माणगाव व इंदापूर बायपास, काळ व गोद नदीवरील पूल, द. ग. तटकरे महाविद्यालय, श्रीमती गीता तटकरे कॉलेज ऑफ नर्सिंग, अशोकदादा साबळे विधी महाविद्यालय अशा असंख्य पायाभूत, शैक्षणिक आणि सामाजिक विकास कामांमध्ये अजित पवार यांचे अमूल्य योगदान लाभले आहे. या प्रत्येक कामामागे दादांची दूरदृष्टी, जिद्द आणि जनतेप्रती असलेली बांधिलकी दडलेली आहे.

आधारवड अचानक हरपल्याने माणगाव तालुक्यात हळहळ व्यक्त करण्यात आली. अनेकांच्या डोळ्यांत अश्रू तरळत होते, तर अनेकांचे अश्रू मोकळेपणाने वाहत होते. अशा या लोकनेत्याला अखेरचा मान देण्यासाठी माणगाव तालुक्याने कडकडीत बंद पाळत, नतमस्तक होऊन, अश्रूंनी आणि ओल्या डोळ्यांनी अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

## मोठ्या बसेसमुळे स्थानिकांची डोकेदुखी

**पाच मिनिटांच्या प्रवासासाठी अर्धा ते पाऊण तास**

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन शहरात सहलीच्या येणाऱ्या मोठ्या बसेसमुळे स्थानिक नागरिकांना डोकेदुखी होत असल्याची बाब समोर आली आहे. कारण श्रीवर्धन शहरातील सर्वच रस्ते प्रचंड अरुंद आहेत. मोठ मोठ्या दोन बसेस समोरून आल्यानंतर त्या पास होताना दहा ते पंधरा मिनिटांचा कालावधी लागतो. एकावेळी एकाच विद्यालयाच्या किंवा महाविद्यालयाच्या पाच पाच बसेस लागोपाठ असतात. तर त्या अगोदर शहरात आलेल्या बाहेर पडणाऱ्या बसेस देखील रांगेमध्ये पाच ते सहा असतात. त्यामुळे सदरची वाहतूक कोंडी सुटण्यासाठी अर्ध्या तासापेक्षा जास्त वेळ जातो.



घरातून बाजारात दूध आणण्यासाठी गेलेल्या नागरिकाला देखील एक एक तास वाया घालवावा लागतो. वाहतूक कोंडीची ही समस्या लक्षात घेऊन श्रीवर्धन पोलिसांनी सहलीच्या येणाऱ्या बसेस श्रीवर्धन बस स्थानकामध्येच थांबवून विद्यार्थ्यांना पायी समुद्रकिनाऱ्यापर्यंत पाठवावे. अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे. जे विद्यार्थी श्रीवर्धन येथे वस्तीसाठी असतात अशाच लोकांच्या बसेस शहरामध्ये पाठवाव्या. जे सहलीला येणारे विद्यार्थी फक्त समुद्रकिनारा पाहून लगेच परत जाणारे असतात अशा सहलींच्या बसेस श्रीवर्धन स्थानकावर उभ्या करून ठेवाव्यात. जेणेकरून श्रीवर्धनमधील स्थानिक नागरिकांना या सहलींचा त्रास होणार नाही.

या येणाऱ्या सहलींपासून श्रीवर्धनमधील स्थानिक नागरिकांना एक रुपयाचा देखील फायदा नसतो. कारण या ठिकाणी येणाऱ्या बहुतांश सहलींचे आयोजक उघड्यावरती अन्न शिजवून विद्यार्थ्यांना जेवण वाढतात. त्यामुळे या ठिकाणच्या हॉटेल व्यवसायिकांना कोणत्याही प्रकारचा धंदा उपलब्ध होत नाही. श्रीवर्धन नगरपरिषद प्रशासनाने देखील रस्ता रुंदीकरण करण्याकडे तातडीने लक्ष द्यावे. जेणेकरून श्रीवर्धनमधील वाहतूक कोंडीची समस्या सुटेल. रस्ता रुंदीकरणासाठी लोकांच्या जागेवरती खुणा देखील करून ठेवलेल्या आहेत. परंतु स्थानिक प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे रस्त्याचे रुंदीकरण रखडून पडलेले आहे. तरी नगर परिषदेने रस्ता रुंदीकरणाचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा, अशी मागणी श्रीवर्धनच्या नागरिकांमधून व्यक्त केली जात आहे.

## आगरी समाज संस्थेतर्फे हळदीकुंकू





**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

आगरीसमाजसंस्था आयोजित पारंपारिक हळदीकुंकू समारंभ रविवारी (दि.१८) जानेवारी रोजी आनंदनगर येथील श्रीमत् अथर्व फिटनेस सेंटर येथे अत्यंत उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला आगरी समाजातील माता, भगिनी मोठ्या संख्येने उस्फूर्त प्रतिसाद दिला.

याप्रसंगी आगरी समाज संस्थेच्या सभासद तथा अलिबाग नगरपरिषदेच्या नवनिर्वाचित नगरसेविका सुषमा पाटील तसेच उपनगराध्यक्षा मानसी म्हात्रे, चिंचवली ग्रामपंचायतीच्या सदस्या दीप्ती पाटील यांचा आगरी समाज संस्था महिला आघाडीच्या वतीने सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमात वाण म्हणून महिलांना रोपं देण्यात आली. याद्वारे पर्यावरण संरक्षणाचा संदेश देत आगरी समाज संस्थेची सामाजिक बांधिलकी अधोरेखित करण्यात आली. या उपक्रमाचे सर्व उपस्थितांनी विशेष कौतुक केले. हा संपूर्ण कार्यक्रम महिलांनीच आयोजित केला असून त्याचे सुयोग्य नियोजन व यशस्वी आयोजन करण्यासाठी दिपश्री पाटील, सुप्रिया ठाकूर, दर्शना पाटील, दीप्ती पाटील, प्रीती पाटील, प्रमिला शेळके, प्रणिता पाटील, रेश्मा म्हात्रे व जागृती पाटील यांनी परिश्रम घेतले.

## जंजिरा मुक्ती संग्राम दिन शासकीय मान्यतेच्या प्रतीक्षेत

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

स्वातंत्र्योत्तर भारताच्या एकीकरण प्रक्रियेत महत्त्वपूर्ण ठरलेला जंजिरा संस्थानाचा भारतात विलिनीकरणाचा दिवस दि.३१ जानेवारी १९४८, आजही शासकीय मान्यतेच्या प्रतीक्षेत आहे. या ऐतिहासिक दिनास 'जंजिरा मुक्ती संग्राम दिन' म्हणून शासकीय पातळीवर साजरा करण्यात यावा, अशी मागणी रायगड प्रेस क्लब सह मुरूड, श्रीवर्धन, म्हसळा तालुका प्रेस क्लबची आहे. या संदर्भातील निवेदन रायगड जिल्हाधिकाऱ्यांना नुकतेच सादर करण्यात आले आहे. दि. ३१ जानेवारी १९४८ रोजी तत्कालीन जंजिरा संस्थानिक (नवाब) यांनी भारत सरकारसोबत Instrument of -cces-sion वर स्वाक्षरी केल्यानंतर जंजिरा संस्थान स्वतंत्र भारताचा अविभाज्य भाग बनले. या कालाधीत २९ जानेवारी १९४८ ला म्हसळा महाल कचेरीचा ताबा मोहनधारिया, नानासाहेब पुरोहीत, बापूसाहेब देशपांडे, हरीभाऊ भडसावळे,केशव खांबेटे वगैरे एक हजार ते दोन हजार सैनिकानी घेतल्याची नोंद मुंबई प्रांताचा तत्कालीन पंतप्रधान बाळासाहेब खेर यांच्याकडे गेली होती.या सर्व घटनाक्रमामुळे जंजिरा संस्थानाची स्वतंत्र सत्ता समाप्त होऊन भारतीय संघराज्यात त्याचे अधिकृत विलिनीकरण झाले. ही घटना केवळ रायगड जिल्ह्यासाठीच नव्हे, तर संपूर्ण देशाच्या इतिहासात स्वातंत्र्योत्तर एकीकरणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मानली जाते. या ऐतिहासिक पार्श्वभूमीची दखल घेत, गेल्या पंधरा वर्षांपासून रायगड प्रेस क्लब व तत्कालीन जंजिरा संस्थानातील मुरुड, श्रीवर्धन, म्हसळा तालुका पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने जंजिरा मुक्ती संग्राम दिन स्थानिक पातळीवर साजरा केला जातो.

मात्र, मराठवाडा मुक्ती संग्राम दिन (दि.१७) सप्टेंबर प्रमाणेच जंजिरा मुक्ती संग्राम दिनालाही शासनाने अधिकृत मान्यता द्यावी व शासकीय स्तरावर कार्यक्रमांचे आयोजन करावे, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या दिनास शासकीय मान्यता मिळाल्यास, रायगड जिल्ह्याच्या समृद्ध इतिहासाला योग्य तो सन्मान मिळेल, तसेच नव्या पिढीला स्थानिक इतिहास, स्वातंत्र्यलढा आणि राष्ट्रीय एकात्मतेचे महत्त्व समजण्यास मदत होईल, असे मत पत्रकार संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी रायगड यांचेजवळ व्यक्त केले.

### जयकृष्ण वटकोळींचा सेवापुर्ती सोहळा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील रामराज, कोळीवाडा ता. आलिबाग येथील जयकृष्ण विठोबा वटकोळी आरोग्य सेवेमध्ये आरोग्य सेवक या



पदावर १९९९ साली रूजू झाले होते. ते २६ वर्षाच्या प्रदिर्घ सेवेनंतर ३१ जानेवारी २०२६ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र मेंदडी येथून आरोग्य सहाय्यक या पदावरून सेवानिवृत्त होणार आहेत.

त्याचा सेवापुर्ती सोहळा शुक्रवार (दि.३०) जानेवारी रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र मेंदडी ता. म्हसळा येथे होणार आहे. ते शेतकरी कामगार पक्षाचे सदस्य म्हणून रामराज ग्रामपंचायतीतून निवडून आले होते.

**भव्य मिरवणूक काढून आनंद साजरा | काही दिवसात ओरिसा राज्यात प्रशिक्षणासाठी रवाना**

# श्रेयशची नौदलात सिनियर सेलरपदी निवड

**। धाटाव । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील धाटाव गावचा आणि मिरजमधील रॉयल ऑफिसर्स प्रेप्रोविरिटी अकॅडमीमध्ये शिक्षण घेऊन ध्येय गाठणारा विद्यार्थी श्रेयश उदय राणे याची भारतीय नौदलाच्या सिनियर सेलरपदी निवड झाली आहे. प्रामाणिकपणा, कष्ट, जिद्दीच्या जोरावर प्रचंड मेहनत घेऊन श्रेयशने घेतलेल्या उत्तुंग भरारीचे सर्वच स्तरातून कौतुक करण्यात येत असून निवड झाल्याचे समजताच त्याच्या मित्र परिवाराने ढोल ताशाच्या वादनात वाजत गाजत त्याची भव्य मिरवणूक काढून आनंद साजरा केला.



श्रेयश हा अत्यंत सामान्य आणि गरीब कुटुंबातून आलेला मुलगा आहे. राणे कुटुंबातील श्रेयशचे आजोबा सुरेश राणे आणि आजी सुरेखा यांचे प्रचंड प्रेम, वडील उदय आणि आई स्नेहल यांची मोलाची साथ त्याला शिकवीण्यात आधार ठरली. काका, काकीसह कुटुंबाने केलेले मार्गदर्शन आणि दिलेले प्रेम त्याला आवड निर्माण करण्यासाठी कारण ठरले. रोहा तालुक्यातील जगन्नाथ राठी समूहाच्या संस्थेत इंग्लिश मिडीयममध्ये श्रेयसने पहिलीपासून दहावी पर्यंत शिक्षण पूर्ण केले.त्यानंतर देशसेवेची आवड मनात ठासून भरल्यामुळे पुढील शिक्षण मिरजमधील रॉयल ऑफिसर्स प्रेप्रोविरिटी अकॅडमीमध्ये पूर्ण केले. याठिकाणी त्याला डॉ. गीतांजली शिंदे, सतीश पुणेकर, अमित पाटील, माधुरी नाईक यासह शिक्षक वर्गाचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

देशसेवेचा मनाशी सारखा ध्यास असल्यामुळे वाचनाच्या आवडितूच त्याला चांगला मार्ग मिळाला.त्याने मुंबईमध्ये बांद्रा येथे स्टेज १ ची परीक्षा दिली त्यानंतर मुंबईत कुलाबा येथे आयएनएस अँग्रेलो यासाठी सुद्धा परीक्षा दिली. या परीक्षेत त्याने चांगले गुण मिळवून उत्तीर्ण झाला.

कॉलेजमध्ये त्याने काही महत्वाची जबाबदारीही सांभाळली असून अनेक उपक्रमांमध्ये त्याने सक्रिय सहभाग घेतला होता.

श्रेयशने स्वतःच्या मेहनतीच्या बळावर मिळविलेले यश पाहून राणे कुटुंबाच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहतानाचे चित्र समोर आले. त्याला अनेकांनी कौतुकाची थाप दिली असून सर्वच स्तरातून कौतुक करण्यात आले आहे. पुढील काही दिवसात श्रेयस हा ओरिसा राज्यात चार महिन्यांच्या प्रशिक्षणासाठी जाणार असून त्यानंतर तिथूनच त्याला पोस्टिंग मिळणार आहे. त्याचा प्रामाणिकपणा, कष्ट करण्याची तयारी आणि जिद्द यामुळे तो सर्वांसाठी एक आदर्श बनला आहे.

> **"स्वतःचा, समाजाचा आणि देशाचा विकास साधत असताना देशसेवेला हातभार लावू शकण्यासारखे हे कार्य असल्याने कठोर परिश्रम आणि योग्य मार्गदर्शनाने कोणतेही ध्येय गाठता येते. यापुढे माझी जबाबदारी वाढणार असल्याने लेफ्टनंट, कमिशनर, मेजर सारख्या परीक्षेसाठी यापुढे मी प्रयत्नशील राहणार आहे."**
> –श्रेयश राणे

# संचमान्यतेनंतर शिक्षकांच्या बदल्या!

## आंतरजिल्हा बदल्यातून स्वजिल्ह्यात जाण्याचीही संधी ; आधी समायोजन मग रिक्त पदांची बिंदुनामावली

**। रायगड । प्रतिनिधी ।**

जिल्हा परिषदेच्या शाळांमधील शिक्षकांच्या बदल्या शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यावर मध्येच होतात. बदलीनंतर शिक्षकांना त्या शाळांमध्ये रुजू होण्यासाठी काही दिवस लागतात. शिक्षक मधूनच बदलून गेल्याचा परिणाम गुणवत्तेवरही होतो. या पार्श्वभूमीवर आता शिक्षकांच्या बदल्या ३१ मे पूर्वी होणार आहेत. तत्पूर्वी, संचमान्यतेनुसार रिक्त, अतिरिक्त पदांवर शिक्षकांच्या नेमणुका होतील. त्यानंतर रिक्त राहिलेल्या पदांची बिंदुनामावली निश्चित होऊन पहिल्यांदा जिल्हांतर्गत बदल्या होणार आहेत.

रायगड जिल्हा परिषदेच्या शाळा आहेत. त्याअंतर्गत हजारो शिक्षक कार्यरत आहेत. पण, यंदा पटसंख्या घटल्याने काही शिक्षक अतिरिक्त झाले आहेत. आता संचमान्यता झाल्यावर त्या अतिरिक्त शिक्षकांचे पहिल्यांदा समायोजन होईल. त्यानंतर रिक्त झालेल्या पदांची जातसंवर्गनिहाय माहिती संकलित केली जाणार आहे. बदलीपात्र शिक्षकांकडून त्यांची पसंती घेऊन बदली प्रक्रिया राबविली जाणार आहे. त्याच दरम्यान, २० ते २५ वर्षांपासून स्वत:च्या जिल्ह्यात बदली करून जाण्यास इच्छुक शिक्षकांना देखील आंतरजिल्हा बदलीच्या माध्यमातून एक संधी दिली जाण्याची शक्यता आहे.

### बिंदुनामावलीनंतर बदल्यांची कार्यवाही

**संचमान्यता आता अंतिम करण्याची कार्यवाही सुरू आहे. संचमान्यता अंतिम झाल्यावर रिक्त, अतिरिक्त जागांवर शिक्षकांचे समायोजन होईल. त्यानंतर रिक्त राहिलेल्या जागा बिंदु नामावलीनुसार भरणे, बदल्यांची कार्यवाही केली जाईल. असे शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले.**

### परजिल्ह्यांतील शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदल्या

**राज्यातील हजारो प्राथमिक शिक्षक घरदार सोडून परजिल्ह्यांमध्ये नोकरी करत आहेत. आपले वयोवृद्ध, आजारी आई-वडील, कुटुंबीयांपासून शेकडो किलोमीटर दूर आहेत. अनेक शिक्षक पती-पत्नी १५-२० वर्षे झाले परजिल्ह्यांत कार्यरत असून, बदलीने पती-पत्नी एकत्रीकरण होणे गरजेचे आहे. राज्यातील प्राथमिक शिक्षकांच्या बदलीचा सातवा टप्पा राबवावा, अशी मागणी शिक्षक सहकार संघटनेने राज्य शासनाकडे सातत्याने केली होती. त्यानंतर ग्रामविकास विभागाने ६ जानेवारी रोजी ऑनलाइन बैठक घेत आंतरजिल्हा बदलीला हिरवा कंदील दाखविला आहे. पण, यावरील शासनाचा निर्णय व्हायचा आहे.**

## नागरिकाची फसवणूक

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल तालुक्यातील करंजाडे येथील सेक्टर ७४ २-अ मध्ये राहणाऱ्या ५९ वर्षीय सेवानिवृत्त कर्मचाऱ्याची सायबर गुन्हेगारांनी फसवणूक केल्याची घटना घडली आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्याला शेअर बाजारात लाखांची ऑनलाइन अधिक नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवत अज्ञात सायबर गुन्हेगारांकडून फसवणूक झाली. सायबर गुन्हेगारांनी घेतलेल पैसे परत मिळाले नाहीत म्हणून ज्येष्ठ नागरिकाने थेट पनवेल शहर पोलिसांत आपली फिर्याद दाखल केली आहे.

## ‘संत साहित्य’ विषयावर ऑनलाईन व्याख्यान

**। तळे । प्रतिनिधी ।**

जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स, तळा येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग, सांस्कृतिक विभाग, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग तसेच ग्रंथालय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा २०२६ साजरा करण्यात आला. या उपक्रमाच्या अनुषंगाने बुधवारी (दि. २८) संत साहित्य या विषयावर ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

या ऑनलाईन व्याख्यानासाठी मार्गदर्शक म्हणून डॉ. ईश्वर रंगनाथ ढोले हे उपस्थित होते. आपल्या व्याख्यानात त्यांनी संतांनी आपल्या साहित्यातून सामान्य जनतेला आत्मज्ञान, सदाचार व माणुसकीचा संदेश दिला असून आजच्या स्पर्धात्मक व मूल्यसंघर्षाच्या काळात संत साहित्य अधिकच मार्गदर्शक ठरत असल्याचे नमूद केले. त्यांच्या अभ्यासपूर्ण व प्रेरणादायी भाषणामुळे उपस्थितांना संत परंपरेची सखोल ओळख मिळाली. त्यांनी आपल्या अभ्यासपूर्ण व्याख्यानातून संत साहित्याची परंपरा, सामाजिक आणि आध्यात्मिक मूल्ये तसेच आजच्या काळातील त्याचे महत्त्व यावर सखोल मार्गदर्शन केले.

प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. सचिन बांगाळे यांनी मराठी भाषा संवर्धनाचे महत्त्व विशद केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुरुषोत्तम मुळे, सदस्य, महाविद्यालय विकास समिती हे होते. अध्यक्षीय भाषणात पुरुषोत्तम मुळे यांनी संत साहित्याचे सामाजिक व मानवी मूल्य अधोरेखित केले. त्यांनी संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव व कान्होपात्रा यांच्या जीवनकार्य व अभंगांच्या उदाहरणांद्वारे भक्ती, समता, करुणा आणि सामाजिक न्याय यांचे महत्त्व विशद केले.

### जाहीर नोटीस

जिल्हा रायगड, तालुका अलिबाग पैकी मौजे चौल येथील पुढील वर्णनाची मिळकत श्री. गणेश यशवंत कुर्वे, श्री. बाळकृष्ण यशवंत कुर्वे आणि श्री. मनोहर यशवंत कुर्वे यांच्या सामाईक मालकीची आहे.

| गट क्रमांक. | क्षेत्र. हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ६२ | ०-१२-६० | |
| | पोटखराबा ०-०१-९० | ७=७८ |
| | एकूण ०-१४-५० | |

सदर मिळकतीपैकी ०-५-१० आर्स क्षेत्र आमचे अशील श्री. सचिन रघुनाथ लोहार यांनी विद्यमान वर नमूद मालकांकडून कायम विकत घेण्याचे ठरविले असून त्याबद्दल प्राथमिक बोलणी विद्यमान मालकांशी झाली आहेत. सदर मिळकत निर्वेध असलेची माहिती विद्यमान मालकांनी दिली आहे. तरी सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध, साठेकरार, कुळहक्क, लीज वगैरे हितसंबंध असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून आठ दिवसांचे मुदतीत सदर हक्क/हितसंबंध शाबीत होईल अशा स्वरूपात लेखी पुराव्यासह आमचेकडे दाखल कराव्यात. विहित मुदतीत काहीही हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध असल्याचे गृहीत धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकतींबाबत विचार केला जाणार नाही याबद्दल सर्वांनी नोंद घ्यावी.

३०/०१/२०२६

**ॲड. संजय आचार्य.**
चौल, अलिबाग.

### जाहीर हरकत

सर्व जनतेस सदरच्या जाहीर हरकतीने कळविण्यात येते की, आमचे अशिल सुलोचना रघुनाथ पोतदार व इतर राहणार २४०, बाजारपेठ चामुण्डा मंदिरासमोर किहीम ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या वडिलोपार्जित सामाईक मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रमांक | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| किहीम, ता.अलिबाग, जि.रायगड | ३२९ (जुना स.नं. १३३/२/अ) | ०-९६-३० | १६.४८ |
| | ५२२ | ०-०६-८० | २.०१ |

वर नमुद मिळकती आमच्या अशिलांच्या वडिलोपार्जित सामाईक मालकीच्या मिळकती आहेत. सदर मिळकतीच्या सातबारा सदरी अविनाश सदानंद बावकर, प्रकाश सदानंद बावकर, दिपा अरुण दाभोळकर, राजश्री राजाराम पाटील, सुनिल प्रभाकर बावकर, सुयोग प्रभाकर बावकर, नेहा नितीन चोणकर, श्रीकृष्ण भाऊराव बावकर, सुषमा यशवंत बावकर यांची नावे सातबारा सदरी असल्याचा गैरफायदा घेऊन वर नमुद मिळकतीमध्ये त्रयस्थ व्यक्तिचा हक्क निर्माण करु पहात आहेत. आमच्या अशिलांनी वर नमुद व्यक्ति विरुद्ध अलिबाग येथील उपविभागीय अधिकारी यांच्याकडे आरटीएस अपिल दाखल केले आहे. सदर अपिल अद्याप पर्यंत प्रलंबित आहे. त्यामुळे वर नमुद मिळकतीबाबत कोणीही व्यक्तीने, कपंनीने अथवा भागीदारी संस्थेने खरेदीचा करु नये. सदर मिळकतीबाबत कोणीही व्यवहार केल्यास आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व सदरच्या व्यवहाराविरुद्ध आमचे अशिल योग्य ती कायदेशीर कारवाई करतील याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि.३०.०१.२०२६

**ॲड.मच्छिंद्र एस.म्हात्रे**
शॉप नं.२, दुय्यम निबंधक
कार्यालय अलिबागच्या समोर
अलिबाग, जि.रायगड
मो.नं.९८९००७९३०२

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे तिवरे, ता. कर्जत, जि. रायगड, येथे असलेली खालील परिशिष्ठमध्ये वर्णनीलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी या जमीन मिळकतीचे विद्यमान मालक श्री. प्रभाकर तुळशीराम ठाकरे (ठाकूर) यांचेकडून कायम खरेदी करायचे ठरवले आहे.

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे तिवरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| गाव | सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| तिवरे | ३८/५ | ०.४७.६० या एकूण क्षेत्रापैकी श्री. प्रभाकर तुळशीराम ठाकरे (ठाकूर) यांचे नावे व ताबेकब्जात असलेले ०.२०.०० हे.आर.पॉ. इतके क्षेत्र विकत देणेचे ठरलेले आहे | ३.२८ |

सदरहू जमीन मिळकत ही त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांच्या मालकीची व कब्जा वहिवाटीची आहे असे ते सांगतात आणि तसे जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावरून सुद्धा ते दिसून येत आहे. सदर जमीन मिळकत त्यांच्याकडून आमचे अशीलांनी सर्व हक्कासह कायमस्वरूपी खरेदीखत द्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी, सदर जमीन मिळकतीत कुणाचा गहाण, दान, साठेकरार, बक्षीस, फरोक्तखत, लीज, हक्क, बोजा वगैरे किंवा कुणालाही कुठल्याही प्रकारची हरकत असल्यास तशी लेखी हरकत, पुराव्यानिशी, हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील पत्त्यावर पोहोचविणे. वरील मुदतीत कुणाची कुठल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहू जमीन मिळकत निर्वेध असल्याचे समजून सदरहू जमिनीच्या विक्रीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर कोणतीही हरकत ऐकली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत दि. ३०/०१/२०२६

**हरकत खालील पत्त्यावर नोंदवावी**
**ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस :- श्री.साई सावली, सो.लि.दुसरा मजला, ब्लॉक नं.१०,
कर्जत दिवाणी कोर्टासमोर, ता.कर्जत, जि.रायगड, पिन-४१०२०१.
मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमच्या अशिलांनी खालील वर्णन केलेली सामाईक मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. अतिश लक्ष्मण पडते, रा. गुंजीस, ता. अलिबाग, जि. रायगड, यांच्याकडून कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरविलेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| गुंजीस ता.अलिबाग | ४५/६/अ | ०-१९-०० पो.ख ०-०२-०० ०-२१-०० | ४-३१ |

वर नमुद मिळतीमधील वर नमुद विद्यमान मालकांचे क्षेत्र ०-०६-०० हे. आर, आकार १-३६ रु. पैसे ही मिळकत या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स् मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (७) सात दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यांत येईल, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दि. २९/०१/२०२६

सही/-
**ॲड. आसावरी सु. घरत**
मु.पो. वरसोली, अलिबाग
अलिबाग-रायगड

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

### पनवेल महानगरपालिका
### जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | कार्यकारी अभियंता, पनवेल महानगरपालिका, पनवेल. | ०१ जंगली, ०१ गुलमोहर व ०२ पेरु अशी ०४ झाडे तोडणी तसेच ०१ आंबा व ०१ बदाम अशी ०२ झाडे पुनर्रोपण अशी एकूण ०६ झाडे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील खारघर, सेक्टर-१०, प्लॉट नं. २५१ या भूखंडाच्या आवारातील ०१ जंगली, गुलमोहर व ०२ पेरु अशी ०४ झाडे तोडणी तसेच ०१ आंबा व ०१ बदाम अशी ०२ झाडे पुनर्रोपण अशी एकूण ०६ झाडे सामाजिक सभागृह बांधकाम करणेस बाधित होत आहेत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणी करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

सही /-
**उपायुक्त तथा वृक्ष अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**

**जा.क्र.**-PMC-PARK/25/2026-PTAD

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनांची मिळकती त्यांचे मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन:-**
**मौजे गौळवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर-पॉ | आकार रु-पै |
|---|---|---|---|
| ६८ | ८ | ०.२२.०० | ०-२२ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमांचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

मोबाईल :-
०९३२६२३६९२३
०९६८९६९९५९५

**ॲड. प्रवीण शांताराम खडे**
पत्ता:- २, ''लक्ष्मी सदन'', जुने एस. टी. स्टॅण्ड,
मु.पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल श्री. जेकब हाईम मल्याणकर, राहणार- मलके इझ्राइल, १ए/३०, किर्राथगाथ-८२०३०२६ इझ्राइल यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन आपणांस मी ॲड. धनराज केणी नोटीस देतो की,

आमच्या अशिलांनी मौजे पुगाव, ता. रोहा, जि. रायगड येथील सर्वे नं.४५, क्षेत्र ००-४९-० हे.आर.पॉ. सदरची मिळकत ही आमच्या अशिलांच्या मालकीची मिळकती देखभाल करणे व इतर शासकीय कामे करण्यासाठी व इतर कामासांठी आमच्या अशिलांनी कुलमुखत्यारपत्र दिलेले होते. आमच्या आशिलांनी दिनांक ०३/०६/२०२० रोजी वर वर्णन केल्या मिळकती संदर्भात नोएल सॅमसन चिंचोळकर पत्ताः पाली, ता. सुधागड, जि.रायगड ४१०२०५ यांस कुलमुखत्यारपत्र दिलेले होते. सदर कुलमुखत्यारपत्रानंतर आमच्या अशिलांना असे समजले आहे की, सदर कुलमुखत्यारपत्राच्या आधारे नोएल सॅमसन चिंचोळकर हे आमच्या अशिलांच्या अपरोक्ष कुलमुखत्याराचा गैरवापर करून वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात बेकायदेशीर कृत्य कराल याची दाट शक्यता आमच्या अशिलांना वाटत असल्याने व आमच्या अशिलांना खात्रीलायक समजली असल्याने आमच्या अशिलांनी दिनांक ०३/०६/२०२० रोजी नोएल सॅमसन चिंचोळकर यांस दिलेले कुलमुखत्यारपत्र सदरची नोटीस देऊन रद्द बादल करीत आहेत. याची नोंद घ्यावी.

तरी, ही नोटीस देण्यात येते की, आमचे अशिलांच्या वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत जर कुणीही कोणताही व्यवहार नोएल सॅमसन चिंचोळकर यांच्या सोबत किंवा यांच्या मार्फत ठरविला/केला तर सदरचा व्यवहार आमचे अशिल बंधनकारक राहणार नाही व तो व्यवहार बेकायदेशीर राहील याची नोंद घ्यावी.

ठिकाणः पनवेल
दिनांकः३०/०१/२०२६

सही/-
**ॲड. धनराज का. केणी**
पुष्कर सोसा, फ्लॅट नं.०२, प्रांत ऑफीस जवळ,
जुना ठाणा नाका रोड, पनवेल, ता. पनवेल,
जि. रायगड पिन ४१०२०६, मो.नं.९७०२४३९७८७

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्धारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली रापड जमिन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडून आमचे अशिल श्री. किशोर ज्ञानदेव पाटील, यांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचाही हरकत न आल्यास आमचे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या रापड जमिन मिळकत मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**मौजे :- माले, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत :-**

| मालकांचे नाव | स.नं./हिस्सा नं. | क्षेत्रः हे.आर.प्रति | आकार |
|---|---|---|---|
| श्री.सतिश सुधाकर मांडावकर | ५१/६ | ०-२२-०० पोटखराबा ०-०१-०० ०-२३-०० | ०.२५ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता : सदनिका क्रं.१०८,
पहिला मजला, विंग बी, लक्ष्मी अपार्टमेंट
बांधिवली, ता. कर्जत, जि. रायगड.
ठिकाण: कर्जत

सही
**ॲड. सुर्यकांत भाऊ मसणे,**
दिनांक : ३०/०१/२०२६
मो.नं.९९२२१५५१५३

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनांची मिळकती त्यांचे मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन:-**
**मौजे भालिवडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे आर पॉ | आकार रु-पै |
|---|---|---|---|
| ८७ | ४ | ०.१२.४० | ०.०९ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमांचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

मोबाईल:-
०९३२६२३६९२३
०९६८९६९९५९५

**ॲड. प्रवीण शांताराम खडे**
पत्ता:- २, ''लक्ष्मी सदन'',
जुने एस.टी.स्टॅण्ड, मु.पो.नेरळ,
ता.कर्जत, जि.रायगड.

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे किहीम, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक सौ. हबीबा लतीफ मेमन, रा. मिरची गल्ली, बाजारपेठ, अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड यांच्या मालकीहक्काची व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेली मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाचा करार विद्यमान मालकांबरोबर माझे अशिलांनी केला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा हवाला विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| | मौजे | सि.स.नं. | क्षेत्र (चौ.मी.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| १. | अलिबाग ता. अलिबाग | ४०३ | २३६.७९ | ३.०० |
| २. | अलिबाग ता. अलिबाग | ४०३ क | ३१६.०० | ०.०० |

वर नमूद संपूर्ण मिळकत व या मिळकतीमधील नगरपरिषद मालमत्ता घर क्र. ९२७ व ९२८ या घर मिळकतींसह

तरी सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, ताबा कब्जा, भाडेपट्टा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकतीबाबत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे गृहीत धरुन माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ३०/०१/२०२६

सही/-
**ॲड. विवेक रमेश साळवी**
दुय्यम निबंधक कार्यालयासमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, मौजे बामणोली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खाली नमूद केलेली शेतजमीन मिळकतीचे मालक श्री. किरण राघव म्हात्रे वगैरे यांस कडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे आमचे अशिलांनी ठरविले आहे.

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे. आर. | आकार |
|---|---|---|---|
| बामणोली, ता.अलिबाग | २३६ | जिरायत ०.२१.३० पो.ख ०.०५.८० एकूण क्षेत्र ०.२७.१० | ६.०६ |

सदर मालकांकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरवली आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी इतर सहमालकांच्या जबाबदारीसह आमच्या अशिलांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणत्याही प्रकारचे हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपली हरकत लेखी स्वरुपात कागदोपत्री पुराव्यांसह खरेदीदाराचे वकील खाली सही करणार व सदर वकीलांचे सहकारी यांसकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास वर नमुद मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदी खताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि. २७/०१/२०२६

**ॲड. सचिन ए.नाईक**
रा. तळवली, पो. खंडाळे,
अलिबाग मो. नं. ९२२५७३९८०४

करीता-दिलीप वसंत वाळंज, नागांव अलिबाग, मो.नं.८६९८८०२५०१

### जाहिर नोटिस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसने कळविण्यात येते की, आमचे अशिल हे खालील वर्णनाच्या मिळकतीचे विद्यमान मालकाकडुन कायम खरेदी करणार असुन तशी बोलणी आमचे अशिल व मिळकतीचे मालक मध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मालकाचे नाव :१) सल्लाहुद्दीन जाहीद वक्षी, २) अब्दुल वासीत अब्दुल जलील वक्षी
रा.मु. कांदळवाडा, ता. म्हसळा, जि. रायगड

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | भो.ग.वर्ग | क्षेत्र (हे. आर) | आकार (रू. पै) |
|---|---|---|---|---|
| कांदळवाडा | ४/१ | १ | ०.३६.४० ०.०५.३० ०.४१.७० | ४.१२ |

वरील मिळकतीचे कोणतेही भागावर कोणाचेही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचाकरार, वारसा हक्क, लिज, चार्ज, पोटगी, वहिवाट, (जाण्या-येण्याचा मार्ग), इजमेंटरी या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध असल्यास अथवा कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीची विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी हरकत अगर तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० (दहा) दिवसांच्या आत सही करणार यांचेकडे लेखी स्वरुपात योग्य ते कागदपत्रे पुराव्यासहीत सादर करावे.

मुदतीत कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहित धरून आमचे आशिल व्यवहार पुर्ण करतील. व मागाहून कोणाचीही तक्रार हरकत राहिल्यास ती विचारात घेतली जाणार नाही हे सर्वास कळावे.

माणगांव
दिनांक :- २८/०१/२०२६

सही/-
**(ॲड. पी. एम. जाधव)**
बी.कॉम.एल.एल.बी.
तळाशेत, माणगाव
मो. ७२१९५४६०८७

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. अशोक जगन्नाथ चव्हाण, रा. झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| झिराड | ३६१/२/१/१ | ०-१०-४० वरकस ०-३५-६० ०-४६-०० पो. ख. ०-०३-६० ०-४९-६० | १.३५ |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : ३०/०१/२०२६

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
ओ/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


# आगरदांडा खाडी पुलाचे काम जोरात

## मुंबईहून श्रीवर्धन अवघ्या दोन तासांत गाठता येणार

| मुरुड-जंजिरा | प्रतिनिधी |

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने ८०९ कोटी खर्चून ४.३ किमी लांबीच्या अगरदांडा खाडी पुलासाठीच्या निविदा काढल्या होत्या. त्यात टोकेखार-तुरुंबाडी दरम्यानच्या नागरी बांधकामासाठी हिंदुस्थान कन्स्ट्रक्शन कंपनीला ठेका देण्यात आला आहे. रेवस-रेड्डी किनारी महामार्गावरील या दोन पदरी पुलाच्या बांधकामाला महाराष्ट्र सरकारच्या मंत्रिमंडळाने जानेवारी २०२४ च्या मध्यात मंजुरी दिली होती. हा पूल अदानी पोर्ट्स अँड एसईझेडच्या दिघी बंदर प्रकल्पाच्या पूर्वेला बांधला जात आहे. या पूलामुळे श्रीवर्धन व मुरुड तालुका जोडला जाणार असून दोन्ही तालुक्यात पर्यटन मोठ्या प्रमाणात वाढणार असल्याचे बोलले जात आहे.

रायगड जिल्ह्यातून रत्नागिरीकडे जाण्यासाठी रेवस-रेड्डी किनारी महामार्ग तयार होत आहे. त्यासाठी टोकेखार तुरूंबाडी पुलाचे काम सुरु आहे. सध्या श्रीवर्धनला जाण्यासाठी रो-रो बोटीतून जावे लागते. परंतु, त्यामुळे वेळही वाया जात असून जास्त खर्चिक पडते. मात्र, या पुलामुळे मुरूडवरून श्रीवर्धन फक्त ४० किमी अंतरावर येईल. त्यामुळे वेळेसह आर्थिक बचत देखील होणार आहे. तसेच, श्रीवर्धनकडे जाणाऱ्या पर्यटकांच्या गाड्या या मुरूडहून जाणार असल्याने मुरुड बाजारात आर्थिक उलाढाल वाढण्याची शक्यता वर्तविली जात आहे.



रेवस-रेड्डी सागरी महामार्गातील महत्वाचा पहिला टप्पा कारंजा ते रेवस असा असून दूसरा टप्पा टोकेखार ते तुरुंवाडी असा असणार आहे. या पुलांमुळे मुंबईहून श्रीवर्धन अवघ्या २ तासांत गाठू शकणार आहेत. केंद्र सरकारकडून कोकणातील सागरी महामार्ग व पर्यटन विकासाबाबत विशेष नियोजन असल्याने या मार्गावरील सर्व पूल तातडीने करण्याचे आदेश राज्य शासनाला देण्यात आले आहेत.

### अंदाजित खर्च ८०९.८९ कोटी

टोकेखार-तुरुंबाडी पुलाच्या बांधकामाला महाराष्ट्र सरकारच्या मंत्रिमंडळाने जानेवारी २०२४ च्या मध्यात मंजुरी दिली होती. या पुलाचा अंदाजित खर्च ८०९.८९ कोटी रुपये असून बांधकामाची मुदत ३० महिने होती. तसेच, अतिरिक्त १० वर्षांच्या देखभालीचा कालावधी होता. या पूलसाठी अंदाजे २००० कामगार लागणार असून सध्या १००० कामगार काम करत आहेत. त्यामुळे पुढील काळात कामगारांची गरज असणार आहे. दरम्यान, टोकेखार ते तुरुंवाडी पुलाच्या कामाची पाहणी केल्याने परिसरातील गावकऱ्यांच्या शेती पुलासाठी जाणार आहेत. त्यामुळे बाधीतांना व बेरोजगारांना त्या ठिकाणी काम मिळण्याबाबत स्थानिक आग्रही आहेत.



# माणगावात गटशेतीचा जागर

| चिरनेर | प्रतिनिधी |

पुढील काळ शेतीसाठी आव्हानात्मक आहे. तरुण वर्ग शेतीकडे वळावा यासाठी काही उपाययोजना कराव्या लागणार आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी रासायनिक शेती करण्याऐवजी सेंद्रिय शेतीकडे वळले पाहिजे. एकंदरीत शेतीतील वाढता खर्च आणि अनिश्चित बाजारपेठ यावर मात करण्यासाठी गट शेती हाच एकमेव पर्याय आहे, हा संदेश उरणच्या शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी पाणी फाऊंडेशनच्यावतीने माणगाव येथील साने गुरुजी राष्ट्रीय स्मारकात ३ दिवसीय निवासी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात उरण तालुक्यातील शेतकऱ्यांनी आधुनिक शेतीची नवी गुरुकिल्ली आत्मसात केली.

साचेबद्ध प्रशिक्षणांना फाटा देत पाणी फाऊंडेशनने अत्यंत रंजक पद्धतीने हे शिबीर राबवले. विविध खेळ, गटचर्चा आणि प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून शेतकऱ्यांमध्ये एक वेगळाच उत्साह पाहायला मिळाला. समूहाने काम करताना येणारे अडथळे आणि त्यावर एकजुटीने काढायचा मार्ग, याचे जिवंत उदाहरण या खेळांमधून मांडण्यात आले. यावेळी गट शेतीमध्ये प्रत्येक शेतकऱ्याची भूमिका काय असावी, गटाचे नियोजन कसे करावे, खर्च कमी करून नफा कसा वाढवावा आणि एकमेकांवर विश्वास ठेवून सामूहिक प्रगती कशी साधावी, यावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. गट शेती म्हणजे केवळ एकत्र येणे नव्हे, तर ती एक व्यावसायिक संधी आहे. या प्रक्रियेत प्रत्येक शेतकऱ्याची जबाबदारी, पारदर्शकता आणि नियोजनाचे महत्त्व यावर तज्ज्ञांनी प्रकाश टाकला. उरणच्या भौगोलिक परिस्थितीचा विचार करता तिथल्या शेतकऱ्यांनी एकत्र येऊन ब्रँडिंग आणि मार्केटिंग केल्यास मोठा आर्थिक बदल घडू शकतो, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. या प्रशिक्षणामुळे उरण तालुक्यातील शेतीमध्ये आता सामूहिक क्रांतीचे वारे वाहू लागतील, अशी चिन्हे दिसत आहेत.

उरण भागातून आलेल्या शेतकऱ्यांनी या प्रशिक्षणात अतिशय उत्साहाने सहभाग नोंदवला. प्रशिक्षणाच्या शेवटच्या दिवशी अनेक शेतकऱ्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, साने गुरुजी स्मारकाच्या पवित्र वातावरणात मिळालेले हे ज्ञान आमच्या आयुष्याला नवी दिशा देणारे ठरेल. आता आम्ही केवळ शेतकरी राहणार नाही, तर एक उद्योजक म्हणून काम करू. या यशस्वी आयोजनाबद्दल उरणच्या शेतकरी बांधवांनी पाणी फाउंडेशनच्या टीमचे आणि साने गुरुजी स्मारकाचे आभार मानले आहेत.

## निवडक



### वधू-वर परिचय मेळावा संपन्न

**नवीन पनवेल :** पनवेल उरण आगरी समाज मंडळ आयोजित २९ वा वधू वर परिचय मेळावा मंडळाच्या महात्मा ज्योतिबा फुले सभागृहात उत्साहात पार पडला. या मेळाव्याचे उद्घाटन ज्येष्ठ कामगार नेते महेंद्र घरत यांच्या हस्ते करण्यात आले. या मेळाव्यामध्ये १९९ मुले व ९९ मुलींनी सहभाग घेतला होता. प्रत्येकी दहा मुले / मुलींना स्टेजवर बोलवून परिचय करून देण्यात आला. सकाळी ११ वाजता सुरू झालेला कार्यक्रम सायंकाळी ६ वाजेपर्यंत मोठ्या उत्साहात चालू होता. अनेकांनी परस्परांना माहितीची देवाणघेवाण करित संपर्क साधला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अध्यक्ष अतुल पाटील, उपाध्यक्ष जे.डी. तांडेल, सचिव बी.पी. म्हात्रे, कोषाध्यक्ष विजय द. गायकर, मेघा तांडेल, मनीषा तांडेल, शिवदास पाटील, शिवदास कांबळे माजी नगरसेवक, जगदीश गायकर, माजी उपसरपंच संजय गायकर, डी. बी. पाटील, विद्याधर पाटील यांनी बहुमोल सहकार्य केले.

### राजश्री वीकली लॉटरीचा निकाल

**अलिबाग :** गोवा राज्य सरकारची राजश्री ५० वीकली लॉटरीचा दि. १२ जानेवारी रोजी झालेल्या ड्रॉ चा निकाल नुकताच अधिकृतपणे जाहीर करण्यात आला आहे. यावेळी तब्बल २१ लाखांच्या प्रथम क्रमांकाच्या बक्षीसाचा विजेता समोर आला आहे. हा ड्रॉ ६९-०४२३ या क्रमांकाच्या तिकिटाला लागला असून, हे तिकीट बारामती येथील न्यु रमेश लॉटरी सेंटरमधून विकले गेले आहे. या भाग्यवान लॉटरीचे अधिकृत स्टॉकिस्ट अहमदनगर स्थित लक्की लॉटरी असून, त्यांच्या माध्यमातून ही मालिका बाजारात उपलब्ध झाली होती. सध्या विजेत्याची ओळख पडताळणीची प्रक्रिया सुरू असून, ती पूर्ण झाल्यानंतर अधिकृतरीत्या विजेत्याची माहिती जाहीर केली जाणार आहे. वीकली आणि मासिक ड्रॉमध्ये मिळणाऱ्या मोठ्या इनामी रकमेबद्दल राज्यभरात नेहमीच चर्चा होत असते. विशेष म्हणजे, या लॉटरीची लोकप्रियता आता महाराष्ट्रापुरती मर्यादित न राहता उत्तर भारतातही झपाट्याने वाढताना दिसून येत आहे.

### उकरुळ पदयात्रा पालखी सोहळा

नेरळ : श्री साईबाबा सद्भावना पदयात्रा पालखी सोहळातर्फे साईबाबांची पालखी नेरळ येथील श्री साईबाबा मंदिर मोहाची वाडी येथून निघून श्री साई मंदिर उकरूल येथे नेण्यात आली. नेरळ मोहचीवाडी येथील साई मंदिर संस्थान येथे सकाळी आठ वाजता पालखीचे प्रस्थान करण्यात आले. त्यानंतर जागोजागी पालखीचे स्वागत साई भक्त यांच्याकडून केले जात होते. नेरळ गावातील खांडा गावातून हि पालखी नेरळ बाजारपेठ अशी जात असताना अनेक ठिकाणी स्वागत केले जात होते. श्री साई बाबा संस्थान यांच्याकडून गेली १४ वर्षे अखंडित मोहाची वाडी नेरळ येथून शिर्डी स्थित साईबाबा यांचे या मंदिरात काही वेळ वास्तव्य होते. आणि त्यामुळे उकरूल येथील साईबाबा मंदिर हे प्रसिद्ध आहे.



# अनुराधा औंधे यांचे निधन

| रसायनी | प्रतिनिधी |



अनुराधा औंधे यांचे वयाच्या ८४ वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या अंत्यविधीस अनेक क्षेत्रातील मान्यवर आप्तेष्ट मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पती वासुदेव औंधे, मुलगा राजीव औंधे, संजीव औंधे, मुलगी साधना औंधे, नातू निलय औंधे, नात तनुजा औंधे व मोठा औंधे परिवार आहे. त्यांच्या मृत्यू प्रित्यर्थ धार्मिक विधी त्यांच्या राहत्या घरी ठाणे (प.) रहेजा गार्डन्स गेट नंबर३ येथे होणार आहेत.

# अतुल मालकर यांचे समाजोपयोगी उपक्रम

| रसायनी | प्रतिनिधी |

समाजातील प्रश्नांवर फक्त भूमिका न मांडता प्रत्यक्ष कृतीतून बदल घडविणारे नेतृत्व म्हणून अतुल मालकर यांना ओळखले जाते. त्यांनी सामाजिक, शैक्षणिक व आदिवासी विकासासाठी कार्य करत विश्वासार्ह ओळख निर्माण केली आहे. त्याच सेवाभावातून त्यांनी आपला वाढदिवस समाजकार्यास समर्पित केला आहे.




वाढदिवसानिमित्त रसायनी पाताळगंगा परिसरातील राजिप मराठी शाळा तळवली येथे क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे विद्यार्थी व दहावी परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, स्पर्धात्मकता व नेतृत्वगुण विकसित व्हावेत, हा या उपक्रमामागील स्पष्ट उद्देश होता. त्याचवेळी आदिवासी बांधवांच्या मूलभूत व प्रलंबित समस्यांकडे थेट लक्ष देत अनेक गरजू कुटुंबांना नवीन रेशन कार्ड प्रत्यक्ष मिळवून देण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली. केवळ आश्वासनांवर न थांबता प्रत्यक्ष लाभ देणारे कार्य हीच त्यांच्या नेतृत्वशैलीची खरी ओळख ठरत आहे.

# समाज अध्यक्षपदी जमीर कर्जिकर

| रोहा | प्रतिनिधी |

रोहे शहारातील अष्टमी मुस्लिम समाजाचे मावळते अध्यक्ष म. शफी पानसरे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच जामे मस्जिद अष्टमीच्या हॉलमध्ये शनिवारी सर्वसाधारण आम सभा पार पडली. यावेळी १७ जागांसाठी २५ जण इच्छुक असल्यामुळे चिठ्ठ्या उडवून त्यांची कार्यकारी मंडळ सदस्यपदी निवड करण्यात आली. तसेच, निवडून आलेल्या १७ जणांच्यात अंतर्गत गुप्त मतदानात अध्यक्षपदी जमीर कर्जिकर यांची निवड करण्यात आली. तर, समाज उपाध्यक्षपदी मुशीर अहमद दर्जी, अरबी कमिटी अध्यक्षपदी मुबीन उमर दळवी, सचिवपदी राहील करिम नागोठकर,



सह सचिवपदी समीर इब्राहिम चोरडेकर, खजिनदारपदी यासीन अल्लीमिया पानसरे, सदस्यपदी बाकर महमद साष्टीकर, शाहानवाज उमर नागोठकर, मजीद अयुब पठाण, डॉ.अरबाज बशीर खान, सूफयान म.शफी पानसरे, अकील अ.रहिमान फौजे, मुखत्यार हुसेनमिया शेटे, साजिद शरफूद्दीन किरकिरे, रहीम अजीम दापोलकर, मारुफ मोअझम कबले व सऊद अ.कादीर बंद्री यांची सदस्यपदी निवड करण्यात आली.

# अभिनंदनाच्या फलकाने शहर विद्रुप

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीत विजयी झालेल्या नवनिर्वाचित नगरसेवकांच्या अभिनंदनाचे फलक १५ दिवस उलटूनही अजूनही काढले गेलेले नाहीत. या फलकांमुळे पनवेल शहर विद्रूप दिसत आहेत. त्यामुळे ते लवकरात लवकर काढावेत, अशी मागणी सूज्ञ नागरिक इम्तियाज बेग यांनी पनवेल महापालिकेकडे केली आहे. तसेच, किती बॅनर्ससाठी अधिकृत परवानगी घेतली आणि किती बेकायदा बॅनर्स लावण्यात आले आहेत, याबाबत माहिती देखील त्यांनी मागितली आहे.

# तळोज्यात दोन ठिकाणी हाणामारी

| पनवेल | प्रतिनिधी |

तळोजा वसाहतीत दारूच्या दुकानासमोर सलग दोन मारहाणीच्या घटना घडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. दारू खरेदी अथवा पिण्यास नकार दिल्याच्या कारणावरून काही युवकांनी दोन तरुणांना बेदम मारहाण केल्याचे उघड झाले आहे. या दोन्ही प्रकरणांची नोंद तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. घटनेनंतर मारहाण करणारे युवक पसार झाले असून तळोजा पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. उघड्यावर मद्यपान करणारे व मद्यपींचा त्रास हा तळोजा परिसरातील रहिवाशांसाठी पुन्हा एकदा गंभीर प्रश्न बनला आहे.

पहिली घटना तळोजा फेज-२ मधील कुणाल वाईन्ससमोर घडली. येथे ३० वर्षीय तरुण व त्याचा मित्र उभे असताना दोन अनोळखी युवकांनी त्यांच्यावर अचानक हल्ला चढवला. त्यांनी ॲल्युमिनियमच्या पट्टीने त्यांच्या डोक्यावर, पाठीवर आणि हातांवर जबर मारहाण केल्याने दोघेही जखमी झाले. त्याच दिवशी रात्री दुसरी घटना घडली. खारघर येथे राहणारा ३२ वर्षीय तरुण कुणाल वाईन्समधून दारू खरेदी करून घरी जात असताना दोन अनोळखी युवकांनी त्याला अडवले. त्याकडे, ३० मिलीलीटर दारूचा पेग पाजणार नाही का? अशी मागणी त्यांनी केली. मात्र, दारू देण्यास नकार दिल्याने त्यांनी त्याला लाथाबुक्यांनी मारहाण केली. या हल्ल्यात ३२ वर्षीय तरूण गंभीर जखमी झाला आहे.

दरम्यान, या मारहाणीत आरोपींनी आपल्या हातातील सोन्याचे ब्रेसलेटही घेतल्याचा संशय पीडित तरुणाने पोलिसांकडे दिलेल्या तक्रारीत व्यक्त केला आहे. दोन्ही घटनांचा तपास तळोजा पोलीस करत असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींचा शोध सुरू आहे. वाढत्या मद्यपी त्रासावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# वनसमितीच्या कार्यकारिणीमध्ये कुणाची वर्णी?

| माथेरान | प्रतिनिधी |

पर्यावरण अबाधित ठेवण्यासाठी वनविभाग माथेरान यांच्या वनसमितीची निवड नगरपरिषदेच्या सत्ताधारी गटाकडून दर पाच वर्षांनी करण्यात येते. परंतु, नगरपरिषदेच्या निवडणुकीला पाच वर्षांपेक्षा अधिक कालावधी गेल्यामुळे या समितीच्या पदाधिकारी आणि सदस्यांची नियुक्ती करण्यात आली नव्हती. वनसमितीला वाहन पार्किंगच्या माध्यमातून दरवर्षी लाखो रुपयांचे उत्पन्न प्राप्त होत असते. माथेरान मधील जवळपास अधिक क्षेत्र हे वनखात्याच्या अखत्यारीत येत असल्याने पर्यटनाच्या दृष्टीने आवश्यक ठिकाणी खर्च करण्यासाठी ही समिती सहकार्य करीत असते.



नुकताच नगरपरिषदेची निवडणूक पार पडली असून महायुतीची सत्ता स्थापन झाली आहे. त्यामुळे वनसमितीची नव्याने निवड व्हावी अशी मागणी सध्या जोर धरू लागली असून अनेकजण या समितीवर काम करण्यासाठी इच्छुक दिसत आहेत. मागील काळात या समितीने आपल्या परीने कामे पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले आहेत. नव्याने या समितीची जबाबदारी स्वीकारणाऱ्या मंडळींना येथील पर्यावरण त्याचप्रमाणे स्वच्छता राखण्यासाठी प्लास्टिक मुक्त माथेरान असावे, तसेच या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांना अभिप्रेत असणारे अनेक महत्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यासाठी मेहनत करणाऱ्या सदस्यांची आवश्यकता आहे. त्यामुळे सत्ताधारी गटाने या समितीच्या कार्यकारिणी वरील सर्वच सदस्यांची निवड करताना जे खरोखरच आत्मीयतेने कामे करू शकतात अशांना संधी उपलब्ध करून दिल्यास माथेरान हे स्वच्छ, हरित आणि पर्यटन वाढीस मदत होईल असेही सुज्ञ नागरिकांमधून बोलले जात आहे.

# हेमंत चव्हाण यांना संगणक भेट




| उरण | प्रतिनिधी |

उरण येथील ज्येष्ठ पत्रकार हेमंत चव्हाण यांना यमुना सामाजिक शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष तथा आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्र घरत यांच्याकडून संगणक भेट देण्यात आला. पत्रकारितेच्या कामकाजात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर व्हावा, बातमी लेखन व माहिती संकलन अधिक सुलभ व्हावे, या उद्देशाने ही भेट देण्यात आली. यावेळी संगणक विभागाचे तज्ज्ञ आनंद ठाकूर हे उपस्थित होते. यावेळी पत्रकार हेमंत चव्हाण यांच्या पत्रकारितेतील योगदानाचा गौरव करण्यात आला. सामाजिक, शैक्षणिक व पत्रकारिता क्षेत्रात सातत्याने कार्यरत असलेल्या यमुना सामाजिक शैक्षणिक संस्थेच्या या उपक्रमाचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले.

# म्हसळा तालुक्यात मनसे स्वबळावर

| म्हसळा | प्रतिनिधी |

आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने जिल्ह्यात स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. त्या अनुषंगाने म्हसळा तालुक्यात मनसेकडून स्वतंत्र उमेदवार उभा करून त्यांना निवडून आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करण्यात येणार असल्याचे दिलीप सांगळे यांनी सांगितले. जि.प. पांगलोली गटातून शेखर सावंत हे मनसेचे अधिकृत उमेदवार आहेत. मनसे स्वतंत्र निवडणूक लढणार असल्याने पांगलोली जि.प. गटात चौरंगी लढत होणार असल्याचे चित्र आहे.

दिशा महिला मंचाचा उपक्रम | महिलांचा मोठा प्रतिसाद

# कामोठ्यात 'संक्रांत मेळावा' उत्साहात

| पनवेल | प्रतिनिधी |

दिशा कल्चरल इव्हेंट्स प्रस्तुत दिशा महिला मंच आयोजित 'संक्रांत मेळावा २०२६' हा कार्यक्रम कामोठे येथे पार पडला. महिलांच्या सन्मानासाठी, आत्मसन्मानासाठी व सक्षमीकरणासाठी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला महिलांचा मोठा प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमाला कामोठ्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक विमल बिडवे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांच्यासह ॲड. रोहिणी साळे, डॉ. गणेश साळे, आमदार पत्नी मोहिनी पाटील, नगरसेविका स्नेहल ढमाले, नगरसेविका हेमलता गोवारी, नगरसेविका शिला भगत, नगरसेविका कुसुम म्हात्रे यांची



उपस्थिती लाभली. या कार्यक्रमाला साई द्वारका हॉस्पिटलचे डॉ. हेमंत पाटील व समाजसेविका इंदू झा यांच्यासह जयश्री राठोड, राजश्री थोरात, शुभांगी पाटील, जयदादा युवा मंचचे संस्थापक जय डिगोळे, एल.एम. इंटरनॅशनल प्रीस्कूलच्या संस्थापिका ललिता कनोजिया, विभावरी शिगवन यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कोमल डांगे यांनी केले. तसेच मनीषा मोरे, वंदना पोपळकर, दीक्षा ढोणे, गीता कुडाळकर, वंदना वाघमोडे, करुणा कांबळे, शिल्पा म्हात्रे व संपूर्ण टीम यांच्या सहकार्यामुळे हा कार्यक्रम अत्यंत यशस्वी ठरला.

यावेळी ॲड. रोहिणी साळे यांनी, भविष्यात महिलांसाठी आरोग्य शिबीरे व विविध समाजोपयोगी उपक्रम दिशा महिला मंचसोबत संयुक्तपणे राबवण्यात येतील, असे आश्वासन दिले. या कार्यक्रमामध्ये महिलांसाठी हळदी-कुंकू समारंभ, खेळ पैठणीचा, लकी ड्रॉ, विविध मनोरंजनात्मक खेळाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाची विशेष बाब म्हणजे विधवा महिलांसाठी विशेष हळदी-कुंकू समारंभ राबविण्यात आला. या संवेदनशील उपक्रमामुळे अनेक महिलांच्या चेहऱ्यावर समाधान व आत्मीयतेचा आनंद दिसून आला. यावेळी प्रमुख पाहुण्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक विमल बिडवे यांनी महिलांना स्वतःची काळजी, सुरक्षितता, आत्मभान आणि मानसिक सबलता याबाबत अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांनी दिशा महिला मंचच्या उपक्रमांचे मनःपूर्वक कौतुक केले. संस्थेच्या संस्थापक नीलम आंधळे यांनी, स्त्रीशक्तीच्या सन्मानासाठी आणि महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी दिशा महिला मंच नेहमीच कार्यरत राहील, असे सांगितले.

या कार्यक्रमात महिलांनी पैठणी खेळाचा मनमुराद आनंद लुटला. यावेळी महिलांना आयुर्वेदिक हेअर ऑइल वाण स्वरूपात देण्यात आले. शुभांगी कलेक्शनकडून महिलांना आकर्षक गिफ्ट देण्यात आले. तसेच, महिलांना विविध ठिकाणच्या पिकनिक पॅकेजेसवर विशेष सवलती देण्यात आल्या. कार्यक्रमाच्या शेवटी संस्थेच्या उपाध्यक्ष विद्या मोहिते यांनी सर्व मान्यवरांचे, प्रायोजकांचे, सहकार्य करणाऱ्या संस्था, टीम व उपस्थित महिलांचे आभार मानले.

# रस्ता सुरक्षा अभियान उत्साहात



| नवीन पनवेल | प्रतिनिधी |

कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी अंतर्गत पनवेल येथील बार्न्स महाविद्यालयात नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या वाहतूक विभागाच्या विद्यमाने रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत जनजागृती कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमादरम्यान औदुंबर पाटील यांनी हेल्मेट व सीटबेल्टचा वापर, वेगमर्यादेचे पालन, वाहन चालविताना मोबाईल वापर टाळणे तसेच मद्यप्राशन करून वाहन न चालवण्याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पोलीस उपनिरीक्षक जीवन शेरखाने यांनी, वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यामुळे होणाऱ्या अपघातांची उदाहरणे देत नियम पाळण्याचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी पोलीस उपनिरीक्षक जीवन शेरखाने तसेच मोहन काळे यांच्यासह पनवेल वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.




## राशीभविष्य

- **मेष** : कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढतील. यांत्रिक-तांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील. वाहनसौख्य लाभेल.
- **वृषभ** : सुवार्ता कानी येईल. कामाचा उत्साह वाढता राहील. भागीदारी व्यवसायात उत्तम स्थिती राहील.
- **मिथुन** : सरकारी कामांना विलंब लागेल. जुनी येणी रखडतील. बोलण्यातून गैरसमजांची शक्यता आहे.
- **कर्क** : उपजत गुणांना वाव मिळेल. अनुभवींचा सल्ला महत्त्वाचा ठरेल. आर्थिक करार लांबणीवर पडतील.
- **सिंह** : अचानक धनलाभ संभवतो. गृहोपयोगी वस्तुंच्या व्यवसायात उत्कर्ष होईल. बाकी चिंता नसावी.
- **कन्या** : कर्तव्यपूर्तीचं समाधान लाभेल. दिलासादायक घटना घडतील. विवाहाची बोलणी सफल होतील.
- **तूळ** : व्यवसायात अडचणी संभवतात. महत्त्वाच्या कामांना विलंब लागेल. आर्थिक समस्या भेडसावतील.
- **वृश्चिक** : नव्या योजना साकार करू शकाल. आत्मविश्वास वाढीस लागेल. कौटुंबिक वाद संभवतात.
- **धनु** : अपेक्षित उलाढाल होईल. विद्यार्थ्यांना स्पर्धांमध्ये यश मिळेल. आनंदी, समाधानी रहाल.
- **मकर** : गैरसमजांपासून दूर रहावं. व्यवसायात अचानक अडचणी संभवतात. चैनीवर अधिक खर्च होईल.
- **कुंभ** : आर्थिक करार मार्गी लागतील. कंत्राटी व्यवसायात अनुकूलता राहील. ज्येष्ठांना अस्वास्थ्य राहील.
- **मीन** : मनाजोग्या घटना घडतील. इतरांवर फार विसंबून राहू नका. प्रेम प्रकरणात वाद संभवतात.

रसगंधा

## रुचकर शेजवान चटणी

शेजवान चटणी सर्वांनाच आवडते. ही चटणी बरेच दिवस टिकते. तर पाहूया तिची कृती...

**सामग्री:** १०-१२ सुकलेल्या लाल मिरच्या, लसणाचे दोन गड्डे, सात-आठ लसणाच्या पाकळ्या (बारीक चिरुन), एक कांदा (बारीक चिरलेला), दोन इंच आलं (किसलेलं), दोन हिरव्या मिरच्या (बारीक चिरलेल्या), चवीनुसार मीठ, एक चमचा कॉर्नफ्लोअर, तेल इत्यादी.

**कृती:** लसूण सोलून लाल मिरच्यांबरोबर शिजत ठेवावा. चांगला शिजल्यानंतर पाणी काढावं मात्र फेकून देऊ नये. शिजलेल्या मिरच्या आणि लसणाची मिक्सरमध्ये बारीक पेस्ट करुन घ्यावी. दुसरीकडे एका कढईत दोन चमचे तेल चांगलं गरम करावं. नंतर त्यात बारीक चिरलेला लसूण, आलं आणि हिरवी मिरचीचे तुकडे परतून घ्यावे. यात चिरलेला कांदा गुलाबी रंगावर परतून घ्यावा. लाल रंगासाठी थोडी काश्मिरी मिरची घालावी. यात लसूण आणि मिरचीची पेस्ट घालून मिश्रण पाच मिनिटे शिजवून घ्यावं. चांगलं शिजण्यासाठी त्यात गाळलेलं पाणी मिसळावं. उकळी आल्यानंतर चमचाभर कॉर्नफ्लॉवर घालावं आणि पुन्हा दोन मिनिटे शिजवावं.

## ३० जानेवारी

दिनविशेष

**१९११** : वि.दा.सावरकर यांना पन्नास वर्षांची काळ्या पाण्याची शिक्षा ठोठावण्यात आली.
**१९४८** : विमानाचा शोध लावणारे राईट ऑर्व्हिल यांचं निधन.
**२०१३** : कृष्णा अरोरा यांना सामाजिक कार्याबद्दल ऑस्ट्रेलियातील सर्वोच्च नागरी सन्मान जाहीर.
**२०१४** : केंद्र सरकारने वर्षाला नऊऐवजी बारा अनुदानित स्वयंपाकाचे गॅस सिलिंडर देण्याचा निर्णय जाहीर केला.

सफर देशांची

## निसर्गसंपन्न पेरू

पेरू हा ब्राझील आणि अर्जेंटिनानंतरचा दक्षिण अमेरिकेतला तिसरा सर्वात मोठा देश. पेरूमध्ये डोंगरदऱ्या, वाळवंट आणि घनदाट जंगलंही आहेत. इथे सुंदर समुद्रकिनारेही पहायला मिळतात. 'लिमा' ही पेरूची राजधानी. पॅसिफिक महासागराच्या किनारी वसलेलं हे शहर. इक्वेडोर, कोलंबिया, ब्राझील, बोलिव्हिया आणि चिली अशा पाच देशांच्या सीमा पेरूशी जोडलेल्या आहेत. या देशाचा अर्ध्यापेक्षा जास्त भाग ॲमेझॉनच्या जंगलांनी वेढलेला आहे. म्हणूनच इथे विविध प्रजातींचे प्राणी, पक्षी तसंच वनस्पती पहायला मिळतात. हे जंगल म्हणजे विविध आदिवासी जमातींचं घर. इथल्या बऱ्याच जमातींनी जंगलाबाहेरचं जग पाहिलेलंही नाही. पेरूच्या उत्तरेकडून दक्षिणेपर्यंत ॲंडिज पर्वतरांगा आहेत. ॲंडिजच्या शिखरांवर पडलेला बर्फ पाहण्यासाठी बरेच पर्यटक येतात. हायकिंग, ट्रेकिंगसारखे धाडसी क्रीडाप्रकार इथे खेळले जातात. 'माउंट हुआसकरन' हे पेरूतलं सर्वात उंच शिखर. त्याची उंची तब्बल ६७६८ मीटर आहे. पेरूमध्ये पर्यावरणाचं जतन करण्यात आल्याने इथली वनसंपदा टिकून आहे.

### पंचांग

**शुक्रवार, ३० जानेवारी २०२६**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
माघ शु. १२, चंद्रराशी : मिथुन,
नक्षत्र : आर्द्रा, योग : वैधृति,
सूर्योदय ७.१५, सूर्यास्त ६.२९

### फॉरवर्डस

**तनहा सा हो ग़या हैं मेरा कमरा आज़कल...**

**एक़ पंखा बोला करता था.. पर अब सर्दियां आ ग़यी हैं...!**

आरोग्यमंत्र

## सावधान, धोका आहे इथे

चिकनप्रेमींची संख्या बरीच मोठी आहे. ती वाढतंही आहे. मात्र चिकन खरेदी करताना काही दक्षता घ्यायला हवी. जास्त मांस मिळवण्याच्या लालसेपोटी कोंबड्यांना रसायनयुक्त औषधं आणि काही इंजेक्शनचा डोस दिला जातो. ही औषधं त्यांच्या मांसाच्या गुणवत्तेवर प्रभाव टाकतात. म्हणून बॉयलर चिकनपेक्षा देशी अधिक सुरक्षित असते असं तज्ज्ञ सांगतात.

✻ बॉयलर कोंबड्यांच्या कच्च्या मांसात बरेच कीटाणू आणि जीवाणू असतात. त्यांना संसर्गाचा मोठा धोका असतो. मांस धुतलं जातं त्यावेळीही जंतूसंसर्ग संभवतो. मांसावाटे आपल्यावरही या संसर्गाचा प्रभाव जाणवतो.



✻ मोठ्या संख्येने पक्षी कापले जात असताना कोंबड्यांबरोबर काही अन्य पक्ष्यांची कटाई होत असते. त्यावेळी त्या पक्ष्यांमधील बॅक्टेरिया कोंबड्यांच्या शरीरात संसर्ग उत्पन्न करु शकतात. ✻ कमीत कमी देखभालीत कोंबड्यांची वाढ व्हावी, त्यांच्या शरीरातील रोगप्रतिरोधशक्ती चांगली रहावी आणि साथीच्या रोगांचा प्रभाव कमी व्हावा या हेतूने बॉयलरमधील कोंबड्यांना ॲंटी बायोटिक इंजेक्शन दिली जातात. मात्र हा जास्तीचा डोस त्यांच्या मासांमध्ये असे काही गुणधर्म निर्माण करतो जे मानवी शरीरासाठी घातक ठरु शकतात.

✻ बॉयलर चिकनमध्ये ६७ टक्के ईकोली बॅक्टेरिया असतात. याच्या संसर्गामुळे मानवी शरीर अनेक रोगांना बळी पडू शकतं.

### फॅशन पॅशन

जीममध्ये जाताना स्टायलिंगचा विचार करायला हवा. काही जण फिटनेसच्या विचाराने जीममध्ये जातात तर काही जण सोशल नेटवर्किंगसाठी हा पर्याय निवडतात. कारणं काहीही असली तरी स्टायलिंगच्या बाबतीत कोणतीही तडजोड होता कामा नये. म्हणूनच जीम स्टायलिंगचे हे फंडे आजमावायलाच हवे.

✻ जीमला जाताना ढगळ टी शर्टला बगल द्या. राउंड नेकवाला फिटिंगचा टी शर्ट घाला. ढगळ टी शर्टमध्ये तुमचं व्यक्तिमत्त्व खुलून दिसत नाही. त्यामुळे योग्य फिटिंगच्या शर्टची निवड करा. **(क्रमश:)**

करिअरवाटा

## निर्णय घेण्याआधी...

आयुष्याप्रमाणेच कारकिर्दीतही अचानक बरीच वळणं समोर येतात. दहावी-बारावीमध्ये विशिष्ट दिशेने सुरू केलेला कारकीर्दीचा प्रवास प्रत्यक्षात एका वेगळ्याच टप्प्यावर येऊन पोहोचतो. काही जण झटक्यात करीअर बदलतात. मात्र आपल्यावर आर्थिक जबाबदारी असल्यास ही चंचल वृत्ती धोकादायक ठरू शकते. म्हणूनच करीअर बदलताना विशेष काळजी घ्यायला हवी. पैसा जास्त मिळेल या अपेक्षेने करीअर बदलत असल्यास पुढच्या काळात येणारे धोकेही लक्षात घ्यावेत. केवळ मित्रमंडळी त्या क्षेत्रात आहेत म्हणून हातचे सोडून पळत्याच्या पाठी लागण्यात अर्थ नाही. बरेचदा एखाद्याला जमतं ते दुसऱ्याला जमतचं असं नाही. प्रत्येकाची क्षमता आणि कौशल्य वेगळी असतात. करीअर निवडताना याचाही विचार व्हावा. बऱ्याचदा दुसरी एखादी पदवी घेण्यासाठी करीअर बदललं जातं. मात्र आपण या वयात आणि या परिस्थितीत खरंच अभ्यास करू शकू का, याचा विचार करणं महत्त्वाचं आहे. त्याचबरोबर अर्थाजन थांबल्यानंतर जाणवणारी आर्थिक चणचणही अभ्यासावी. घरातून मिळणारं आर्थिक सहाय्य, तुमच्याकडची पुंजी, जबाबदाऱ्या यांचा साकल्यानं विचार करून योग्य निर्णय घेणं हिताचं ठरतं.



खेचाखेची

## नमुना

काका बँकेत खाते उघडायला गेले. व्यवस्थापकांनी त्याना एक अर्ज भरायला दिला. त्यावर लिहिले होते 'नमुन्याची सही'. काका भडकले आणि त्यांनी व्यवस्थापकांना विचारले की मी नमुना आहे का? व्यवस्थापकांनी माफी मागितली आणि अर्जावर लिहीले सहीचा नमुना.

मातृभाषे मध्ये फक्त शब्दांना नव्हे तर क्रमाला सुद्धा महत्त्व असते.

### वेगळं काही

राजस्थानमधलं पूर गाव कुस्तीसाठी प्रसिद्ध. गेल्या ८० वर्षांपासून इथे कुस्तीपटू घडवले जात आहेत. मधल्या काळात मोबाईल आणि सोशल मिडियाच्या प्रभावामुळे इथल्या मुलांनी कुस्तीकडे पाठ फिरवली होती. पण आता ७५ वर्षांच्या कंवरीलाल बिश्नोईंच्या प्रयत्नांमुळे मुलं पुन्हा एकदा या खेळाकडे वळली आहेत. श्री. बिश्नोई इथल्या मुलांना कुस्तीचे धडे देतात. त्यांनीच या मुलांना पूरमधल्या अत्यंत समृद्ध अशा कुस्ती परंपरेची जाणीव करून दिली. ही परंपरा टिकवण्याची जबाबदारी त्यांच्या खांद्यांवर टाकली. इथली ३५० मुलं आता कुस्तीकडे वळली आहेत. या गावात चार आखाडे आहेत. लहान मुलं, युवक, प्रौढ तसंच काही ज्येष्ठ इथे एकत्रितपणे कुस्ती खेळतात.

स्टे फिट

## व्यायाम करा घरच्या घरी

व्यायामाचे चांगले परिणाम मिळवण्यासाठी त्यात सातत्य असावं लागतं. अनेकींना जीममध्ये जाऊन व्यायाम करण्याचा कंटाळा असतो. असं असेल तर घरीच्या घरी करता येण्याजोग्या व्यायामावर भर द्यायला हवा. याविषयी...



✻ स्ट्रेचिंग- घरी वर्क आउट करत असाल तर स्ट्रेचिंग हा सर्वोत्तम प्रकार आहे. व्यायामाची सुरुवात स्ट्रेचिंगने करावी. यामुळे शरीर लवचिक बनून वर्क आउटसाठी तयार होतं. ✻ पुश अप्स- पोटावर झोपा. दोन्ही हात खांद्याला समांतर ठेवा. हात आणि पंजे यांच्या सहाय्याने शरीर वर उचला आणि खाली आणा. पुश अप्समुळे खांद्यांना मजबुती मिळते. ✻ फ्री स्क्वेट्स- सरळ उभं राहून दोन्ही हात समोर ठेवावेत. गुडघ्यांवर थोडासा भार देऊन शरीराला खुर्चीवर बसतानाच्या स्थितीत आणा. कंबर सरळ ठेवा. काही काळ या स्थितीत राहून पूर्वपदावर या. ✻ हॅंड स्टॅंड- याला अधोमुख वक्रासन म्हणतात. रक्तदाबाचा त्रास असणाऱ्या व्यक्तींनी हा प्रकार करू नये. दोन्ही हात जमिनीवर ठेवून भिंतीच्या सहाय्याने खाली डोकं वर पाय या अवस्थेत रहावं. यामुळे तणावापासून सुटका मिळते.

## सुडोकू ५९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १ | | | ४ | | ७ | |
| ९ | | ३ | ८ | २ | | | | १ |
| ७ | ६ | | | | | | | |
| | ९ | | | | ८ | | ६ | |
| | | ५ | | | | ३ | | |
| | ३ | | ६ | | | | ९ | |
| | | | | | | | ३ | ६ |
| ५ | | | | ८ | ९ | १ | | ७ |
| | १ | | ४ | | | ८ | | |

**टीप -**
✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ५८ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ६ | १ | ७ | ९ | ८ | २ | ५ | ३ |
| ९ | ७ | २ | १ | ३ | ५ | ४ | ८ | ६ |
| ३ | ५ | ८ | ४ | ६ | २ | ९ | १ | ७ |
| १ | २ | ९ | ३ | ४ | ६ | ८ | ७ | ५ |
| ५ | ८ | ३ | ९ | २ | ७ | १ | ६ | ४ |
| ७ | ४ | ६ | ५ | ८ | १ | ३ | ९ | २ |
| ६ | १ | ४ | २ | ७ | ९ | ५ | ३ | ८ |
| ८ | ३ | ५ | ६ | १ | ४ | ७ | २ | ९ |
| २ | ९ | ७ | ८ | ५ | ३ | ६ | ४ | १ |

## शब्दकोडे क्रमांक ५९

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | ३ | ४ | | ५ | ६ | ७ | | ८ | ९ | |
| | ■ | | ■ | १० | | ■ | ११ | | | ■ | १२ | | ■ |
| १३ | १४ | | १५ | ■ | १६ | १७ | | ■ | १८ | १९ | | ■ | २० |
| ■ | | ■ | २१ | | ■ | | ■ | २२ | | | ■ | २३ | |
| २४ | | २५ | | ■ | २६ | | | | ■ | २७ | २८ | | |
| २९ | | | ■ | ३० | | | ■ | ३१ | ३२ | ■ | | ■ | |
| | ■ | ३३ | ३४ | ■ | | ■ | ३५ | ■ | ३६ | | | ३७ | ■ |
| ३८ | | ■ | ३९ | ४० | | ४१ | | ४२ | | ■ | ४३ | | ४४ |
| | ■ | ४५ | | | ■ | ४६ | | | ■ | ४७ | | ■ | |
| ■ | ४८ | | ■ | ४९ | | | ■ | ५० | ५१ | | ■ | ५२ | |
| ५३ | | ■ | ५४ | | ■ | ५५ | ५६ | ■ | ५७ | | | | |
| ■ | ५८ | | ■ | ■ | ५९ | | | ■ | | ■ | ■ | | ■ |
| ६० | | ■ | ६१ | | | ■ | ६२ | ६३ | | ६४ | ६५ | ■ | ६६ |
| ६७ | | | | ■ | ६८ | | | | ■ | ६९ | | | |


**आडवे शब्द :-**
१) दुर्गेच्या आरतीतील पहिली ओळ
१०) हात
११) माणूस
१२) बशीचा जोडीदार
१३) थोरवी, मोठेपणा
१६) तृष्णा
१८) घोड्यावरुन मारलेली चक्कर
२१) राख
२२) पाठीतील माळेतील मणी
२३) चामखीळ
२४) अकस्मात
२६) ठेकेदार
२७) डोंगराचा कडा
२९) प्रामाणिक, सज्जन
३०) नोकरी नसलेला
३१) अंगातील ज्वर, वैताग
३३) वेल
३६) छोटी लढाई
३८) रमणीय
३९) फार काकुळतेने मागणे
४३) दिवाणखाना
४५) चप्पल
४६) डोंगराचा पडलेला भाग
४७) देणे, धर्मार्थ देणे
४८) दरी
४९) उपयोग
५०) अरण्य
५२ ) सुवर्ण (हिं.)
५३) चंद्र
५४) भूपती
५५) संधी, प्रसंग
५७) कोकणातील एक दैवत
५८) सैलच्या विरुद्ध, दाट
५९) रस्ता
६०) एक श्वासरोग
६१) गुरांचा घोळका
६२) अतिशय शुष्कता
६७) भात शिजतानाचा आवाज
६८) प्रेत
६९) मंत्रीमंडळ

**उभे शब्द :-**
१) अगम्य, जाणण्यास कठीण
२) वैरी, शत्रू
३) एकाग्र नजर
४) हिंदुस्थान
५) पायजमा
६) प्रजा, लोक
७) स्पष्टीकरण
८) धोका, कठीण प्रसंग
९) सर्प
१४)चलनवलन
१५)तारणारा
१७) आक्रोश, विलाप
१९) कंबर
२०) बारीक ताप, तापापूर्वीचे अंग मोडून येणे
२२) माया, प्रेम
२३) माझा
२४) असामान्य
२५) प्रजा, दत्तक, औरस नसलेला
२७) न दिसणारी जखम
२८) दौत, लेखणी ठेवण्याची लहान पेटी
३२) पचन होणे
३४) संतापी
३५) वाळवी
३७) मनाचा ओढा
४०) दार
४१) दुसऱ्यासाठी केलेला खर्च
४२) रडणारा
४४) दत्त गुरुंचे नऊ अवतार
४५) क्रीडा
४७) राक्षस
४८) अत्तराची दरवळ
५१) श्रेष्ठ पुरुष
५२) सुवर्णकार
५६) कावकाव
५९) बेचव, पचपचीत
६०) किंमत
६१) रचलेले कारस्थान
६३) गाढव
६४) विशेष
६५) चेष्टा, टिंगल
६६) निवासस्थान, सदन

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

## मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कृ | प | ण | ■ | सा | क्ष | र | ता | ■ | क | म | त | र | ता |
| पा | र | ■ | दे | ■ | प | द | र | व | ■ | द | वा | ■ | प |
| ■ | वा | ता | व | र | ण | ■ | क | र | व | त | ■ | को | ट |
| का | न | स | ■ | मा | क | ड | ■ | ण | ■ | नी | ल | म | ■ |
| रा | गी | ■ | म | ना | ■ | र | सा | ■ | पा | स | ■ | ल | व |
| गृ | ■ | त | न | य | ■ | पो | र | खे | ळ | ■ | स | ता | र |
| ह | ज | र | ■ | क | न | क | ■ | च | त | को | र | ■ | व |
| ■ | ह | ■ | सां | ■ | म | ■ | जा | णे | ■ | ल | ■ | वा | र |
| ज | र | क | ब | र | क | ■ | गृ | ■ | आ | म | र | स | ■ |
| न्म | ■ | मा | ■ | ब | ■ | म | त | दा | न | ■ | त | ला | व |
| ज | न | न | म | र | ण | ■ | ■ | ख | न | न | ■ | त | ण |
| न्मां | ■ | दा | स | ■ | ■ | क | म | ला | ■ | र | म | ■ | वा |
| त | या | र | ■ | आ | वा | ■ | स्त | ■ | न | म | स्का | र | ■ |
| री | ग | ■ | क | ळ | त | न | क | ळ | त | ■ | ■ | वा | टा |




कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)